रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | रविवार । दि. ९ ऑगस्ट २०२६ । अंक ६४ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## राज्यात पुन्हा पावसाचा जोर

**मुंबई :** उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट; काही भागांत ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे महाराष्ट्रात काही दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. हवामान विभागाने उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला असून, विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, गोंदिया आणि नागपूरमध्ये पावसाचा अंदाज आहे.

## नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने

**नवी दिल्ली :** नवी नागरी सहकारी बँक सुरू करण्यासाठी तब्बल २४ वर्षांनंतर रिझर्व्ह बँकेने परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्यासाठी कठोर निकष निश्चित करण्यात आले आहेत. अर्जदार संस्था किमान १० वर्षे कार्यरत असावी, किमान १० हजार कोटी रुपयांच्या ठेवी आणि ३०० कोटी रुपयांची निव्वळ मालमत्ता असणे आवश्यक आहे. तसेच मागील पाच वर्षांची आर्थिक कामगिरी समाधानकारक, सीआरएआर किमान १२ टक्के आणि निव्वळ एनपीए ३ टक्क्यांपेक्षा कमी असणे बंधनकारक आहे.

## वे|ध|क

### पिकअपच्या धडकेत महिला ठार

**नागोठणे :** नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी होत असतानाच शनिवारी भीषण अपघात झाला. पिकअप जीपने



स्कुटीला पाठीमागून धडक दिल्याने खाली पडलेल्या अनिता अनंत जाधव (५६, रा. आमडोशी) यांच्या अंगावरून जीप गेल्याने त्यांचा मृत्यू झाला. अनिता जाधव या मुलगा प्रवीण याच्यासोबत स्कुटीवरून आमडोशीला जात होत्या. अपघातानंतर त्यांना कोकणे रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. पिकअप चालक राजीव कुमार (रा. बिहार) याला नागोठणे पोलिसांनी ताब्यात घेतले असून गुन्हा पान २ वर

### भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू

**नेरळ :** नेरळ-कशेळे भीमाशंकर राज्यमार्गावरील अंजप गावाच्या हद्दीत शनिवारी सकाळी दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात डोंगरपाडा येथील अजित शरद भालचिम (१८) याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. अजित



हा भाऊ अक्षय आणि बहीण कामिनी यांच्यासह दुचाकीवरून गावाकडे जात असताना समोरून येणाऱ्या केटीएम दुचाकीला धडक झाली. या अपघातात तिघेही गंभीर जखमी झाले. त्यांना कशेळे ग्रामीण रुग्णालयातून पुढील उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र अजितचा मृत्यू झाला. दरम्यान, केटीएमस्वार मुंबईतील पर्यटक असल्याची माहिती असून, तो फरार झाला आहे.

### क्लासमध्ये मुलींसोबत अश्लील कृत्य

**पनवेल :** क्लासमध्ये मुलींसोबत अश्लील कृत्य केल्याचा धक्कादायक प्रकार विचुंबे येथे उघडकीस आला. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी आरोपी अनिकेत अनंत कदम (२५, रा. गावदेवी बिल्डिंग, विचुंबे) याला अटक केली. ३ ऑगस्ट रोजी पीडित मुलीला आरोपी अनिकेत कदम याने ऑफिसमध्ये बसायला सांगितले आणि तिच्यासोबत अश्लील कृत्य करून मोबाईलमधील पॉर्न व्हिडिओ पाहण्यास लावल्या. एक ऑगस्ट रोजी दुसऱ्या पीडित मुलीला ट्युशनला एकटीला बोलावले आणि रिप्रोडक्शन सिस्टीम शिकवण्याच्या पाहण्याने क्लास रूमचा दरवाजा बंद केला आणि तिला पॉर्न व्हिडिओ दाखवला आणि अश्लील कृत्य केले. त्यानंतर पान २ वर

### आरोपीचा पोलिसांवर हल्ला

**पनवेल:** पनवेलन्यायालयाच्या आवारात रिमांडसाठी आणलेल्या आरोपीने कोर्टाच्या आवारात पोलीस अधिकाऱ्यांना शिवीगाळ करून एका पोलिसावर हल्ला केला तसेच पोलिसांच्या तोंडावर लाथ मारून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी सदीक अख्तर मोहम्मद खान (रा. कल्याण रोड, भिवंडी) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पाच ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.५ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास आरोपी सादिक खान याला रिमांडसाठी पनवेल न्यायालयात खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हजर करत होते. पोलिसांनी त्याला एका गुन्ह्यामध्ये अटक केली होती. यावेळी त्याच्या नातेवाईकांना पान २ वर


# रायगडचा पोषण आहार जळगावच्या घशात

**। प्रमोद जाधव ।**
**। रायगड ।**

रायगड जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराचा ठेका थेट जळगावमधील कंपनीला देण्यात आल्याने जिल्ह्यातील ठेकेदारांमध्ये नाराजीचे सूर उमटले आहेत. रायगडमध्ये पुरवठा करण्यासाठी स्थानिक यंत्रणा आणि ठेकेदार उपलब्ध असताना, जळगावच्या कंपनीची निवड का करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेषतः जिल्ह्याच्या दुर्गम भागातील शाळांपर्यंत पोषण आहार वेळेवर पोहोचणार का, याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेबाबत आकर्षण निर्माण व्हावे, जिल्हा परिषद शाळेत मुले रमावी, यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणजे, मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार देण्याची योजना सुरू करण्यात आली. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक २०२६-२०२७मधील जून ते जूलै २०२६ या चाळीस दिवसांसाठी पहिली ते आठवीमधील विद्यार्थ्यांना शाळा स्तरावर धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिले आहेत. याबाबत जळगावमधील श्रीसाई मार्केटींग ॲन्ड टेडींग कंपनीला याचा ठेका देण्यात आला आहे. पाच ऑगस्टला या कंपनीला ते पत्र पाठविण्यात आले आहे. ई-निविदा प्रक्रियेद्वारे या संस्थेची पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये दोन हजार ४७३ शाळा असून, ७३ हजार विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. मात्र, पोषण आहार पुरवठा करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील ठेकेदारांना वगळून जळगावमधील ठेकेदारांना ठेका दिल्याने जिल्ह्यात चर्चेला उधाण आले आहे. या प्रकाराबाबत अनेकांकडून नाराजीचे सूर उमटत आहे. रायगड जिल्ह्यातील पोलादपूरपासून पनवेलच्या टोकापर्यंत सुमारे दोन हजार गावे असून, वाड्यांचा समावेश आहे. या गावे, वाड्यांमध्ये दोन हजार ४०० हून अधिक जिल्हा परिषद शाळा आहेत. या शाळांमध्ये ९० हजार हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे. या विद्यार्थ्यांना जळगावमधील ठेकेदारांकडून पोषण आहारचा पुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे हा पुरवठा शाळांमध्ये वेळेवर पोहोचेल की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विलंबाने पुरवठा केल्यास कार्यवाही केली जाईल, अशी अट या कंपनीला दिली असली, तरी त्या अटीचे पालन जळगावमधील कंपनी करेल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



- **स्थानिक ठेकेदारांना डावलल्याने नाराजी**
- **जिल्ह्यातील २,४७३ शाळांमध्ये पोहोचण्याबाबत प्रश्न कायम**

> राज्य शासनाने रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवठा करण्यासाठी कंपनीची निवड केली आहे. त्यानुसार जळगावमधील या कंपनीला पोषण आहार पुरवठ्याचे आदेश देण्यात आले आहेत.
> – संजय नाईकडे, शिक्षणाधिकारी, रायगड जिल्हा परिषद (प्राथमिक विभाग)

### मनमानी कारभार बंद करा

रायगड जिल्ह्यातील हजारो शाळांना पोषण आहाराचा पुरवठा करण्याची क्षमता स्थानिक ठेकेदारांकडे असतानाही बाहेरील कंपनीला ठेका देण्यात आल्याने स्थानिक ठेकेदारांमध्ये नाराजी आहे. जिल्ह्यातील ठेकेदारांना डावलून जळगावच्या कंपनीला संधी का देण्यात आली, असा सवाल उपस्थित करत या निर्णयाचा फेरविचार करावा, तसेच अधिकाऱ्यांनी मनमानी कारभार थांबवावा, असा संताप ठेकेदारांनी व्यक्त केला.

# करोडोंच्या दानावर डल्ला मारणाऱ्या भाजपचा श्रीरामच अंत करतील!

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

खासदार आणि आमदार चोरल्यानंतर आता भाजपने प्रभू श्रीराम मंदिराच्या दान-देणग्यांवरही डल्ला मारला. १४०० कोटींचे सोने-चांदी चोरणाऱ्या भाजपभोवती आता पापाचा फास आवळला आहे. त्यामुळे भाजपचा अंत प्रभू श्रीरामच करतील, असा घणाघाती हल्ला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानसभा गटनेते आमदार भास्कर जाधव यांनी शुक्रवारी उरण येथे केला.



- **भाजपवर भास्कर जाधवांचा घणाघात**
- **उरणच्या कार्यक्रमात आ. बालदींवर टीका**

उरण शिवसेनेच्यावतीने सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांतर्गत ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप, विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भास्कर जाधव यांनी भाजपसह पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि स्थानिक भाजप आमदार महेश बालदी यांच्यावर जोरदार टीका केली.

देशातीलराजकीयवातावरणावर भाष्य करताना जाधव यांनी जंतरमंतरवरील आंदोलनाचा संदर्भ देत सरकारवर निशाणा साधला. न्यायासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार, अश्रुधुर आणि पॅलेटगनचा वापर केल्याचा आरोप करत, यामुळे देशभरात भाजपविरोधात असंतोषाची ठिणगी पडली असून, हा उद्रेक आता वाढत आहे, असा दावा त्यांनी केला.स्थानिक राजकारणावर बोलताना त्यांनी आमदार महेश बालदी यांनाही लक्ष्य केले. उरण नगरपरिषद निवडणुकीचा संदर्भ देत, भाजपच्या बालेकिल्ल्यात शिवसेना व महाविकास आघाडीने मिळवलेल्या यशामुळे भाजपला धक्का बसल्याचा दावा त्यांनी केला.

माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांनीही भाजपवर हल्लाबोल केला. उरण नगरपरिषद निवडणुकीत २१-० असा विजय पान २ वर

## सावकारीचा जाच, गळ्याला फास!

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

आर्थिक अडचणीच्या काळात तातडीने पैसा मिळतो म्हणून खासगी सावकारांकडून कर्ज घेणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असताना, १० ते १५ टक्के व्याजाच्या ओझ्याखाली कर्जदार अक्षरशः दबून गेले आहेत. व्याज भरूनही मूळ रक्कम कायम असल्याचे सांगत कर्जदारांची पिळवणूक केली जात असल्याच्या तक्रारी असून, अनेकांच्या जमिनीही सावकारीच्या विळख्यात गेल्याची चर्चा आहे. या प्रकारामुळे श्रीवर्धन शहर व परिसरात खासगी सावकारीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कर्जाच्या वसुलीसाठी काही सावकारांकडून कर्जदारांवर मानसिक दबाव पान २ वर

## खोती जमिनींच्या मोजणीत ‘गोलमाल’?

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

- **केल्टेतील शेतकऱ्यांचा गंभीर आरोप**
- **नोटिसा, हद्द कायम आणि अभिलेखांबाबत चौकशीची मागणी**

म्हसळा तालुक्यातील केल्टे गावातील अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या खोती जमिनींच्या मोजणी व हद्द कायम प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक शेतकऱ्यांना कायद्यानुसार पूर्वसूचना न देता मोजणी करण्यात आली, काहींना मोजणी पूर्ण झाल्यानंतर नोटिसा देण्यात आल्या, तर चुकीचे मोबाईल क्रमांक अभिलेखात नोंदविल्यामुळे संबंधितांना प्रक्रियेची माहितीच मिळाली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

याबाबत केल्टे ग्रामस्थांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, स्थानिक आमदार आदिती तटकरे, खा. सुनील तटकरे पान २ वर

# रायगडच्या विकासाला नवी गती!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

- **पेणमध्ये १०० एकरांचा विकास प्रकल्पाचा करार**
- **ग्रोथ सेंटरमध्ये मॅपलट्रीसोबत करार**

पेणजवळ विकसित होत असलेल्या रायगड-पेण ग्रोथ सेंटरमध्ये १०० एकरांच्या मिश्र-वापर विकास प्रकल्पासाठी रायगड पेण ग्रोथ सेंटर लिमिटेड आणि मॅपलट्री यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या प्रकल्पातून १.१ अब्ज अमेरिकन डॉलरहून अधिक परकीय थेट गुंतवणूक अपेक्षित असून, रायगडातील उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

मॅपलट्रीकडून प्रकल्पासाठी आवश्यक गुंतवणूक तसेच देश-विदेशातील गुंतवणूकदार आणि जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सुरबाना ज्युरॉंग यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रकल्पाच्या आराखड्यापासून बांधकामाच्या गुणवत्ता नियंत्रणापर्यंत विविध कामांचे परीक्षण संस्थेकडून केले जाणार आहे.

पेण परिसरात सुमारे एक हजार एकर क्षेत्रावर बीकेसीच्या धर्तीवर शहरवजा विकासकेंद्र उभारण्याचे नियोजन आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीतून विकसित होणाऱ्या या केंद्रात उद्योग, व्यवसाय, शिक्षण आणि आधुनिक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याचा प्रयत्न आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीए आणि रेल्वे जोडणीमुळे पेण परिसराला मिळालेल्या भौगोलिक लाभाचा या प्रकल्पाला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

ग्रोथ सेंटरमुळे रायगडमध्ये जागतिक कंपन्या, व्यवसाय केंद्रे, शिक्षण संस्था आणि विविध उद्योग येण्याची शक्यता असून, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

### ३२ गावांच्या विकासालाही चालना

पेण, पनवेल आणि उरण तालुक्यातील ३२ गावांचा समावेश असलेल्या या व्यापक विकास क्षेत्राला आता एमएमआरडीएच्या माध्यमातून नियोजनबद्ध विकासाची दिशा मिळत आहे. पूर्वी विविध प्रकल्पांसाठी संपादित झालेल्या आणि वापराविना पडून असलेल्या जमिनींचा नियोजनबद्ध वापर करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

## मनोज जरांगे पुन्हा कडाडले!

**सोलापूर :** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला आंतरवालीत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. “मराठ्यांनो घर सोडायला शिका. २९ ऑगस्टला घरासमोर एकही गाडी राहू नये,” असे आवाहन त्यांनी सोलापुरातील दौऱ्यात केले. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारवर टीका करताना जरांगे यांनी कुणबी प्रमाणपत्रे आणि वैधता प्रमाणपत्रांबाबतही प्रश्न उपस्थित केले. आरक्षणाच्या मागणीसाठी आपण समाजाच्या हितासाठीसातत्यानेलढतअसल्याचे सांगत त्यांनी सर्व पक्षांतील मराठा बांधवांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

# विद्यालयाबाहेर नियमांची ऐशीतैशी!

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने शाळा व शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिसरात ‘स्टिंग’सह एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घातली आहे. मात्र, पनवेल महापालिका क्षेत्रातील काही शाळांच्या ५०० मीटर परिसरात बंदी असतानाही एनर्जी ड्रिंकची विक्री होत असल्याचे प्रत्यक्ष निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी नेमकी कितपत होत आहे, असा सवाल उपस्थित झाला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात एकूण २७२ शाळा आहेत. यामध्ये ५१ जिल्हा परिषद शाळा, ११ पनवेल महापालिकेच्या शाळा आणि २१० अनुदानित व विनाअनुदानित खासगी शाळांचा समावेश आहे. या शाळांमध्ये सुमारे १ लाख ७५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची माहिती उपलब्ध आहे. जुलै २०२६ मध्ये या सर्व शाळांचा प्रशासकीय कारभार महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या थेट नियंत्रणाखाली आणण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

सर्व २७२ शाळांच्या परिसरात नियमभंग होत पान२ वर




- **२७२ पैकी काही शाळांच्या ५०० मीटर परिसरात एनर्जी ड्रिंकची सर्रास विक्री**
- **पनवेलमध्ये शासनाच्या बंदीला हरताळ, कारवाईची मागणी**

### अचानक तपासणीची मागणी

पनवेल शहर, नवीन पनवेल, खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा आदी परिसरातील शाळांच्या आसपास अन्न व औषध प्रशासनाने अचानक तपासणी मोहीम राबवावी. ज्या ठिकाणी नियमभंग प्रत्यक्ष आढळून आला आहे, त्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच उर्वरित शाळांच्या परिसरातही नियमित तपासणी करून विद्यार्थ्यांना बंदी असलेली एनर्जी ड्रिंक सहज उपलब्ध होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

**१,४२२ योजनांवर डिजिटल देखरेख | चुकीची बिले आढळल्यास कारवाईचा इशारा**

# जलजीवनवर आता ‘सुजलाम’ची नजर!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामांवरून आधीच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना आता या योजनांवर ‘सुजलाम भारत’ अ‍ॅपची डिजिटल नजर राहणार आहे. कुठे योजना पूर्ण होऊनही नळ कोरडे, तर कुठे कामे अर्धवट असतानाच बिलांबाबत आरोप होत असल्याने प्रशासनाने प्रत्यक्ष कामाची नोंद आणि तपासणी करण्यासाठी डिजिटल पद्धतीचा आधार घेतला आहे. कामाची प्रत्यक्ष पाहणी, नकाशांकन आणि नोंद झाल्यानंतरच देयके अदा करण्याची प्रक्रिया राबविली जाणार असल्याने ठेकेदारांच्या कामकाजावरही आता अधिक काटेकोर लक्ष राहणार आहे.

पाणीटंचाई दूर करून ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या जलजीवन मिशनअंतर्गत रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये १ हजार ४२२ योजनांची कामे सुरू करण्यात आली. मात्र, अनेक ठिकाणी कामे अपूर्ण असून, काही योजना पूर्ण झाल्याचा दावा असतानाही नागरिकांना प्रत्यक्ष नळाद्वारे पाणी पान २ वर



### निधीअभावी योजनांनाही घरघर

जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांसाठी रायगड जिल्ह्याला तब्बल १३४ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र, त्यापैकी केवळ ८ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची माहिती ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. त्यामुळे निधीअभावी अनेक कामांना ब्रेक लागल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणावर कामे अपूर्ण असताना दुसरीकडे अपुरा निधी मिळत असल्याने योजनेच्या अंमलबजावणीसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे.

> जलजीवन योजनेंतर्गत संपूर्ण कामांसाठी १३४ कोटी रुपयांच्या निधीची गरज आहे. त्याव्यतिरिक्त आठ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. शासनाने ‘सुजलाम भारत’ अ‍ॅप सुरू केले असून, त्याद्वारे कामांचे डिजिटल मॅपिंग केले जाणार आहे. काम योग्य पद्धतीने पूर्ण झाल्यानंतरच ठेकेदाराच्या खात्यात देयक जमा केले जाईल. अधिक बिले काढल्याचे सध्या निदर्शनास आलेले नाही; मात्र याबाबत कनिष्ठ अभियंत्यांकडून माहिती घेण्यास सांगितले आहे.
> – सरवदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, राजिप



# महामार्गावर टोलचा झोल सुरूच!

## • टोलवसुलीविरोधात जनआक्रोश समिती आक्रमक

| माणगाव | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम वर्षानुवर्षे रखडलेले, अनेक ठिकाणी रस्ता अपूर्ण आणि प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून, टोलवसुली मात्र वेळेवर आणि पूर्ण करण्यात येत आहे. या विसंगतीविरोधात आता कोकणात संतापाची लाट उसळली आहे. खड्डे, धोकादायक वळणे, अपूर्ण पूल, अर्धवट सेवा रस्ते आणि वाहतूक कोंडीच्या छायेत प्रवास करणाऱ्या नागरिकांनी 'रस्ता अपूर्ण असेल तर टोल कशाचा?' असा थेट सवाल उपस्थित केला आहे.



याच मुद्द्यावरून जनआक्रोश समितीने आक्रमक भूमिका घेतली असून, मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. सुकेळी खिंड आणि पनवेल येथील टोलवसुलीसह महामार्गावरील अपूर्ण कामे आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा न्यायालयासमोर मांडला जाणार आहे.

वाहनचालक टोल भरतात, मात्र पुढे त्यांना खड्डे, धोकादायक डायव्हर्शन, अपूर्ण बांधकाम आणि वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. त्यामुळे 'जनतेकडून पैसा पूर्ण घेतला जातो, मग रस्ता अर्धवट का?' असा सवाल समितीने उपस्थित केला आहे. खा. सुनील तटकरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे महामार्गाच्या रखडलेल्या कामाचा प्रश्न मांडला असला, तरी प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. आता आश्वासनांपेक्षा कामाची ठोस कालमर्यादा आणि प्रवाशांची सुरक्षितता निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे.

महामार्ग पूर्ण होण्यापूर्वी सुरू असलेल्या टोलवसुलीची कायदेशीरता तपासावी, अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जनहित याचिकेत केली जाणार आहे.

दरम्यान, ९ ऑगस्ट रोजी मनसे अध्यक्ष राज ठाकरे रायगड दौऱ्यावर येणार असून, त्यांच्या कानावरही मुंबई-गोवा महामार्ग आणि टोलवसुलीचा प्रश्न घालण्यात येणार आहे. आमचा टोलला विरोध नाही; अपूर्ण आणि धोकादायक रस्त्यासाठी टोलला विरोध आहे. आधी महामार्ग पूर्ण करा, प्रवाशांना सुरक्षित करा आणि मगच टोल घ्या, अशी संतप्त मागणी करण्यात येत आहे.

# सावळे-हेदवली बससेवा सुरू करा

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत येथील एसटी आगारामधून सावळे-हेदवली अशी एसटी गाडी सुरू करावी, या मागणीसाठी स्थानिक ग्रामस्थ आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते आगार प्रमुख यांना भेटले. आगार व्यवस्थापक पृथ्वीराज भुताले यांनी लवकरच अशी एसटी सेवा सुरू करण्याची कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.



## • शिवसेना ठाकरे पक्षाची मागणी

सावळे आणि हेदवली गावातील ग्रामस्थ हे नियमितपणे बाजारासाठी, शिक्षणासाठी, वैद्यकीय उपचारासाठी, दैनंदिन कामांसाठी, तसेच नोकरीसाठी रोजंदारीसाठी शासकीय कामासाठी मुख्य बाजारपेठेला कडाव, कशेळे, कर्जत येथे जात असतात. परंतु गावातून बाजाराकडे व अन्य भागकडे जाण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून कोणतीही वाहतुक सेवा आजच्या घडीला सुरू नाही. त्यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना, महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना, नोकरदारांना जवळ जवळ पाच किलोमीटरचे अंतर पायपीट करून कापावे लागत असल्याने विद्यार्थी आणि महिलांचे प्रामुख्याने हाल होतात. विद्यार्थ्यांना खासगी प्रवासी वाहतुकीचा खर्च विद्यार्थ्यांना, महिलांना वरिष्ठ नागरिकांना परवडणारा नाही. त्यामुळे लवकरात लवकर सावळे हेदवली ग्रामस्यांचा मागणीचा सकारात्मक विचार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्जत यांच्यावतीने सावळे-हेदवलीसाठी एसटीच्या नवीन फेरी सुरु करण्याची मागणी तेथील विद्यार्थी, पालक यांनी केली. या आशयाचे निवेदन जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे,पक्षाचे तालुका प्रमुख बाजीराव दळवी आणि नामदेव धुळे यांनी एकत्र येऊन दिले. त्यावेळी एसटी आगार प्रमुख पृथ्वीराज भुताले, स्थानक व्यवस्थापक देवानंद मोरे आदी उपस्थित होते.

# गणेशोत्सवासाठी ढोलकी विक्रेते दाखल



> आम्ही देवाची आळंदी येथून श्रीवर्धनमध्ये वाद्ये विकण्यासाठी दरवर्षी येतो. आमचा हा पारंपरिक व्यवसाय आहे. मृदुंग, तबला, ढोलकी आणि पखवाज ही सर्व प्रमुख वाद्ये विक्रीसाठी आणली आहेत. यांची किंमत एक हजारपासून साडेतीन हजार रुपयांपर्यंत आहे. श्रीवर्धन येथे आल्यावर नेहमीच उत्तम अनुभव येतो. संपूर्ण तालुक्यातून नागरिकांचा आणि भजन मंडळांचा चांगला प्रतिसाद मिळतो.
>
> – लताबाई जगन्नाथ पवार (देवाची आळंदी)

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल्याने श्रीवर्धन शहरात बाप्पाच्या आगमनाची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. गणेशोत्सवाचा उत्साह अधिक वाढवण्यासाठी आणि आरती, भजनांचा गजर घुमवण्यासाठी शहरात ढोलकी विक्रेते दाखल झाले आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात श्रीवर्धन तालुक्यात प्रत्येक घरात आणि सार्वजनिक मंडळांमध्ये सायंकाळी होणाऱ्या आरती तसेच भजनांना विशेष महत्त्व असते. या भजनांमधील ताल धरण्यासाठी मृदुंग, पखवाज, तबला आणि ढोलकी यांसारख्या पारंपरिक वाद्यांना मोठी मागणी असते. हीच गरज ओळखून देवाची आळंदी येथून श्रीवर्धन येथे पारंपरिक कारागीर दाखल झाले आहेत. या विक्रेत्यांकडे विविध आकारांच्या आणि उत्तम नाद असणाऱ्या ढोलकी उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी रंगसंगतीतील ढोलकीपासून ते भजनासाठी लागणाऱ्या मोठ्या, उत्तम कातड्याच्या ढोलकीपर्यंत अनेक प्रकार ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. एक हजार रुपयांपासून ते साडेतीन हजार रुपयांपर्यंत ढोलकी उपलब्ध असून, नागरिक आणि भजन मंडळी खरेदीसाठी येत आहे.

# विवेक ठाकूर यांचा प्रामाणिकपणा

| खांब | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील पाले खुर्द येथील विवेक ठाकूर यांनी त्यांना मिळालेले पैशांचे पाकीट आणि त्या पाकिटात असलेली महत्त्वाची कागदपत्रे मूळ मालकास प्रामाणिकपणे परत करून आपल्यातील प्रामाणिकपणा दाखवून दिला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, विवेक ठाकूर यांना कोलाड येथील अमर चायनीज सेंटरजवळ रस्त्यावर पडलेले एक पाकीट सापडले. पाकीट उघडले असता त्यामध्ये ४७३२/- रू. व सोबतच डोमासाईल दाखला काढावयाची पावती, आधारकार्ड आणि अन्य डॉक्युमेंटस् आढळून आली. विवेक ठाकूर यांनी आधारकार्डवरून ज्यांचे पाकीट सापडले ते चिंचवली येथील सतीश मोरे यांच्याशी संपर्क साधला व त्यांच्या गावाजवळ जाऊन त्यांचे पाकीट परत केले.

# दोन कोटींच्या रस्त्याला महिनाभरातच तडे

## ■ महाड नगर परिषदेच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

| महाड | प्रतिनिधी |

महाड नगर परिषदेने गांधारी ब्रिज ते केभुर्ली हद्दीपर्यंत (मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गापर्यंतच्या) बनवण्यात आलेल्या दोन कोटींच्या रस्त्याला एक महिन्यातच तडे गेले. त्यामुळे रस्त्याच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना नगर परिषदेचे बांधकाम विभाग मात्र नरोवा कुंजोराची भूमिका अवलंबत असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

महाड नगरपरिषदेने गांधारी नदी ते केबुर्ली गावाच्या हद्दीपर्यंत ६०० मीटर रस्ता सिमेंट काँक्रिटमधून बनवण्याचे धोरण अवलंबिले यासाठी तब्बल २ कोटी २० लाख २१ हजार ४५० रुपयांचे काम सुनील कन्स्ट्रक्शन कंपनीला दिनांक ८.५.२०२६ रोजी या कामाची प्रशासकीय मंजुरी देऊन या कामाची मुदत ३६५ दिवस ठेवली. मात्र, सदरचे काम मूळ एजन्सीने पोट ठेकेदाराला दिल्याने ठेकेदाराने एक महिन्यामध्ये ६०० मीटर लांबी पैकी २५ मीटर लांबीचा रस्ता पूर्ण केला.



### पोट ठेकेदाराकडूनच कामाचे वाटोळे?

ज्या पोट ठेकेदाराला संबंधित एजन्सीकडून काम देण्यात आले, त्याने यापूर्वीदेखील महाड एसटी बस स्टॅन्ड ते मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग या रस्त्याच्या कामाचेही वाटोळे केले आहे. त्याच पद्धतीने रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून खर्डी नगर भुवन नेवाळेवाडी या रस्त्याचेदेखील वाटोळे केले आहे. हा वाटोळे करणारा ठेकेदार असून, यावर राज्यकर्ते फिदा असल्याने जनतेचे पैसे कसे वाया जातात याचे उत्तम उदाहरण महाडमधील गांधारी ब्रिज ते केभुर्ली गावाच्या आधीपर्यंत चाललेल्या नव्या सिमेंट काँक्रिटच्या रस्त्याला पडलेल्या भेगांवरून पाहण्यास मिळत आहे.

महाड नगर परिषदेने गांधारी पूल ते केभुर्ली गावाच्या हद्दीपर्यंत सिमेंट काँक्रिटचा रस्ता बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले. मात्र, काम चालू होऊन एक महिन्यातच पावसाळा चालू झाल्याने संबंधित एजन्सीनेचे काम करणाऱ्या पोट ठेकेदाराने ६०० मीटरपैकी अर्धे काम पूर्ण केले. मात्र, एक महिन्यातच या कामाच्या गुणवत्तेबाबत सुरुवातीपासूनच स्थानिक ग्रामस्थांच्या तक्रारी येत होत्या. अखेर या रस्त्याला मोठ्या प्रमाणावर तडे गेल्याने काम पूर्ण होईपर्यंत या रस्त्याच्या गुणवत्तेबाबत पारदर्शकता राहील का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. या रस्त्यावरून सावित्री नदी पात्रातून काढणाऱ्या गाळाचे डंपर व रेतीच्या अवजड वाहतुकीच्या गाड्या गेल्यास रस्ता पूर्णपणे खचून दोन कोटी रुपये नगर परिषदेचे सावित्रीच्या नदीच्या पाण्यात जाणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. एकंदरीत, या रस्त्याला गेलेल्या तड्यांबाबत महाड नगरपालिकेत आता कोणती भूमिका घेणार याकडे महाडकर जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. याबाबत महाड नगर परिषदेचे बांधकाम अभियंता प्रवीण कदम यांच्याशी विचारणा केली असता संबंधित कामाच्या ठिकाणी मी माझ्या सहकाऱ्यांसह जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून येतो, असे सांगितले.

पान १ वरून

## करोडोंच्या दानावर डल्ला मारणाऱ्या भाजपचा श्रीरामच अंत करतील!

मिळवण्याची गर्जना करण्यात आली होती; मात्र जनतेने महाविकास आघाडीला साथ देत नगराध्यक्षांसह दहा जागा जिंकून ही गर्जना हवेत विरवली, अशी टीका त्यांनी केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी यशासाठी मेहनत, सातत्य आणि परिश्रम आवश्यक असल्याचे सांगितले. जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप भोईर यांनी विद्यार्थ्यांच्या करिअर निवडीमध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. जिल्हा महिला संघटिका सुवर्णा जोशी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांनीही भाजपवर टीका करताना, कपटी मित्रापेक्षा दिलदार शत्रू कैकपटींनी चांगला, असा टोला लगावला. उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी उरणमधील रखडलेल्या विकासकामांवरून भाजपला धारेवर धरले. सत्ता हातात असूनही गेल्या बारा वर्षांपासून राजीव गांधी सभागृहाचे काम पूर्ण झालेले नाही, तसेच बायपास रस्त्याचे कामही रखडले असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, कार्यक्रमात उरण नगरपरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विजयी झालेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेवक व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला. विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्या प्रेरणा पाटील, पंचायत समितीचे उपसभापती परेश ठाकूर यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खोती जमिनींच्या मोजणीत 'गोलमाल'?

यांच्यासह महसूल सचिव, जिल्हाधिकारी आणि रायगड पोलीस अधीक्षकांकडे निवेदन दिले आहे. काही शेतकऱ्यांच्या अनुपस्थितीत त्यांना माहिती किंवा आपली बाजू मांडण्याची संधी न देता जमिनींची हद्द कायम करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच हद्द कायम करण्याच्या आदेशांवरील स्वाक्षऱ्या, शिक्के आणि प्रमाणीकरणाबाबतही शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. संबंधित कागदपत्रांच्या प्रतीही निवेदनासोबत जोडण्यात आल्याचे सांगण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेतील मोजणी नोंदी, नोटिसा, आदेश आणि महसूल अभिलेखांची स्वतंत्र तपासणी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित जमिनींचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**'गरीब शेतकरी विरुद्ध पैसेवाल्यांचे त्रिकूट'**

केल्टेतील मागासवर्गीय आणि इतर समाजातील गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीर व बोगस कागदपत्रांच्या आधारे, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता खरेदी-विक्री केल्या जात असल्याचा आमचा आरोप आहे. खोत, परप्रांतीय गुजराती-मारवाडी आणि दलालांचे त्रिकूट विरुद्ध गरीब शेतकरी अशी ही लढाई आहे. मात्र, ही लढाई आम्ही संविधानिक आणि कायदेशीर मार्गाने लढणार, असा इशारा स्थानिक शेतकरी देवेंद्र मेढेकर यांनी दिला.आता या गंभीर आरोपांची प्रशासनाकडून कितपत दखल घेतली जाते आणि चौकशीतून नेमके काय समोर येते, याकडे केल्टेतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## सावकारीचा जाच, गळ्याला फास!

आणला जात असल्याचे सांगितले जाते. अनेकदा सावकार आणि कर्जदारांमध्ये वाद होऊन प्रकरणे पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचतात. मात्र, व्यवहाराचे कोणतेही लेखी पुरावे नसल्याने कारवाई करताना अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र आहे. काही कर्जदारांनी मूळ रकमेच्या तीन-चार पट व्याज भरूनही कर्ज बाकी असल्याचे सांगितले जात असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे सावकारीच्या या विळख्यातून नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी होत आहे. दरम्यान, श्रीवर्धन परिसरातील काही कर्जदार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे खासगी सावकारीविरोधात तक्रारी करण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. यापूर्वीही अवाजवी व्याजाच्या कर्जाच्या तणावातून परिसरातील एका विवाहित तरुणाने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. त्यामुळे सावकारीचा हा विळखा वेळीच रोखला नाही, तर आणखी किती कुटुंबे उद्ध्वस्त होणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## विद्यालयाबाहेर नियमांची ऐशीतैशी!

असल्याचा दावा नाही. मात्र, काही शाळांच्या आसपास असलेल्या दुकानांमध्ये बंदी असतानाही एनर्जी ड्रिंकची विक्री होत असल्याचे आढळून आले आहे. शाळा सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांची या दुकानांमध्ये गर्दी होत असल्याने अल्पवयीन विद्यार्थ्यांना ही पेये सहज उपलब्ध होत आहेत.

एनर्जी ड्रिंकमध्ये कॅफिन आणि साखरेचे प्रमाण अधिक असू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून शासनाने शाळांच्या परिसरात अशा पेयांच्या विक्रीवर निर्बंध घातले आहेत. मात्र, बंदीच्या क्षेत्रातच विक्री होत असल्याचे आढळून आल्याने संबंधित यंत्रणांच्या तपासणी आणि अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पनवेल महापालिकेच्या शिक्षण विभागावर महापालिका क्षेत्रातील शाळांवर देखरेख ठेवण्याची जबाबदारी आहे. महापालिकेच्या अधिकृत माहितीनुसार शिक्षण विभाग प्राथमिक शिक्षण व्यवस्था, शाळांचे पर्यवेक्षण व नियंत्रण तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सुविधा पाहतो. दरम्यान, २७२ शाळा आणि सुमारे १.७५ लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न असल्याने शासनाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आता प्रशासनावर आहे.

## जलजीवनवर आता 'सुजलाम'ची नजर!

मिळत नसल्याची स्थिती आहे. दरम्यान, ६०० हून अधिक योजनांची कामे ५० टक्क्यांपेक्षा अधिक अपूर्ण असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच सुमारे १७० योजनांमध्ये २५ टक्क्यांहून अधिक कामे बाकी असून, या योजनांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही अनेक गावांमधील नागरिकांची पाण्यासाठीची भटकंती कायम असल्याचे चित्र आहे. अलिबाग, महाड, पोलादपूर, पेण, माणगाव, रोहा, कर्जत, खालापूर यांसह जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. जलजीवन मिशनमध्ये प्रतिमाणसी दररोज किमान ५५ लीटर पाणी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. मात्र, विहिरी बांधणे, पाईपलाईन टाकणे, नळजोडण्या करणे अशी कामे झाल्यानंतरही प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू नसल्याने योजनेच्या परिणामकारकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**अपूर्ण कामे, पूर्ण बिलांचा आरोप**

जलजीवन योजनेतील कामे अपूर्ण असतानाही पूर्ण बिले काढली जात असल्याचे आरोप जिल्हा परिषद सदस्यांकडून करण्यात आले आहेत. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने योजनेचा बोजवारा उडाल्याचा आरोप जिल्हा परिषद अध्यक्षांकडूनही करण्यात आला होता. त्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवरही सवाल उपस्थित झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर 'सुजलाम भारत' ॲपच्या माध्यमातून कामांची प्रत्यक्ष नोंद आणि डिजिटल मॅपिंग करण्यात येणार आहे. पाण्याचा स्रोत, कामाचे स्वरूप, पाण्याची गुणवत्ता, पुरवठ्याचा दाब आणि प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची स्थिती यासह आवश्यक माहिती डिजिटल पद्धतीने नोंदविली जाणार आहे. त्यामुळे कागदावरील काम आणि प्रत्यक्षातील काम यातील फरक तपासणे शक्य होणार आहे.

**अधिक बिले काढणाऱ्यांवर कारवाई**

काम अपूर्ण असताना पूर्ण बिले काढल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशारा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दिला आहे. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर कार्यकारी अभियंत्यांनी जिल्ह्यातील कनिष्ठ अभियंत्यांकडून माहिती मागविण्यास सुरुवात केली आहे. प्रत्यक्ष कामापेक्षा जास्त बिले काढल्याचे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**फक्त आठ कोटींचा निधी; गरज १३४ कोटींची**

जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात १ हजार ४२२ योजनांची कामे सुरू आहेत. त्यासाठी मोठ्या निधीची आवश्यकता असताना शासनाकडून आतापर्यंत केवळ आठ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. १३४ कोटींची गरज आणि प्रत्यक्षात मिळालेला तुटपुंजा निधी यामुळे रखडलेल्या योजनांना गती कशी मिळणार, हा प्रश्न कायम आहे. त्यामुळे केवळ डिजिटल देखरेखीबरोबरच शासनाने आवश्यक निधीही तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

## पिकअपच्या धडकेत महिला ठार

दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शिवाजी चौक परिसरातील अतिक्रमणांमुळे यापूर्वीही अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. रस्त्याच्या कडेला असलेले भाजीविक्रेते, हातगाड्या आणि अन्य अतिक्रमणांमुळे पादचारी व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घटनेनंतर ग्रामपंचायतीने प्राथमिक आरोग्य केंद्र ते हॉटेल लेकव्ह्यूपर्यंतची अतिक्रमणे दोन दिवसांत हटविण्याचा इशारा दिला आहे.

## क्लासमध्ये मुलींसोबत अश्लील कृत्य

आणखी एका पीडित मुलीसोबत अश्लील चाळे करून तिला पॉर्न व्हिडिओ दाखवली. या प्रकाराची माहिती दुसऱ्या क्लास टीचर संस्कार कदम यांना सांगितले असता त्याने कोणाला सांगू नको, असे सांगितले. त्यामुळे संस्कार कदम याच्याविरोधातदेखील खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## आरोपीचा पोलिसांवर हल्ला

कोर्टाच्या आत येऊन न दिल्याचा राग आल्याने आरोपीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस पथक आणि पोलीस हवालदार यांना शिवीगाळ केली आणि एका पोलीस हवालदाराने त्याला पकडून ठेवण्याचा राग आल्याने त्याने पोलिसाच्या तोंडावर लाथ मारली आणि सरकारी कामात अडथळा आणला.

# आयसीएमए परीक्षेत सानिका पारखेचे यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

तालुक्यातील सानिका पारखे हिने दि. ६ ऑगस्ट रोजी जाहीर झालेल्या आयसीएमए (इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अलिबाग तालुक्याचा नावलौकिक वाढविला आहे. सानिकाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल अश्विनी टीचर यांनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



आयसीएमए ही देशातील वाणिज्य, लेखांकन, खर्च लेखांकन, आर्थिक व्यवस्थापन आणि उद्योग क्षेत्रातील एक प्रतिष्ठित व्यावसायिक पात्रता मानली जाते. या परीक्षेत यश मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, विषयांवरील सखोल आकलन आणि कठोर परिश्रम आवश्यक असतात. अशा स्पर्धात्मक परीक्षेत सानिकाने मिळविलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद मानले जात आहे.

सानिकाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिच्यावर कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# माजी विद्यार्थी संघटनेच्या स्थापनेवर आक्षेप

| कोर्लई | प्रतिनिधी |

राज्य शासनाच्या शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार मुरुड येथील जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस. ए. हायस्कूलमध्ये नुकतीच स्थापन करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी संघटनेला माजी विद्यार्थ्यांनीच तीव्र विरोध दर्शविला आहे. सध्याची संघटना रद्द करून सर्व माजी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन नव्याने अधिकृत, सर्वसमावेशक व प्रतिनिधिक माजी विद्यार्थी संघटना स्थापन करावी, अशी मागणी माजी विद्यार्थ्यांनी संस्थेचे अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापक यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, शंभर वर्षांहून अधिक गौरवशाली परंपरा लाभलेल्या सर एस. ए. हायस्कूलने हजारो विद्यार्थी घडविले असून विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले अनेक माजी विद्यार्थी या संस्थेचे ऋणी आहेत. मात्र, ३१ जुलै २०२६ रोजी स्थापन करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी संघटनेची प्रक्रिया अत्यंत मर्यादित माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत पार पडली. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,कोषाध्यक्ष आदी पदांची निवड सर्व माजी विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता करण्यात आल्याने अनेकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. माजी विद्यार्थ्यांच्या मते, संघटना ही सर्वांची असल्याने तिची स्थापना पारदर्शक, लोकशाही पद्धतीने आणि सर्वसमावेशक स्वरूपात होणे आवश्यक आहे. प्रत्येक उत्तीर्ण बॅचमधून किमान दोन पुरुष व दोन महिला प्रतिनिधींचा समावेश करून व्यापक संघटना उभारावी. तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांना पूर्वसूचना देऊन संस्थेचे सचिव व मुख्याध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकृत सर्वसाधारण सभा घेऊन संघटनेची निवड करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यापासून संघटना उभारणीपर्यंत आवश्यक ते सहकार्य करण्याची तयारीही माजी विद्यार्थ्यांनी दर्शविली आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी कडसुरेत वृक्षारोपण

| नागोठणे | प्रतिनिधी |

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून, अशा लोकोपयोगी उपक्रमांना रिलायन्स व्यवस्थापन नेहमीच सहकार्य करेल, असा विश्वास रिलायन्स नागोठणे कंपनीचे इंडस्ट्रियल रिलेशन हेड श्रीकांत गोडबोले यांनी व्यक्त केला.



भारतीय श्रमिक शक्ती संघ युनियन रिलायन्स नागोठणे युनिट, भारतीय कामगार सेना रिलायन्स नागोठणे युनिट व सीएसआर विभाग रिलायन्स नागोठणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कडसुरे (ता. रोहा) येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या वृक्षारोपण कार्यक्रमाला रिलायन्स कंपनीचे इंडस्ट्रियल रिलेशन हेड श्रीकांत गोडबोले, भारतीय श्रमिक शक्ती संघाचे कार्याध्यक्ष दिपक रानवडे, वरिष्ठ सल्लागार सुभाष खराडे, केंद्रीय सचिव संजय काकडे, नागोठणे युनिट अध्यक्ष किशोर शिर्के, रिलायन्सचे अधिकारी योगेश तलोड, अमोल सोनावणे, सीएसआर विभागाच्या वरदा कुलकर्णी, नागोठणे पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक नरेश थळकर, पोलीस हे. कॉ. मिलिंद महाडिक, पोलीस शिपाई स्वप्नील भालेराव, बळी पुट्टेवाड आदी उपस्थित होते.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# मुरुडमधील मच्छिमारांची हंगामी कसरत

## ।। १५ ऑगस्टपासून मासेमारीला सुरुवात।। अद्ययावत जेट्टी नसल्याने कोळी बांधवांची दमछाक

। आगरदांडा । गणेश चोडणेकर ।

मासेमारी हा कोळी समाजाच्या उपजीविकेचा प्रमुख आधार आहे. मासेमारी हंगाम सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने मच्छीमार बांधवांमध्ये लगबग वाढली आहे. यंदा आगामी १५ ऑगस्टपासून मच्छीमारी हंगामाला सुरुवात होणार असल्याने बोटींची दुरुस्ती, जाळ्यांची डागडुजी, इंजिनची तपासणी, बोटीची रंगरंगोटी तसेच आवश्यक साहित्याची खरेदी करण्याची कामे जोरात सुरू आहेत. मात्र, मुरूडमध्ये अद्यावत अशी जेट्टी नसल्यामुळे प्रत्येक हंगामात बोटीत साहित्य भरताना मच्छीमारांना शारीरिक कष्ट सहन करावे लागत असून, त्यांची अक्षरशः दमछाक होत आहे. दरम्यान, मच्छीमारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच मासेमारी व्यवसायाला चालना देण्यासाठी या भागात अद्यावत अशी जेट्टी उभारण्याची आवश्यकता असल्याचे कोळी बांधवांमधून बोलले जात आहे.


● (छायाचित्र : सुधीर नाझरे)

मासेमारी हंगामाची चाहूल लागताच मुरूडमधील कोळीवाड्यांमध्ये मच्छीमार बांधवांची लगबग सुरू झाली आहे. पावसाळ्यातील बंदीनंतर तब्बल तीन महिन्यांनंतर पुन्हा एकदा समुद्रात मासेमारीसाठी जाण्याची तयारी मच्छीमारांकडून करण्यात येत आहे. यादरम्यान, अनेक ठिकाणी बोटी किनाऱ्यावर आणून त्यांची रंगरंगोटी व दुरुस्ती केली जात आहे. तसेच, खराब झालेली मासेमारीची जाळी बदलणे आणि नवीन जाळी तयार करण्याचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. तसेच, समुद्रात जाण्यापूर्वी बोटीमध्ये जाळी, डिझेल, बर्फ, खाद्यसामग्री, पाणी तसेच मासेमारीसाठी आवश्यक साहित्य भरण्याची कामे वेगाने सुरू आहेत. नवीन हंगामात चांगली मासळी मिळून उत्पन्न वाढेल, अशी अपेक्षा मच्छीमार व्यक्त करत आहेत. मासेमारी सुरू झाल्यानंतर बाजारपेठेत ताज्या मासळीची आवक वाढण्याची शक्यता असून, ग्राहकांनाही विविध प्रकारच्या मासळीचा पुरवठा होणार आहे. हंगामाच्या पार्श्वभूमीवर मच्छीमार कुटुंबांमध्येही उत्साहाचे वातावरण असून, गेल्या काही दिवसांपासून तयारीला वेग आला आहे. मात्र, असे असताना मुरूड तालुक्यात अद्यावत अशी जेट्टी नसल्यामुळे येथील मच्छीमारांना किनाऱ्यावर बोटी उभ्या करण्यासाठी तसेच बोटीत साहित्य चढविण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे मुरूडमधील मच्छीमारांना जड सामान डोक्यावर किंवा खांद्यावर घेऊन किनाऱ्यापासून बोटीपर्यंत जाण्याची वेळ येत आहे. त्यातच खडक आणि उथळ पाण्यातून वाट काढताना सामान बोटीपर्यंत पोहोचवणे अधिकच त्रासदायक ठरत आहे. तसेच, भरतीच्या वेळी कोळी बांधवांना एकदरा खाडीत बोटी टाकून त्या पुलाजवळ उभ्या करून कापडाच्या आधारे त्यात बर्फासह इतर सामान बोटीत उतरावे लागत आहे. यादरम्यान, बोटीत साहित्य भरताना मच्छीमारांना शारीरिक कष्ट सहन करावे लागत असून, त्यांची अक्षरशः दमछाक होत आहे. त्यामुळे मच्छीमारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच मासेमारी व्यवसायाला चालना देण्यासाठी या भागात अद्यावत अशी जेट्टी उभारण्याची आवश्यकता असल्याचे कोळी बांधवांमधून बोलले जात आहे.

> **मुरुड समुद्रकिनारी अद्यावत जेट्टी नसल्याने मच्छीमार कोळी बांधवांना अनेक वर्षांपासून मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आताच्या सरकारने ग्रोयन्स बंदर मंजूर केले असून, त्याचे नुकतेच भुमीपुजन झाले आहे. त्यामुळे या बंदराचे काम लवकरात लवकर सुरू करुन मच्छीमार कोळी बांधवांना दिलासा द्यावा.**
> **- मनोहर बैले, संचालक, राज्य मच्छीमार संघ**

# अखेर ई-टॉयलेट बदलले

। नेरळ । प्रतिनिधी ।



माथेरान शहरात ई-टॉयलेट बसविण्यात आलेल्या आहेत. त्यातील एका ई-टॉयलेटमध्ये नुकतीच एक महिला पर्यटक अडकून पडल्याची घटना होती. त्या महिला पर्यटकाच्या व्हायरल व्हिडिओमुळे माथेरान नगरपरिषदेची मोठी बदनामी झाली होती. त्यामुळे, माथेरान नगरपरिषदेकडून त्या नादुरुस्त ई-टॉयलेटच्या ठिकाणी नवीन ई-टॉयलेट बसविण्यात आले आहे.

माथेरान शहरात पर्यटकांच्या सोयीसाठी माथेरान नगरपरिषदेकडून ई-टॉयलेट ही संकल्पना राबवली आहे. शहरात आठ ठिकाणी हे ई-टॉयलेट उभारले असून, एक ई-टॉयलेट तब्बल ३८ लाख खर्चून खरेदी केल्याची माहिती मिळत आहे. इको पॉईंट नाक्यावर असलेल्या ई-टॉयलेटमध्ये पर्यटक महिला अडकली होती. तासाभराने घामाघूम झालेल्या महिला पर्यटकाची सुटका झाली होती; मात्र, हा विषय प्रचंड गाजला होता. त्यानंतर माथेरान नगरपरिषद अध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी तातडीने इको पॉईंट नाक्यावरील ई-टॉयलेटची पाहणी केली. त्यानंतर मुख्याधिकारी यांना संपर्क करीत ई-टॉयलेट ठेकेदाराला तत्काळ बोलावून घेण्याची सूचना केली. या ई-टॉयलेटबद्दल तातडीने पाऊले उचलत माथेरान नगरपरिषदकेडून नवीन ई-टॉयलेट बसविण्यात आले आहे. त्यामुळे माथेरानमधील सर्वाधिक गाजवलेल्या इको पॉईंट नाक्यावरील ई-टॉयलेट ही पर्यटकांच्या सेवेत पुन्हा आले आहे.

# निवडक

## ट्रेडिंगच्या आमिषाने लाखोंची फसवणूक



**पनवेल** : टेलिग्रामवरील बनावट ट्रेडिंग ग्रुपच्या माध्यमातून अधिक नफ्याचे आमिष दाखवून तब्बल १९ लाख ९० हजार १२५ रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटन घडली आहे. दरम्यान, फसवणूक करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी मध्य प्रदेशातून ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेंद्र लोकेंद्रसिंह बैस असे फसवणूक करणाऱ्याचे नाव असून, त्याने तक्रारदाला प्रथम व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. त्यानंतर टेलिग्रामवरील एका ग्रुपमध्ये जोडत ऑनलाइन ट्रेडिंगमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. पुढे दुसऱ्या टेलिग्राम खात्यामार्फत ट्रेडिंगसंदर्भातील सूचना देत वेळोवेळी रक्कम गुंतविण्यास सांगण्यात आले. काही दिवसांनी नफा झाल्याचे भासवून पैसे काढण्यासाठी आणखी रक्कम भरण्याची मागणी करण्यात आली. अशा प्रकारे तक्रारदाराचा विश्वासार्हता संपादन करून योगेंद्र बैस याने १९ लाख ९० हजार १२५ रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणाचा तपास करत असताना योगेंद्र लोकेंद्रसिंह बैस (२३) याला मध्य प्रदेश येथून ताब्यात घेतले.

## पनवेल शहरातून दुचाकीची चोरी

**पनवेल** : पनवेल शहरातील गुणे हॉस्पिटलसमोर उभी करून ठेवलेली दुचाकी चोरील गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोरबे येथील रामदास मारुती भोपी (५२) यांनी त्यांची काळ्या रंगाची हिरो एचएफ डिलक्स दुचाकी गुणे हॉस्पिटलसमोर उभी करून ठेवली होती. काही वेळाने परत आल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे चोरट्याने त्यांची दुचाकी चोरून नेल्याचे स्पष्ट झाले. चोरीस गेलेल्या दुचाकीची अंदाजे किंमत २५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रज्ञा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**पनवेल** : शहर पोलिसांनी जुगारविरोधी विशेष कारवाई करत पनवेल महानगरपालिकेच्या पाठीमागील क्रिकेट ग्राउंडलगत असलेल्या परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या छाप्यात सात जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्याकडून ३ हजार ४८० रुपयांची रोख रक्कम, आकडे लिहिलेली दोन नोटबुक आणि इतर साहित्य असा एकूण ३ हजार ४८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील, पोलीस उपनिरीक्षक पठाण, पोलीस नाईक अनिल चव्हाण, सम्राट डाकी, पोलीस कॉन्स्टेबल साईनाथ मोकल आणि तुकाराम गोडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## गणेशोत्सवानिमित्त मोफत बससेवा

**महाड** : गणेशोत्सवानिमित्त मुंबई, पुणे, ठाणे, नालासोपारा तसेच राज्यातील विविध शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेल्या महाडमधील नागरिकांना आपल्या गावी सुखरूप आणि विनामूल्य पोहोचता यावे, यासाठी शिरगावचे सरपंच तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांच्या पुढाकाराने सलग पाचव्या वर्षी मोफत एसटी बससेवेचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यंदा दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी ही मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून, बस बुकिंगसाठी दि. ५ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत नोंदणी करता येणार आहे.

# अलिबागेत चिंचेच्या झाडाखाली मटका अड्डा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागजवळील विद्यानगर येथे एका चिंचेच्या झाडाखाली सुरू असलेल्या अवैध मटका जुगारावर अलिबाग पोलिसांनी बुधवारी (दि.५) छापा टाकला. मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस शिपाई प्रशांत लोहार यांच्या तक्रारीनुसार, अतिश म्हात्रे असे या मटका जुगार चालविणाऱ्याचे नाव आहे. हा विद्यानगर येथील तलावाच्या बाजूला असलेल्या चिंचेच्या झाडाखाली कल्याण नावाच्या मटका जुगाराचा अड्डा चालवित होता. याबाबतची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बुधवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या छाप्यात रोख रक्कमेसह मटका जुगाराचे साहित्य असा एकूण १ हजार ९०० रुपयांचा साठा आढळून आला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार प्रितेश चव्हाण करीत आहेत.

# अपघातामुळे पळसदरी ग्रामस्थ आक्रमक

। नेरळ । प्रतिनिधी ।

खोपोली-कर्जत या महामार्गावरील पळसधरी ते हाळ या रस्त्यावर वारंवार अपघात होऊन लोक मृत्युमुखी पडत आहेत. तर, कर्जत-चौक रस्त्याची स्थिती देखील 'अपघातांचा रस्ता' अशी झाली आहे. त्यामुळे या भागातील स्थानिक ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. दरम्यान, खोपोली-कर्जत या राष्ट्रीय महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्याची तयारी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.



कर्जत-खोपोली राष्ट्रीय महामार्गावरील पळसदरी या रस्त्यावर होत असलेल्या दुर्घटनेनंतर अपूर्ण रस्ता, अपुऱ्या सुरक्षाव्यवस्था आणि सूचना फलकांच्या अभावामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. कर्जत तालुक्यातील भूसंपादन प्रक्रियेसंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी स्पष्ट आदेश दिले असूनही संबंधित प्रकरणात अद्याप प्रभावी कार्यवाही झालेली दिसून येत नाही. दरम्यान, अॅड. निगुडकर यांनी कर्जत-खोपोली रस्त्यावरील धोकादायक ठिकाणी तातडीने सुरक्षा उपाययोजना, बॅरिकेड्स व सूचना फलक उभारावेत, अन्यथा १५ ऑगस्टनंतर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. अॅड. प्रदीप सुर्वे यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षांपासून या राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक ठिकाणी रखडले आहे. भूसंपादन प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे रस्ता अपूर्ण राहिला असून, त्यामुळे वारंवार अपघात होत आहेत. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# दहशतवादी हल्ल्याचे वास्तवदर्शी मॉकड्रिल

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे येथील कंपनीच्या मटेरियल गेटमधून दोन सशस्त्र बंदूकधारी अतिरेकी सुरक्षारक्षकांना घायाळ करून कंपनीच्या आर्पेट प्लांटमध्ये घुसले आहेत, ही खबर सगळीकडे पसरली. कंपनी सुरक्षा अधिकाऱ्यांनी लगेचच यावर उपाययोजना सुरू केली. कंपनीच्या एसएसएम ऑफिसला याची सूचना मिळताच त्यांनी त्वरित हेड एच.आर., कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंट, कंपनीचे सर्व डिपार्टमेंट हेड, फायर ब्रिगेड फॅमिली वेल्फेअर सेंटर यांना त्वरित सतर्क करून त्याची माहिती दिली.



कंपनीच्या आर.जी.एस.एस या सिक्युरिटी एजन्सीने मार्केटिंग बिल्डिंगच्या कंट्रोल रूमचा ताबा घेतला व त्या ठिकाणाहून पुढील कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. कंपनीच्या कॉर्पोरेट अफेयर्स डिपार्टमेंट कडून नागोठणे पोलीस स्टेशन, एसपी रायगड, डि.वाय. एस.पी. रोहा, जिल्हाधिकारी कार्यालय, रोहा व पेण मधील प्रांताधिकारी आणि तहसीलदार या संबंधित कार्यालयांना या घटनेविषयी माहिती देण्यात आली. डी.वाय.एस.पी प्रसाद गोकुळे यांनी संबंधित पोलीस यंत्रणेला कळविले. नागोठण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी, क्यूआरटी आरसीपी राईट कंट्रोल प्लेटून, बॉम्ब डिटेक्शन डिस्पोजल स्काड, अँटी टेररिस्ट स्कॉड रोहा डिव्हिजन व अँटी टेररिस्ट स्कॉड मुंबई डिव्हिजन यांना त्वरित पाचारण केले. अतिरेकी आत घुसल्यानंतर त्यांनी कंपनीच्या आर्पेट प्लांटच्या कंट्रोल रूमचा ताबा घेतला व तिथे तिघांना ओलीस ठेवले. या अतिरेक्यांकडे मोठ्या प्रमाणात स्फोटके होती, त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा विचार करून संबंधित पोलीस यंत्रणा अतिरेक्यांपर्यंत पोहोचली आणि त्यांनी त्या बंदी केलेल्या तिघा ओलिसांची सुटका केली.शेवटी पोलिसांनी त्या दोन्ही अतिरेक्यांना पकडून नेले व या खतरनाक लेव्हल टू मॉक ड्रिलचे उद्दिष्ट संपन्न झाले.

# नागोठण्यात आरोग्य, नेत्र तपासणी शिबीर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून रिलायन्स फाऊंडेशनच्या नागोठणे सीएसआर विभागाच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रोहा येथील आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्थेच्या विनंतीनुसार हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हे शिबीर रविवारी (दि.९) सकाळी साडेअकरा वाजता नागोठण्यातील श्री शिव गणेश उत्सव मंडळाच्या सभागृहात पार पडणार आहे. या शिबिरात आदिवासी बांधवांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच नेत्र तपासणी करण्यात येणार असून, आवश्यक आरोग्यविषयक



मार्गदर्शन आणि पुढील उपचारांबाबत वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन रिलायन्स फाऊंडेशनच्या नागोठणे सीएसआर विभागाकडून करण्यात आले आहे. तसेच, या शिबिराला अलिबाग लायन हेल्थ फाऊंडेशनचे वैद्यकीय व तांत्रिक सहकार्य लाभणार आहे.

# उबर ऑटो सेवेचा शुभारंभ




। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांच्या सुविधेत आणखी भर पडली असून, विमानतळाच्या ऑटो पिकअप झोनमध्ये उबर ऑटो सेवा अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. या नव्या सुविधेमुळे विमानतळावर येणाऱ्या तसेच विमानतळावरून पुढील प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि सुलभ वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. सध्या उबर ऑटो सेवा दररोज सकाळी ६.०० ते मध्यरात्रीनंतर दीड वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. प्रवाशांचा प्रतिसाद, मागणी आणि सेवा संचालनाचा आढावा घेऊन भविष्यात ही सेवा २४ तास सुरू करण्याचाही विचार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यापूर्वीच इतर सेवा पुरवठादारांकडून मध्यरात्री १२.०० वाजेपर्यंत कॅब सेवा उपलब्ध आहे.

# रेल्वेच्या धडकेत व्यक्तीचा मृत्यू

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल रेल्वेच्या धडकेत एका पुरुषाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोयंजे रेल्वे विभागाकडून मोठे भिंगार गावाजवळ एका पुरुषाला रेल्वेची धडक लागल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पाहणी केली असता, त्याचे अंदाजे वय ३५ वर्षे असून, तो गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

# रोह्यातील रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

। चणेरा । प्रतिनिधी ।

प्रवाशांच्या रिक्षेत राहिलेल्या मौल्यवान वस्तू प्रामाणिकपणे परत करण्याची परंपरा रोह्यातील रिक्षाचालकांनी पुन्हा एकदा जपली आहे. श्री धावीर महाराज रोहा रिक्षा चालक-मालक संघटनेचे रिक्षाचालक शाहबाज नाटुस्कर यांनी रिक्षेत विसरलेली एका महिलेची पर्स शोधून ती तब्बल ९ हजार रुपयांच्या रोकडसह सुखरूप परत केली आहे.



दि. ६ ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास संबंधित महिला शाहबाज नाटुस्कर यांच्या रिक्षातून अष्टमी ते भुवनेश्वर असा प्रवास करत होती. भुवनेश्वर येथे महिलेला सोडल्यानंतर शाहबाज घरी गेले. त्यानंतर रिक्षाची साफसफाई करत असताना त्यांना प्रवाशाची पर्स रिक्षेत आढळून आली. पर्स सापडताच शाहबाज यांनी विलंब न करता श्री धावीर महाराज रिक्षा चालक-मालक संघटनेतील सहकाऱ्यांना याबाबत माहिती दिली. दरम्यान, दुसऱ्या दिवशी सकाळी पर्स हरवल्याचे महिलेच्या लक्षात आले. पर्सचा शोध घेत ती रिक्षा स्थानकात आली. त्यावेळी संघटनेतील रिक्षाचालकांनी शाहबाज नाटुस्कर यांना बोलावून घेतले. महिलेची योग्य ती शहानिशा केल्यानंतर ९ हजार रुपयांच्या रोकडेसह संपूर्ण पर्स तिच्या स्वाधीन करण्यात आली.

## युवा महोत्सवात गाजवला दक्षिण विभाग | तालवाद्यात प्रथम, तर लोकनृत्यात तृतीय क्रमांक

# एलएसपीएम महाविद्यालयाची दमदार कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी

मुंबई विद्यापीठाच्या ५९व्या युवा महोत्सवात अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यावेळी तालवाद्य स्पर्धेत विद्या आकाश पाटील याने प्रथम, तर लोकनृत्य स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. हा युवा मोहात्सच मुंबई विद्यापीठांतर्गत अलिबाग तालुक्यातील वेश्वी





येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी येथे उत्साहात पार पडला.

या स्पर्धेत तब्बल २२ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. या युवा महोत्सवात रायगड दक्षिण विभागातील विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये एल.एस.पी.एम. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कलागुणांची छाप उमटवली आहे. यावेळी तालवाद्य (पखवाज वादन) स्पर्धेत आकाश पाटील याने प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच, लोकनृत्य 'धुमाळी नाच' स्पर्धेत तनुजा मुंडे, समीक्षा घरत, पायल सपकाळ, श्रुतिका दवणे, प्रिया शहा, राजेश वाघमारे, जयेश वाघमारे, नावीन्य वर्तक, नील अष्टमकर आणि प्रणल म्हात्रे यांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र ठाकूर, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, कार्यवाह राजेंद्र ठाकूर, सहकार्यवाह जगन्नाथ पेढवी, खजिनदार राजेंद्र शिंदे, कायम सदस्य अॅड. प्रवीण ठाकूर, संचालक राजनभाई नार्वेकर, सुनील थळे, मनोहर म्हात्रे, किरण ठाकूर तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच, महाविद्यालयाच्या प्राचार्या लिना पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दर्शना तोडणकर, प्रा. सचिन गोंधळी, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पनवेलमध्ये तिरंगी रंगांची धूम

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने पनवेल शहरातील बाजारपेठांमध्ये तिरंगी रंगांची रेलचेल पाहायला मिळत आहे. राष्ट्रध्वज, तिरंगी टी-शर्ट, कुर्ते, लहान मुलांचे आकर्षक पोशाख, टोपी तसेच विविध सजावटीच्या वस्तूंनी दुकाने सजली आहेत. विशेषतः लहान मुलांसाठी तयार करण्यात आलेल्या तिरंगी पोशाखांना पालकांकडून चांगली मागणी होत आहे. तिरंगी रंगातील फ्रॉक, टी-शर्ट आणि पारंपरिक पोशाखांसह हातातील छोटे राष्ट्रध्वज व आकर्षक पवनचक्क्याही बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमांमध्ये



सहभागी होण्यासाठी शाळकरी मुले आणि नागरिकांकडून या वस्तूंची खरेदी केली जात आहे. दुकानदारांनीही ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानांमध्ये तिरंगी सजावट केली आहे.पनवेलमधील बाजारपेठेत सकाळपासूनच नागरिकांची खरेदीसाठी वर्दळ वाढू लागली असून, येत्या काही दिवसांत तिरंगी वस्तूंच्या विक्रीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# निवडक

## विद्यार्थ्यांना जिजाऊ फाउंडेशनचा आधार



**तळा :** तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विभाग, गो.म. वेदक विद्यामंदिर, कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय आणि द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्यावतीने हा कौतुकास्पद उपक्रम राबवण्यात आला. यावेळी जिजाऊ सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी तळा तालुक्यातील मोठे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना जिजाऊ फाऊंडेशनच्यावतीने पूर्ण सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. २००८ पासून ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या ५ जिल्ह्यांमध्ये जनसेवेचा डोंगर उभा करणारे संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या कार्यक्रमाप्रसंगी तालुक्यातील राजकीय पदाधिकारी, शाळा समिती सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाळेला शैक्षणिक उपकरणे भेट



**श्रीवर्धन :** आदिवासी आणि गरजू विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळावे, या सामाजिक बांधिलकीतून श्रीवर्धन तालुक्यातील सन्मित्र सेवा संस्थेच्यावतीने विशेष उपक्रम राबवण्यात आला. जनता शिक्षण संस्था संचलित श्री मोहनलाल सोहनी विद्यालय बोर्ली पंचतन येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच, शाळेला शैक्षणिक उपकरणे भेट देण्यात आली. या उपक्रमास प्रमुख अतिथी उदय बापट लाभले होते. संस्थेच्यावतीने गेल्या अनेक वर्षांपासून हा सामाजिक उपक्रम सातत्याने चालवला जात आहे. यावर्षी मनीष भेडा, हर्षद जैन, वसीम फकजी, अंकुर माने आणि हिरू शिर्के यांच्या विशेष सहकार्यातून विद्यार्थ्यांना वही-पेनसह शालेय उपयोगी साहित्य वितरित करण्यात आले. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक शिक्षणासाठी प्रशालेला सूक्ष्मदर्शक पृथ्वीचा गोल आणि जिओमेट्रिक बॉक्स भेट देण्यात आला.



## विद्यार्थ्यांसाठी बांबू प्रशिक्षण कार्यशाळा

**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ संचलित अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द येथे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी दोन दिवसीय बांबू प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्या बांबू कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला श्रीनिवास वारखंडकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच, सुरेश दारवा या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देत विविध बांबू वस्तू तयार करण्याचे कौशल्य शिकविले. या कार्यशाळेत विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी बांबूपासून ज्वेलरी, पेन स्टँड, राखी, चटई तसेच विविध आकर्षक वस्तू तयार केल्या. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंना पालक, कलाप्रेमी यांच्याकडून मोठी दाद मिळाली.

## विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य कार्यशाळा



**खांब :** आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास घडविण्याच्या उद्देशाने जीवन कौशल्ये कार्यशाळा रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे यशस्वीरित्या पार पडली. धाटाव औद्योगिक वसाहतीतील नामांकित सुदर्शन केमिकल्स कंपनीच्या सीएसआर फंड यांच्या माध्यमातून आयोजित कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शक प्रा. किशोर काळोखे, मुख्याध्यापक दिपक जगताप, शिवनाथ दराडे, संजय आंधळे, महेंद्र जवरत, अमित डाके, दिशांत ढाणे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात तज्ञ मार्गदर्शक प्रा. किशोर काळोखे यांनी विविध उदाहरणे, कृती आणि चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यशाळेतील प्रत्येक उपक्रमाचा मनापासून आनंद घेतला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान नव्हे, तर उत्तम व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी जीवन कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

## वाजेकर महाविद्यालयात रक्त तपासणी



**चिरनेर :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील हेल्थ सेंटर, माजी विद्यार्थी संघ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने पी. एस. पॅथॉलॉजिकल लॅब, मोहोपाडा यांच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सेवकांसह सुमारे २०० जणांची रक्त तपासणी करण्यात आली. यावेळी प्रभारी प्रा. डॉ. आमोद ठक्कर यांनी महाविद्यालयात दरवर्षी विद्यार्थ्यांची, विशेषतः विद्यार्थिनींची, मोफत रक्त तपासणी करून हिमोग्लोबिन कमी असलेल्या विद्यार्थिनींना शासनामार्फत लोहयुक्त गोळ्यांचे मोफत वितरण तसेच आहार समुपदेशन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

# मूलभूत सुविधांसाठी कळंबोलीकरांची फरफट

### • प्रशासनाकडून जबाबदारी ढकलण्याचा आरोप

| कळंबोली | प्रतिनिधी |

कळंबोली शहरातील नागरिकांना सध्या दोन अत्यावश्यक मूलभूत सुविधांसाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे पाणीपुरवठा अनियमित होत असून, दुसरीकडे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ''कधी लाईट नाही तर कधी पाणी नाही, नेमके करायचे काय?'' असा संतप्त सवाल कळंबोलीकरांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच, पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडेबोट दाखवले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.




कळंबोलीसारख्या झपाट्याने विकसित होत असलेल्या शहरामध्ये नागरिकांना नियमित पाणी आणि अखंडित वीजपुरवठा मिळणे ही प्राथमिक गरज आहे. मात्र, पाणी आणि वीज या दोन्ही मूलभूत सुविधांबाबत नागरिकांना वारंवार अडचणींचा सामना करावा लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, पाण्याच्या प्रश्नावर एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे बोट दाखवले जात असताना नागरिकांची मात्र गैरसोय सुरूच आहे. घरगुती वापरासाठी, पिण्यासाठी तसेच दैनंदिन गरजांसाठी पाणी मिळवताना नागरिकांना नियोजन करावे लागत आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच, पाण्याच्या समस्येबरोबरच कळंबोलीत वीजपुरवठ्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. महावितरणकडून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, प्रत्येक वेळी 'मेन लाईन केबल फॉल्ट' झाल्याचे कारण सांगितले जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर काही काळाने वीजपुरवठा सुरू होतो; मात्र, पुन्हा त्याच स्वरूपाची समस्या निर्माण होत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना केव्हा होणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

वारंवार होणाऱ्या वीजखंडिततेमुळे घरगुती ग्राहकांसह दुकानदार व व्यावसायिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकीकडे पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडेबोट दाखवले जात आहे. तर, प्राधिकरणाकडून अपेक्षित प्रमाणात किंवा नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचे कारण देण्यात येत आहे. दुसरीकडे वीजपुरवठा खंडित झाल्यावर केबल फॉल्टचे कारण पुढे केले जात आहे. पाणी आणि वीज या जीवनावश्यक सुविधा नियमित आणि सुरळीत उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी एकमेकांवर जबाबदारी ढकलण्याऐवजी समन्वयाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## पळस्पे येथून दुचाकीची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

पळस्पे पुलाखाली रस्त्याच्या कडेला उभी करून ठेवलेली सुमारे ७५ हजार रुपये किमतीची यामाहा दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिंगारवाडी येथील साहिल सुनील लाहणे (२२) यांनी त्यांची यामाहा कंपनीची काळ्या रंगाची दुचाकी पळस्पे पुलाखाली रस्त्याच्या कडेला पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी सपोनि सुनील वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस या प्रकरणाचा तपास करीत असून अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यात येत आहे.

## विद्यार्थ्यांना शेतीचे धडे




**खारेपाट :** अलिबाग तालुक्यातील बामणगाव येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. सध्या शेतकरी वर्गात लावणीच्या कामाला वेग आला आहे. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी अभ्यासाबरोबर शेतीप्रधान भारतात शेती कशा प्रकारे केली जाते, याचे प्रात्यक्षिक प्रत्यक्ष शेतात उतरून दाखविण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी, शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक व शाळा समिती पदाधिकाऱ्यांचे योगदान लाभले. या उपक्रमाबद्दल शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. याप्रसंगी शाळेचे शिक्षक जलदीप तांडेल यांनी शेतकरी वर्ग व ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले.

## नागोठणे लायन्स क्लबचे काम कौतुकास्पद : किशोर जैन

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे लायन्स क्लब जिथे नेत्रचिकित्सा शिबीर घेते ते स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानची जागा माझ्या सहकार्यामुळे त्यांना वापरायला मिळते, याचा लायन्स क्लब कडून नेहमी उल्लेख होतो. स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे तत्व होते. मात्र, याठिकाणी नागोठणे लायन्स क्लब १०० टक्के समाजकारण करीत आहे. त्यामुळे या नागोठणे शहर व परिसरात डोळ्यांच्या उपचारासाठी ही एक हक्काची सामाजिक संस्था असून, डोळ्यांचे चांगले उपचार करण्याचे काम नागोठणे लायन्स क्लब करीत आहे, असे कौतुकास्पद उद्‌गार लायन्स सदस्य व राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन यांनी काढले.



नागोठण्यातील गवळ आळी येथील कै. अंजली गणपत जोगत यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र प्रसाद जोगत व शेखर जोगत यांच्या सौजन्याने तसेच लायन्स हेल्थ फाऊंडेशन व सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चोंढी यांच्या संयुक्त विद्यामाने नागोठणे लायन्स क्लब कडून या मोफत नेत्रचिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.५) करण्यात आले होते. यावेळी मनोगत व्यक्त करतांना ते बोलत होते.

या शिबिरात एकूण ६६ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली होती. यापैकी मोतीबिंदू आढळलेल्या ४० रुग्णांवर लायन्स हेल्थ फाऊंडेशन व सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल चोंढी-अलिबाग येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

## भाताची यांत्रिक पद्धतीने लागवड

| खांब | प्रतिनिधी |

नवतंत्राने विकसित केलेल्या 'कोंकण सुवास' या नवीन भाताच्या वाणाचे यांत्रिक पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक यशस्वीपणे करण्यात आले. हे प्रात्यक्षिक रोहा तालुक्यातील सांगडे येथील शेतकरी खरिवले यांच्या शेत जमिनीत दाखविण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्र किल्ला यांच्याकडून 'कोंकण सुवास' या नवीन भाताच्या वाणाचे यांत्रिक पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक अलिबाग, सुधागड, माणगाव, तळा, मुरूड या तालुक्यांत यशस्वीपणे करण्यात आले. नुकतेच त्याची यांत्रिक पद्धतीने लागवड रोहा येथील शेतकरी खरिवले यांच्या शेतात यशस्वीपणे करण्यात आली आहे. यावेळी कृषी विज्ञान केंद्र किल्ला येथील कृषी विस्तार शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, उद्यानविद्या शास्त्रज्ञ डॉ. राजेश मांजरेकर, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, मंडळ कृषी अधिकारी होवाळे, उप कृषी अधिकारी कविता, बीटीएम गाडे आणि आत्मा व सहाय्यक कृषी अधिकारी मंगेश भिंगारदे आदी विविध पदाधिकारी वर्गाने मुख्य उपस्थिती नोंदवून व भात लागवडीचे प्रात्यक्षिकाची पाहणी करून खरिवले यांच्या या प्रात्यक्षिकाचे जाहिरपणे कौतूक केले.



(छायाचित्र: नंदकुमार मरवडे)

## पनवेल स्थानकाजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्थानकाजवळ एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. त्याची अद्याप ओळख पटलेली नाही. या व्यक्तीचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे असून, ही व्यक्ती पनवेल रेल्वे स्थानकाजवळील शिवमंदिरासमोर बेशुद्ध अवस्थेत आढळून आली. त्याला उपचारासाठी पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे. या व्यक्तीचा रंग काळापांढरा, उंची अंदाजे ५ फूट २ इंच असून, त्याच्या अंगावर कोणतीही ओळख पटेल अशी वस्तू नसल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.



## अध्यक्षपदी ॲड.किशोर देशमुख

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत बार असोसिएशन ही संघटना वकिलांच्या मदतीसाठी आणि वकिलांचे कल्याणकारी कामे करण्याकरता, त्याचबरोबर पक्षकारांच्या हितासाठी अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवत असते. नुकतीच कर्जत बार असोसिएशनची २०२६-२७ या वर्षासाठी निवडणूक पार पडली. जेष्ठ वकील यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या निवडणुकीत कर्जत बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून किशोर देशमुख यांची निवड करण्यात आली. तसेच, उपाध्यक्षपदी संदीप बागडे यांची एकामताने निवड करण्यात आली. या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. महेश घारे यांनी अध्यक्षाची निवड जाहीर केली. यावेळी माजी अध्यक्ष ॲड. मनोज क्षीरसागर यांनी अध्यक्षपदाची धुरा किशोर देशमुख यांच्याकडे सोपवली.

## लाचलुचपतविरोधी जनजागृती मोहीम

| पनवेल | प्रतिनिधी |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (अँटी करप्शन ब्युरो) नवी मुंबई यांच्यावतीने नागरिकांमध्ये भ्रष्टाचाराविरोधात जनजागृती करण्यासाठी 'लाचमुक्त नवी मुंबई - आपले शहर, आपली जबाबदारी' ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर पैशांची मागणी झाल्यास किंवा लाच स्वीकारली जात असल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




यासाठी विभागाने १०६४ हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित केला असून, हेल्पलाईन, दूरध्वनी, ई-मेल आणि संकेतस्थळाच्या माध्यमातूनही तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल, अशी ग्वाहीही विभागाने दिली आहे. अँटी करप्शन ब्युरो नवी मुंबईचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन भ्रष्टाचाराविरोधात सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. तसेच, ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे.

## मुरूडमध्ये क्रांती दिन उत्साहात

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड शहरातील गणेश आळी नाका परिसरातील क्रांती स्तंभ येथे सर एस.ए. हायस्कूल व स्व.म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने ८४वा क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेपासून गणेश आळी येथील क्रांती स्तंभापर्यंत प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी ''भारत माता की जय'', ''वंदे मातरम'', ''क्रांती दिनाचा विजय असो'', ''जय भवानी, जय शिवाजी'' अशा घोषणांनी मुरुड शहर परिसर दणाणून सोडला. प्रभातफेरीनंतर क्रांती स्तंभाला मुरूड-जंजिरा विद्या मंडळाचे संचालक प्रमोद भायदे व पांडुरंग आरेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्वांनं राष्ट्रगीत सादर करण्यात आले. या कार्यक्रमाला मुरुड-जंजिरा विद्या मंडळाचे संचालक पांडुरंग आरेकर, प्रमोद भायदे, मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे, पी.टी. शिक्षक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ, डी.टी. शिंदे, तोडले, सीमा तांबडकर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यादरम्यान, उपस्थितांनी क्रांती दिनाचे महत्त्व विशद केले.



### तज्ज्ञांकडून व्यवसाय व्यवस्थापनाचे मार्गदर्शन | महिला नवउद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# 'अमृत उद्योग कौशल्यवर्धन' प्रशिक्षणाचा शुभारंभ

| रेवदंडा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) पुणे यांच्यावतीने चौल येथील श्री सुंदरणारायण मंदिर सभागृहात 'अमृत उद्योग कौशल्यवर्धन' या दहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला.

या प्रशिक्षणामध्ये पहिल्या चार दिवसांत प्रत्यक्ष (ऑफलाईन) तर पुढील सहा दिवस ऑनलाईन व्हिडिओ सत्रांद्वारे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान नवीन उद्योग सुरू करण्याची प्रक्रिया, उद्योग विस्तार, आर्थिक नियोजन, बँक कर्ज प्रक्रिया, व्यवसाय व्यवस्थापन, मार्केटिंग, डिजिटल मार्केटिंग तसेच विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती तज्ज्ञांकडून दिली जाणार आहे. उद्‌घाटनाप्रसंगी भारतीय स्टेट बँक चौल शाखेचे व्यवस्थापक शैलेन्द्र वासनिक, उद्योजक विश्वास जोशी तसेच जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे उपस्थित होते. यावेळी शैलेन्द्र वासनिक यांनी बँकिंग व्यवहार, सिबिल स्कोअरचे महत्त्व, प्रकल्प अहवाल, कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, बँक कर्ज मंजुरीची प्रक्रिया, कर्ज नाकारण्याची कारणे, बँकेचे नियम व कर्जाची नियमित परतफेड याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, स्टेट बँकेचे एफओएस ललित म्हात्रे यांनी उद्यम नोंदणी आणि बँक कर्ज अर्ज भरण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. चौल येथील यशस्वी उद्योजक विश्वास जोशी यांनी स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा प्रवास, प्रारंभीचे आर्थिक नियोजन, भांडवल उभारणी, कामगार व्यवस्थापन, व्यवसायातील अडचणी व त्यावरील उपाय याविषयी अनुभव कथन केले. त्यांनी नवउद्योजक महिलांना जिद्द, सातत्य आणि शिकण्याची वृत्ती कायम ठेवण्याचा संदेश दिला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेश मराठे यांनी केले. तर, कार्यक्रमाचे नियोजन अमृत सखी जान्हवी साठे, रमा बापट आणि सुषमा आचार्य यांनी केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला रायगड जिल्ह्यातील विशेषतः चौल परिसरातील महिला नवउद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांमध्ये उद्योजकतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

९ जुलै

१) श्री.प्रमोद जनार्दन पाटील मु.वरसोली,अलिबाग, दि.९/८/१९५६

२)श्रीम.सपना विलास कंदाडे ब्राम्हणआळी, अलिबाग दि.९/८/१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

*कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग*

## कन्या शाळेत दत्तक पालक योजना

**म्हसळा:** तालुक्यातील कन्या शाळेत सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजनेअंतर्गत एक प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. शालेय विद्यार्थिनी हीरण्या लाड हिने आपल्या वाढदिवसानिमित्त कोणताही अनावश्यक खर्च न करता समाजाप्रती कर्तव्याची जाणीव ठेवत शाळेतील दहा गरजू विद्यार्थिनींना दत्तक घेतले. या विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी प्रत्येकी ३६० प्रमाणे आर्थिक मदत तसेच शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले.

# दूषित पाण्यामुळे जनता त्रस्त

## उरणमध्ये अनेकांना आजारांनी ग्रासले

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील अनेकांच्या घरात मागील काही दिवसांपासून पिण्याचे पाणी हे गढूळ व दूषित येत असल्याने अनेकांना विविध आजारांनी ग्रासले आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीच वातावरण निर्माण झाले आहे. तरी सिडकोच्या हेटवणे पाणी पुरवठा विभाग, एमआयडीसीच्या पाणी पुरवठा अभियंत्यांनी, रायगड जिल्हा परिषद आणि तालुका वैद्यकीय अधिकारी वर्गाने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रहिवाशांना शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून



करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील काही गावांमध्ये पावसाळ्यात ही पाणीटंचाईने नागरिक त्रस्त आहेत. प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे अनेक जलवाहिन्या या गटातून जात असल्याने पावसाळ्यात दूषित पाणी हे सदर जलवाहिन्या मधून नळाला येत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होताना दिसत आहे. उरण पूर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, कोप्रोली, खोपटा सह इतर अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत आहे. यासंदर्भात स्थानिक प्रशासनाकडे, पाणीपुरवठा कमिटी कडे वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे.

मात्र, त्यांच्या समस्येकडे कोणीच लक्ष द्यायला तयार नसल्याने या दूषित पाण्यामुळे कुटुंबातील विशेषतः लहान मुले आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या दूषित पाण्यावरच नागरिकांना दिवस ढकलावे लागत आहेत.एकंदरीत दूषित पाणी पिण्यामुळे किंवा वापरल्यामुळे जिवाणू, विषाणू आणि परजीवी मुळे अनेक गंभीर जलजन्य आजार होत असल्याने अनेक रुग्ण खासगी व शासकीय रुग्णालयात उपचार करुन घेण्यासाठी दाखल होत असल्याचे दिसून येत आहेत. एकंदरीत पाणीपुरवठा कमिटी तसेच प्रशासन हे नागरिकांच्या जीवाशी खेळताना दिसत आहेत. त्यामुळे आता या समस्येची दखल जिल्हा तसेच तालुका प्रशासन घेते का, हे पहावे लागेल.

# आदिवासी भवनाचे लोकार्पण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

खासदारांचा स्थानिक विकास निधी अंतर्गत बांधण्यात आलेल्याला माणगाव तालुका आदिवासी भवनाचा लोकार्पण सोहळा शनिवारी (दि.८) ऑगस्ट रोजी खा. सुनील तटकरे यांच्याहस्ते व व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जुने माणगाव शासकीय विश्राम गृहाजवळ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी उद्याच्या भवितव्याच्या दृष्टीने वेगवेगळे कार्यक्रम होऊन माणगावमधील आदिवासी समाजाची हि वास्तू चालती बोलती असावी असे प्रतिपादन रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खा. सुनील तटकरे यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमास सुभाष केकाणे, काका नवगणे, शेखर देशमुख, आनंद यादव, गजानन अधिकारी, दिशा जाधव, शादाब गैबी, मनीषा मालोरे, शर्मिला सुर्वे, संगीता बक्कम, अक्षय जाधव, रिया उभारे, शैलेश भोनकर, रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिनेश रातवडकर, लक्ष्मी हिलम, राजेंद्र शिर्के, ॲड. सुशील दसवते, सुनील पवार, विठोबा पालकर, जयंत बोडेरे, सिद्धांत देसाई, रमेश कोळी आदी मान्यवर तसेच आदिवासी संघटना माणगाव तालुका पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्रगतशील शेतकऱ्यांचा रोहा प्रेस क्लबकडून गौरव

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांच्या कष्टाप्रति ऋण व्यक्त करत प्रयोगशील शेतकऱ्यांचा त्यांच्या शेतावर जाऊन सन्मान करण्याची अभिनव परंपरा रायगड जिल्हा प्रेस क्लब गेली १६ वर्षे राबवित आहे. याच उपक्रमांतर्गत रोहा तालुक्यातील दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा त्यांच्या शेतावर जाऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शेती क्षेत्रात सातत्याने परिश्रम घेऊन आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना प्रगतशील शेतकरी सन्मान राजीपचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. उपस्थितांनी लीला मोरे यांच्या कार्याचे कौतुक करत महिला शेतकऱ्यांसाठी त्या प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी धनंजय जोशी, महादेव साळवी, आप्पा देशमुख, कृषी अधिकारी जोगदंड, नितीन पवार, संतोष दिवकर, अध्यक्ष श्याम लोखंडे, राजेंद्र जाधव तसेच परिसरातील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

रायगड जिल्हा प्रेस क्लबच्या या अभिनव उपक्रमामुळे प्रगतशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळत असून, शेतीकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा तरुण पिढीला मिळत आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांचा सन्मान करण्याची ही परंपरा भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात सुरू ठेवण्यात येणार असल्याचे यावेळी अध्यक्ष श्याम लोखंडे यांनी सांगितले.

## महाविद्यालयात प्रबोधन सत्र

**कोर्लई :** मुरुडच्या वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष प्रबोधन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यासत्रासाठी मार्गदर्शक म्हणून प्रा. तुलसीदास मोकल उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे होते. प्रा.सुभाष म्हात्रे यांनी आपल्या प्रास्ताविकात प्रबोधन सत्राच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली तर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप, स्थापना आणि तिचे महत्त्व याबाबत प्रा. तुलशीदास मोकल यांनी मार्गदर्शन केले. सेवा हेच कार्य या भावनेने विद्यार्थ्यांनी संघटित होऊन काम करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी डॉ. श्रीशैल भैरगुंडे, प्रा. प्रवेश पाटील, प्रा. सिद्धेश सतवीडकर, डॉ. सुभाष म्हात्रे, प्रा. प्रणव बागवे, प्रा.चिंतन पोतदार,प्रा. रुफी हसवारे व प्रा. सायमा अनवारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवेश पाटील यांनी केले तर प्रा.सायमा अनवारे यांनी आभार मानले.

# आसानवाडी विद्यार्थ्यांनी घेतला भातलागवडीचा अनुभव

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा आसानवाडी येथे शाळा व्यवस्थापन समिती व माता-पालक संघाच्या संयुक्त सहकार्याने मभात लागवडफ उपक्रम अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष कृतीची जोड देत, कार्यशिक्षण विषया अंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः शेतात उतरून चिखलमाती तुडवत भात लागवडीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये शेती, श्रमसंस्कार, पर्यावरण संवर्धन आणि अन्नाबद्दल कृतज्ञता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा



उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

शेतकऱ्यांच्या कष्टाची जाणीव मुलांना प्रत्यक्ष व्हावी यासाठी शाळेच्या उपशिक्षिका प्रियंका आसलकर यांनी विद्यार्थ्यांना शेतात प्रत्यक्ष भात कसा लावायचा याचे शास्त्रोक्त प्रात्यक्षिक करून दाखवले. ताटात येणाऱ्या अन्नाच्या प्रत्येक कणामागे शेतकऱ्यांची किती मेहनत, घाम आणि कष्ट असतात, याची प्रचिती या उपक्रमातून विद्यार्थ्यांना झाली. कार्यानुभव या विषयांतर्गत शेतात जाऊन घेतलेला हा प्रत्यक्ष अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात राहणारा ठरणार आहे. आज शाळेतील सर्व मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. सगळी मुलं आज आम्हाला पण शेती करता येते असं आई बाबांना सांगणार हा आनंद चेहऱ्यावर दिसत होता. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वास वाघमारे व सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले. गटशिक्षणाधिकारी बांगारे, अमोल पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे शाळेत असे नाविन्यपूर्ण व शैक्षणिक उपक्रम राबवण्यास मदत मिळत अशी भावना व्यक्त करण्यात आली.

# विद्यार्थी उतरले भात लावणीसाठी शेतात

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांना शेतीचे महत्व आणि मातीशी नाते जोडण्यासाठी आदर्श शाळा वाघोशी तर्फे अनोखा उपक्रम राबविण्यात आला. क्षेत्रभेट अंतर्गत विद्यार्थ्यांनी (दि.५ ) ऑगस्ट रोजी वाघोशीतील शेतकरी बबन देशमुख यांच्या शेतावर जाऊन भात लावणीचा प्रत्यक्ष आनंद घेतला.

मुख्याध्यापक राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. जनार्दन भिलारे यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहाने चिखलात उतरून स्वतः लावणी केली. सहशिक्षिका कीर्ती लामदाडे, सुवर्णा घोडे यांनीही विद्यार्थ्यांसोबत लावणीचा



आनंद घेतला. या उपक्रमाचे उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, गटविकास अधिकारी लता मोहिते यांनी कौतुक केले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा कविता देशमुख, सर्व सदस्य, पालक, ग्रामस्थ, केंद्रप्रमुखांनी उपक्रमाचे स्वागत केले. या उपक्रमासाठी बबन देशमुख,उदय देशमुख, उमेश देशमुख यांनी सहकार्य केले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ०९ ते १५ ऑगस्ट २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## ज्येष्ठांना दुखावू नका

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहात आपल्या राशीला ग्रहाचे पाठबळ उत्तम राहील. आपल्या मनात घोळत असलेला संभ्रम कमी होईल. या आठवड्यात बऱ्यापैकी अनुकूलता राहील. सुधारित घटनांना वेग येईल. व्यवसायात आश्चर्यकारक बदल होतील. अनेक धोरणे पार पडतील. केलेल्या गुंतवणुकीचा लाभ चांगला होईल. आतापर्यंत नोकरीवर मिळालेली सुट्टी भरून काढावी लागेल. कामाचे तास वाढवावे लागतील. संशोधनकार्यात सहभागी व्हाल. बौद्धिक यश मिळेल. आर्थिक बाबतीत तत्पर राहा. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नका. सार्वजनिक गोष्टीतील हालचालींकडे लक्ष द्या. मात्र, ज्येष्ठ व्यक्तींना दुखावून चालणार नाही. त्यामुळे त्यांच्या बरोबर गोडी वाढवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** एकंदरीत आपल्या नात्यातील गोडवा वाढल्याने घरात आनंदी वातावरण राहील. अविवाहितांचे मनाप्रमाणे विवाह ठरतील काही इच्छुकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे त्यांनी लॉटरी काढण्यास हरकत नाही खूप वर्षापासून रखडलेले विवाह प्रयत्न केल्यास ठरतील. दैव अनुकूल राहील. विचारांचे समीकरण जुळू शकेल. **शुभ दिनांक :** ०९,११.

## व्यवहार सुरळीत होतील

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहात अनावश्यक कामे टाळणे उत्तम राहील. या आठवड्याची सुरुवात थोडी कंटाळवाणी वाटेल, त्यानंतर मात्र, आळस झटकून कामाला लागाल. मागील काही दिवसांपासून इच्छा असूनसुद्धा प्रगतीची झेप उंचावत नव्हती. आता मात्र, ती परिस्थिति बदलेल. व्यापार-उद्योगाच्या ठिकाणी व्यवहार सुरळीत पार पडतील. नवे काही प्रकल्प हाती येतील. नोकरदार व्यक्तींनी मानसिकदृष्ट्या हतबल न होता कामात लक्ष घाला. इतरांच्या बोलण्याचा विचार न करता अनावश्यक गोष्टी टाळा. महत्त्वाच्या गोष्टींना प्राधान्य द्या. खर्चाची बाजू सावरली तर पैशांची कमतरता जाणवणार नाही. हातात पैसा येत राहील. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. सार्वजनिक ठिकाणी नेहमी प्रमाणाचा हातखंडा राहील. **महिलांना :** धार्मिक गोष्टींची आवड निर्माण होईल. शारीरिकदृष्ट्या होणारी धावपळ कमी करा. आराम करा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रकृती जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. तरीही मागेल त्याला पैसे देऊ नका लवकरच घरात चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक :** १२,१४.

## कामाचे नियोजन करा

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहात आपण अखेर अडथळ्यांची शर्यत शेवटी पार केली असेच म्हणावे लागेल. आपल्या राशीला उत्तुंग भरारी मिळवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होण्याच्या मार्ग समोर दिसणार आहे. मात्र हुरळून जाऊन काम विघडवू नका, सध्या ग्रहयोगाची अनुकूलता वाढलेली असेल. व्यापारातील जाणकार व्यक्तींकडून मार्गदर्शन घ्या. हाती घेतलेल्या कामाचे नियोजन निश्चित करा. निरंतर परिश्रमाचे ठसे उमटू लागतील. व्यवहारात फसगत होऊ देऊ नका. सेवक वर्गाने व्यक्तिश: केलेल्या कामाचे स्वरूप हाताळताना काळजी घ्यावी. स्वतंत्र विचारप्रणाली सध्या बाजूला ठेवा. अधिकारी व्यक्तींनी ठरवून दिलेले नियम मोडू नका. पैशांच्या बाबतीत उधळण करणे टाळा. सामाजिक माध्यमांचा चुकीच्या कामासाठी उपयोग करू नका. मित्रांना वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करू देऊ नका. अविवाहितांचा विवाह प्रश्न सुटेल. प्रकृती उत्तम राहील. बोलण्यावर मात्र, नियंत्रण ठेवावे म्हणजे गैरसमज होणार नाहीत. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. **शुभ दिनांक :** १२,१५.

## आक्रमक भूमिका घेऊ नका

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात अशुभ गोष्टींचे परिणाम कमी झालेले जाणवू लागतील. वर्तमान परिस्थितीचा अंदाज घ्या. त्यानुसार नियमावली ठरवा. खरेदी-विक्रीच्या व्यवहारातील नेहमीची सवय बदलावी लागेल. व्यापार-उद्योगाच्या दृष्टीने रोखीच्या व्यवहाराला महत्त्व द्या. दक्षतापूर्वक घेतलेली काळजी हिताची ठरेल. कामाच्या ठिकाणी ठरवलेले नियम स्वीकारून पुढे चला. आक्रमक भूमिका घेऊ नका. शक्य तेवढे कामाकडे लक्ष द्या. द्विधा मन:स्थिती टाळा. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. आर्थिक बाबतीत जेवढ्यास तेवढे राहा. नेहमीपेक्षा खर्चाचे प्रमाण कमी करा. राजकीय धुरा सांभाळताना नाकिनऊ येणार नाही, याची सुरक्षितता बाळगा. स्वत: न पाहिलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवू नका. घरगुती वातावरणातील पेच हळुवारपणे सांभाळा. धार्मिक गोष्टीतील प्रसन्नता वाढेल. खाण्यातील अभिरुची वाढलेली असेल. प्रकृती साथ देईल. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल त्यांच्यामुळे आपला मोठा लाभ संभवतो. **शुभ दिनांक :** ११,१४.

## मानसिक प्रसन्नता लाभेल

**सिंह :** राशीसाठी आपले या सप्ताहा आपली ग्रहस्थिती खूप सकारात्मक असल्याने होणारे चंद्राचे भ्रमण आपल्याला शुभदायक ठरेल. अडकलेली कामे आता वेगाने सुरू होतील थोडक्यात लांबलेल्या गोष्टींना वेग येईल. शुभ घटनांचे संकेत मिळतील. आगामी काळासाठी उत्पन्नवाढीचे परिणाम चांगले राहतील. मोठ्या उद्योगधंद्यांना मिळणारी कलाटणी धीर देणारी असेल. देवाणघेवाण वाढल्यामुळे फायद्याचेही प्रमाण वाढलेले असेल. शासकीय कर्मचारी वर्गाला मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. ज्येष्ठांकडून तुमच्या कामाचे कौतुक होईल. आर्थिक प्रगती उत्तम राहील. राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळेल. मित्रांमार्फत मिळणारी संधी डावलू नका. ओळखीचा फायदा होईल. भाऊबंदकीचा त्रास कमी होईल. नव्या नात्यांमधील वाढ जीवनाला चांगले वळण देणारे ठरेल. वैवाहिकदृष्ट्या सुखद अनुभव मिळेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. आरोग्य उत्तम राहील. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला. महिलांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक :** १०,१३.

## व्यवसायाला चालना मिळेल

**कन्या :** राशीसाठी आपले ग्रहमान अवघड वाट सोपी करण्याचा तुमचा अट्टहास सिद्ध होईल. ग्रहांचे प्राबल्य उत्तम राहील. व्यावसायिकदृष्ट्या चालून आलेल्या सुवर्णसंधीचा वापर तुम्ही चांगला कराल. काही संस्थांशी केलेले करार मार्गी लागतील. मोठ्या कारखानदारी उद्योग व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना मिळेल. छोट्या स्वरूपातील काम आता हळूहळू मोठ्या स्वरूपात होऊ लागेल. कोलमडलेली व्यावसायिक जीवनशैली पुन्हा नव्याने उभी राहील. केलेले नियोजन यशस्वी ठरेल. नोकरीमध्ये ज्या पदासाठी तुम्ही उत्सुक आहात, ते तुमच्याकडे सोपवले जाईल. याचा आनंद तुमच्या चेहऱ्यावर दिसून येईल. आर्थिक निराशा कमी होईल. राजकीय क्षेत्रात तुमच्या बोलण्याचा प्रभाव राहील. या प्रभावाच्या जोरावर आपली बरीच कामे मार्गी लागणार आहेत. थोरामोठ्यांची कृपा राहील. खाण्यापिण्याचे पथ्यपाणी पाळा. आरोग्य जपा. **महिलांना :** महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. प्रकृती जपा. **शुभ दिनांक :** ९,१४.

## इतरांशी स्पर्धा करणे टाळा

**तुळ :** राशीसाठी आपले ग्रहमान विस्कळीत घडीची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न असू द्या. ग्रहांची ताकद वाढवण्यासाठी कोणत्याही गोष्टीची शहानिशा केल्याशिवाय निर्णय घेऊ नका. विचारपूर्वक कृतीवर भर द्या. व्यावसायिकदृष्ट्या प्रयत्नवादी राहा. इतरांशी स्पर्धा करणे टाळा. व्यापारउद्योगातील तांत्रिक अडचणी कमी होतील. नोकरदार व्यक्तींची दडपणाखालची परिस्थिती सुधारेल. सुटकेचा नि:श्वास घ्याल. धरसोड वृत्ती स्थिर होईल. तुमच्या हाती आलेले वेळापत्रक प्रथम तपासून घ्या. त्यानुसार कामाचे नियोजन ठरवा. पैशांचा अपव्यय टाळा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. सामाजिक क्षेत्रात मिळतेजुळते घ्यावे लागेल. कुटुंबातील व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. मानसिक ताणतणाव कमी करा. धार्मिक कार्यासाठी तुमचा सहभाग महत्त्वाचा राहील. स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. **महिलांना :** तुम्हाला तुमच्या जवळच्या लोकांपासून लांब जावे लागू शकते. तुमच्या कुटुंबात काही शुभ कार्य होण्याची ही शक्यता आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या गुणांची प्राप्ती होईल कौटुंबिक वातावरण चांगले राहील. **शुभ दिनांक :** ११,१२.

## कुटुंबाला विश्वासात घ्या

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाच्या चंद्राचे भ्रमण होत असताना त्याचा परिणाम या राशीवर होणार आहे. मानसिकदृष्ट्या हतबल न होता प्रकृतीची काळजी घ्या. मानसिक दडपण घेऊन कोणतेही कार्य सिद्ध होत नाही हे लक्षात घ्या. व्यवसायात सध्या तरी नको ते धाडस वाढवू नका. चालू घडी सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न करा. निर्थक गोष्टीत वेळ न दवडता ठरावीक काळापुरताच विचार करणे सोयीचे ठरेल. इतरांची मदत घेताना काळजी घ्या. नोकरदार व्यक्तीला प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे फळ चांगले मिळेल. आर्थिक बाबतीतील चढ-उतार लक्षात घेऊन पाऊल टाका. सार्वजनिक क्षेत्रातील उत्साह टिकवून ठेवा. कुटुंबाला विश्वासात घेऊन तुमच्या कामाच्या नियोजनाची कल्पना द्या. वैवाहिक जोडीदाराच्या भावनेची कदर करा. दुखणे अंगावर काढत बसू नका. योग्य वेळी उपचार घ्या. **महिलांना :** हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल, विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या कला क्षेत्रात अधिक वाव मिळेल. मानसिक संतुलन ठेवा, विचारपूर्वक कृती करा यामुळे फायदा झाला नाही तरी नुकसान होणार नाही. **शुभ दिनांक :** १३, १४.

## आप्तेष्टांच्या संपर्कात राहा

**धनु :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहस्थिती चांगली पोषक आहे. लांबलेल्या प्रश्नांना चांगले मार्ग मिळत राहतील. प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी आतून उत्साह वाढेल. समाधानाचे आणि प्रगतीचे नवे मार्ग समोर दिसू लागतील. व्यापार-व्यवसायात जुन्या ओळखीचा उपयोग करू शकाल. शक्यतो नव्याने कोणतीही जबाबदारी स्वीकारू नका. नोकरदार व्यक्तींची वाटचाल भरधाव राहील. कामातील धरसोडपणा कमी होईल. तडजोडीतून मिळणारे यश लक्षणीय असेल. आर्थिक प्रगतीच्या वाटा दिसू लागतील. राजकीय क्षेत्रात नको त्या ठिकाणी मध्यस्थी करणे टाळा. मुलांच्या बाबतीत चांगली प्रगती दिसू लागेल. मात्र नको त्या गोष्टीचा अट्टहास पुरवू नका. कौटुंबिक जीवन अनुकूल निर्णयांनी आणि शुभ घटनांनी समृद्ध राहील. शारीरिक व मानसिक विकारांपासून सावध राहा. **महिलांना :** कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. **शुभ दिनांक :** ०९,११.

## खर्चावर नियंत्रण ठेवा

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे तारेवरची कसरत आता संपणारी असली तरी प्रयत्न सोडून चालणार नाही. सतत कष्ट करणे हे मनात ठेवून प्रयत्नवादी राहणे उत्तम राहील. दोन कामांऐवजी एकाच कामाकडे लक्ष दिले तर निश्चितच नुकसान होणार नाही. चालू क्षेत्रातील व्यवसायाला चिकित्सकपणे आत्मपरीक्षण करणे गरजेचे राहील. खोल विचार करताना वेगवेगळ्या गोष्टींवर नजर फिरवावी लागेल. व्यवसायातील चढ-उतार हे नेहमीप्रमाणेच राहतील. नोकरदार व्यक्तीने स्वत:चा आत्मविश्वास न गमावता ठामपणे उभे राहा. कामातील अडचणी सोडवण्यासाठी मोठ्यांचा सल्ला घ्या. तो आपल्याला अनुभव म्हणून उपयोगी पडेल, मर्यादित खर्च केल्यास कर्जाचा भार थोडा हलका होईल. नवीन कर्जाच्यामागे सध्यातरी लागू नका, मुलांना योग्य समज देण्याची गरज राहील. प्रकृती नरम-गरम असेल. **महिलांना :** भावनिक प्रश्नात अडकू नका. थोड मेंदूच्या विचाराने कार्य करा करिअरच्या दृष्टिकोनातून तुम्हाला पद प्राप्ती होऊ शकते. आपल्या मुलांसाठी हा काळ बराच अनुकूल राहील यश मिळेल. **शुभ दिनांक :** १०,१२.

## हेवेदावे बाजूला ठेवा

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमाना प्रमाणे शुभ ग्रहांची ताकद वाढेल. उत्साह निर्माण होईल. व्यापारी क्षेत्रातील व्याप वाढता राहील. नावीन्यपूर्ण गोष्टी उदयास येतील. हाताबाहेरच्या गोष्टी आवाक्यात राहतील. व्यवसायातील संभ्रमित स्थिती बदलेल. नोकरदार व्यक्तीने प्रत्येक दिवस मोजत राहणे टाळा. तणावमुक्त राहा. कामावर लक्ष द्या. हेवेदावे बाजूला ठेवा. नोकरीतील सध्याचा सूर लक्षात घ्या. नेमक्या गोष्टी करण्याचा आढावा घ्या. शक्य तितक्या लवकर परिस्थिती स्वीकारण्याचा प्रयत्न करा. पैशांच्या बाबतीत जमेची बाजू राहील. राजकीय क्षेत्रात विजय संपादन कराल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या आवडीनिवडीचा विचार करा. जोडीदारासमवेत असलेला अबोला मिटेल. नात्यातील स्नेह वाढेल. धार्मिक गोष्टीतून समाधान मिळेल. मनाची एकाग्रता वाढेल. प्रकृती ठणठणीत राहील. **महिलांना :** पाऊल सावकाश टाका वित्तीय गोष्टींमध्ये तुम्हाला काही संघर्ष करावे लागू शकतात आणि दुसरीकडे खर्चात वृद्धी होईल, धन संबंधित गुंतवणूक विचार पूर्वक करा. **शुभ दिनांक :** ०९,१४.

## कामावर लक्ष केंद्रित करा

**मीन :** राशीसाठी आपले या सप्ताहातील आपले ग्रह आपल्याला साथ देणारे ठरणार आहेत, आपण जे प्रयत्न कराल त्यात यश मिळणार आहे, मोठे यश मिळाले नाही तरी लहान लाहान यशाने आपण काही कालावधीत शिखरावर पोहचलेले दिसाल, नवीन गोष्टी बाबत बाहू करू नका हळू हळू सर्व आपल्या अंगवळणी पडणार आहे. अनामिक भीती कमी होईल. ग्रहांचे परिणाम जाणवतील. व्यापार-उद्योगातील गडबड, गोंधळ कमी होईल. कारखानदारी, मोठे उद्योग आता रुळावर येतील. त्यासाठी कर्मचारी वर्गाचा मोठा वाटा असेल. नोकरीतील परिस्थिती समाधानकारक राहील. त्यामुळे कामावर लक्ष केंद्रित होईल. रोजच्या रोज ठरलेले कामाचे परतावे चांगले राहतील. अनेक अडचणींवर मात कराल. तुमची चिकाटी तुमचे यश पूर्णत्वाला नेईल. आर्थिकदृष्ट्या परिपक्वता येईल. राजकीय क्षेत्रात विकासाच्या दृष्टीने वाटचाल चालू राहील. भाऊबंदकी व शेजारीपाजारी यांच्याशी मात्र दोन हात लांबच राहा. **महिलांना :** तुमच्यातील सकारात्मक बदल घरातील सर्वांनाच आनंद देणारा ठरेल. उपासनेत मन रमवा. शारीरिक समतोल उत्तम राखण्यात यश मिळेल. **शुभ दिनांक :** ११,१५.

# ८० टक्के भातलावणी पूर्ण; मजुरांची मोठी टंचाई

## ● पटेल वा रोजंदारीवर माणसे शेतात



| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यात यंदा १९२१ मि मी इतका समाधानकारक पाऊस पडल्यामुळे भात लावणी ८० टक्के पूर्ण झालीआहे. मात्र, गतवर्षीच्या तुलेनेत एल निनोच्या कारणास्तव पाऊस कमी पडला. गेल्या वर्षीच्यादमदार पावसामुळे खारपट्ट्यासह सखल भागातील शेती लावण्यात शेतकरी वर्ग जुलैच्या शेवटच्या आठवड्यापासून व्यस्त दिसून येत होता. परिणामी १०० टक्के भात लावणीचे काम पुर्ण झाली होती. यंदा मात्र हे प्रमाण ८० टक्के पूर्ण झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

मुरुड तालुक्यात ३३०० हे. भात लागवडीचे क्षेत्र असून या क्षेत्रामध्ये शेतकरी सुवर्णा, जया, रूपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत व खारपट्यात जमिनीवर-पनवेल, आदी भाताच्या जातीची लागवड करण्यात आली आहे. भात लावणीच्या कामात दरवर्षी प्रमाणे यंदा ही मजुरांची टंचाई भास त आहे. खरीप हंगामातील भात हे एकमेव पीक असल्यामुळे लावणीसाठी पटेल वा रोजंदारीवर महिला माणसे शेतात राबतांना दिसत होती.

नांगऱ्यांना निपोटी १ हजार रुपयेतर पुरुषांना ६०० तर महिलांना ३०० ते ४०० रुपये मजुरी द्यावे लागते. समाधानकारक झालेल्या पावसामुळे भात रोपवाटिका उत्तम प्रकारे तयार झाल्या असून लागवड केलेल्या क्षेत्रातील पिकांची उगवण समाधानकारक आहे..उर्वरित क्षेत्रामध्येही लागवडीची कामे अंतिम टप्प्यात असून हवामान अनुकूल राहिल्यास येत्या काही दिवसांत शंभर टक्के लागवड पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. मौजे-तिसले येथील शेतकरी आदेश भोईर यांच्या शेतावर चारसूत्री पद्धतीने भात लागवड सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनानुसार शिफारशीनुसार खतांचा वापर करावा, अनावश्यक रासायनिक फवारण्या टाळाव्यात आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन कृषी कामांचे नियोजन करावे. वेळोवेळी कृषी विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सूचना व सल्ल्यांचे पालन केल्यास भात पिकाचे उत्पादन व गुणवत्ता वाढण्यास निश्चितच मदत होईल. यंदा मुरुड-जंजिरा तालुक्यात भाताचे चांगले उत्पादन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आवश्यक तेवढाच पाण्याचा साठा ठेवावा कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना सुधारित भात लागवड तंत्रज्ञान, संतुलित खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच नैसर्गिक शेतीविषयक मार्गदर्शन नियमितपणे करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी शेतामध्ये आवश्यक तेवढाच पाण्याचा साठा ठेवावा, पिकांची नियमित पाहणी करावी तसेच कीड किंवा रोगाची लक्षणे आढळल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विद्यार्थ्यांनी बनवले ॲनिमेटेड व्हिडीओ

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या खाड्याच्या पाडा या शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक यांचे मार्गदर्शन घेऊन निमेटेड व्हिडीओ बनवले आहे. ग्रामीण खाड्याचा पाडा शाळेत अवतरली असून विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत बनवले स्वतःचे ॲनिमेटेड व्हिडिओचे कौतुक होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत रायगड जिल्हा परिषद शाळा, खाड्याचापाडा शाळेने केले आहे. या शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपले शिक्षक संतोष नाटिकर यांचे मार्गदर्शन घेऊनआर्टीफिशियल इंटेलिजन्स (-ख) द्वारे निमेटेड व्हिडिओ निर्मिती केली आहे. या विषयावरील कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले होते.या आगळ्यावेगळ्या कार्यशाळेत इयत्ता तिसरी, चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यशाळेचे मार्गदर्शन शाळेचे शिक्षक संतोष नाटीकर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना एआयचा वापर करून केवळ काही मिनिटांत आकर्षक शैक्षणिक निमेटेड व्हिडिओ कसे तयार करता येतात, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांनी स्वतः एआय च्या साहाय्याने विविध विषयांवरील निमेटेड व्हिडिओ तयार केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि शिकण्याची उत्सुकता विशेष लक्षवेधी ठरली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणारे विद्यार्थीही आता कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आत्मविश्वासाने वापर करत असल्याचे या उपक्रमातून दिसून आले. कार्यशाळेत तयार झालेले विद्यार्थ्यांचे व्हिडिओ तसेच संपूर्ण कार्यशाळेचा विशेष व्हिडिओ Learn with Santosh Natikar या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहे. या माध्यमातून इतर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना देखील एआय आधारित शिक्षणाची प्रेरणा मिळणार आहे. इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम प्रेरणादायी आणि भविष्याभिमुख ठरला आहे. डिजिटल शिक्षणाच्या दिशेने रायगड जिल्हा परिषद शाळा, खाड्याचापाडा आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत असल्याची भावना पालक वर्गातून व्यक्त होत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाशी जोडण्याचा हा अभिनव प्रयत्न शिक्षण क्षेत्रात निश्चितच आदर्श ठरले आहे. शिक्षक नाटीकर यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, विद्यार्थ्यांना कौशल्यधिष्ठित शिक्षण देणारी शाळा म्हणून खाड्याचापाडा शाळेचा लौकिक आहे.

## म.फुले महाविद्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या ५९ व्या विभागीय युवा महोत्सवामध्ये उत्कृष्ट कामगिरी करीत चार बक्षिसांची कमाई केली. खारघर येथे झालेल्या युवा महोत्सवामध्ये प्राप्ती परदेशी हिने सुगम संगीत या गायन प्रकारामध्ये प्रथम क्रमांक तर प्रतीक्षा ठक्कर हिने इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच सार्थक विजय पाटील याने तालवाद्य या कलाप्रकारात तृतीय क्रमांक पटकाविला. सिद्धी पाटील हिने कोलाज मेकिंग स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रमेश म्हात्रे, प्रो. डॉ. लक्ष्मण गवळी, डॉ. सोपान गोवे, प्रा. डॉ. सोनू लांडे, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, डॉ. यशवंत उलवेकर, डॉ.लीना मेश्राम, डॉ.कीर्ती म्हात्रे, प्रा. अतुल पोखरकर व स्नेहल पाटील आदींनी मार्गदर्शन केले होते.

## विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी जनआंदोलन उभारणार

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |



पेण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेणसे येथील शिक्षकांची तीव्र कमतरता, जीर्ण झालेली शाळेची इमारत आणि अपुऱ्या मूलभूत सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राजिप सदस्या पल्लवी भोईर यांनी राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. सदर निवेदनाच्या अनुषंगाने जलद कार्यवाही न झाल्यास विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारणार असल्याचा इशारा रायगड जिल्हा परिषद सदस्या पल्लवी भोईर यांनी दिला आहे.

बेणसे येथील राजिप प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या वर्गांसाठी केवळ दोन शिक्षकांवर संपूर्ण शाळेचा कारभार सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिक्षकांची कमतरता भरून काढण्यासाठी अतिरिक्त शिक्षकांची त्वरित नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय, शाळेची इमारत जीर्ण अवस्थेत असून पावसाळ्यात वर्गखोल्यांमध्ये गळती होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी भोईर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणत्याही प्रकारची तडजोड सहन केली जाणार नाही. प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अन्यथा विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मुळगांव तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक सौरभ सुधीर गडकरी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३५ | १० | ०-१०-०० | ०-११ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०९/०८/२०२६

ॲड. समीर आर.सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सौ. भावीका भास्कर आग्री यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा / गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली ता. मुरुड | ६१ | ०-६६-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण ०-६९-०० | ९.७६ |

दिनांक : ०८/०८/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे कळंबोशी, ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकती.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. अरविंद खिमजी छेडा. | ५८/११ | ०-१४-०० | ०-०६ |
| | ५८/१० | ०-१४-०० | ०-०६ |
| | ५७/१२ | ०-९१-०० | ०-५१ |
| | ५७/४ | ०-१८-०० | ०-०९ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०९/०८/२०२६

खरेदीदारांचे लेखक
राठोड एण्ड एसोसिएट्स
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, मौजे पोयनाड येथील खालील वर्णनाची मिळकत मिलन मोहन हिंदळेकर यांचे खुद्द मालकीची आहे.

| अनु. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.-पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | १५३ | १/अ | ०-३५-०० | ०-५७ |
| २ | १५४ | १/अ | ०-८३-७० | १५-६८ |

वर नमूद जमिन मिळकती एकमेकांलगत असून, एकत्रितपणे असणाऱ्या सदर क्षेत्राकडे जा-ये करण्याकरिता पेझारी-पीरखिंड रस्त्यापासून जाणारा बारा फूट रूंदीचा रस्ता मूळ मालकांपासून देण्यात आला असून तोच रस्ता या मिळकतीकडे जा-ये करण्यासाठी वापरण्यात येत आहे. आमचे अशिलांनी सदर जमिनी खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद एकूण मिळकतीमध्ये आणि मिळकतींकडे जा-ये करण्याच्या रस्त्याबाबत त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे पोयनाड येथील सर्व्हे नंबर ९५३/९/अ आणि १५४/१/अ या जमिनी अथवा त्यापैकी काही भागावर आणि जा-ये करण्याच्या रस्त्यावर वर नमूद मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशिल ठरविणार असलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील, त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : ०८/०८/२०२६

सही /-
ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता.मुरूड, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) जनाबाई किसन तरेकर, २) बाळी गंगाराम मांजरेकर, ३) दिनेश पांडुरंग गायकर, ४) परुणा भगवान बरजे, ५) अरुणा पांडुरंग गायकर, ६) जयश्री जयराम मोहिते, ७) गीता गणेश मांजरेकर, ८) प्रमिला मंगेश कुलवे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली ता. मुरूड | ३०८ | क्षेत्र ०-७१-७०<br>पो.ख. ०-०७-४०<br>एकुण क्षेत्र ०-७९-१० | १२.३१ |

वर नमुद मिळकतींपैकी पश्चिम दिशेकडील क्षेत्र ०-४०-०० हे.आर. हि जमिन मिळकत

दिनांक : ०९/०८/२०२६
अशिलांची सही

ॲड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

### खरेदीदारांस सावधान नोटीस

सर्व लोकास या नोटीसीने कळविण्यात येते की, माझे अशिल साईनाथ अशोक म्हात्रे, रा. किहिम कामथ, ता. अलिबाग, जि.रायगड ता.अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची, वहिवाटीची, ताबे, कब्जाची मिळकत मौजे कामथ, ता. अलिबाग, जि.रायगड येथे आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड | २६१ | ०-०५-५९<br>०-०२-२२<br>०-०७-७१ | १.३० |

वरील मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा सामाईक अविभक्त हिस्सा आहे. सदरची मिळकत मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथे महसुल दप्तरी नोंदलेली मिळकत आहे.

वरील वर्णनाचे गट नं. २६१ मौजे कामथ-किहिम ता. अलिबाग, जि. रायगड या मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. आमचे अशिल साईनाथ अशोक म्हात्रे व अन्य सह- हिस्सेदार शैलेश दुर्लभदास संघवी, विलास म्हात्रे, यांचे वारस सुहास म्हात्रे तसेच भारती अनंत म्हात्रे यांचेमध्ये आजपर्यत वरील मिळकत व अन्य मौजे कामथ-किहिम येथील मिळकती संदर्भात सरस-निरस नितूटकपणे वाटप झालेले नाही.

वरील वर्णनाची मिळकत गट नंबर २६१ ही मिळकत महसुल खात्याच्या चुकीमुळे गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम या मिळकतीमध्ये क्षेत्र विलीन झालेले आहे. आमचे अशिलांच्या म्हणजेच साईनाथ अशोक म्हात्रे व इतर यांच्या नावाचा गट नंबर २६१ चा स्वतंत्र ७/१२ उतारा आजही महसुल दप्तरी आहे.

गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम, तालुका अलिबाग या मिळकतीचा विक्री व्यवहार मौजे गट नंबर २६४ च्या दप्तरी नाव असणारे व्यक्ती म्हणजेच सुमन सुर्यकांत राऊत, विश्वजीत विनायक काठे, भक्ती चारुदत्त चोगले, मयुरेश सुबोध काठे इत्यादी व अन्य करीत आहेत असे आमचे अशिलांना सदर मिळकती संदर्भात ॲड. नवनीत मुथा रा. ८, जय अपार्टमेंटस, १०९८/१४ मॉडेल कॉलनी पोस्ट ऑफिसजवळ, शिवाजीनगर पुणे ४११००६ याचे जाहिर नोटीस दि. २९.०७.२०२६ दैनिक कृषीवल मधील नोटीस वरुन समजलेली आहे. वरील गट नंबर २६४ मौजे कामथ-किहिम या मिळकतीचा विक्री व्यवहार झाल्यास आमचे अशिलांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार आहे व आमचे अशिलांचे त्या मिळकतीतील कायदेशीर हक्क व हितसंबंधांपासून वंचित रहावे लागणार आहे.

आमचे अशिलांचे वरील मिळकतीत असलेले कायदेशीर हक्क डावलून गट नं. २६४ च्या दप्तरी नावे असणाऱ्या व्यक्ती म्हणजेच सुमन सुर्यकांत राऊत, विश्वजीत विनायक काठे, भक्ती चारुदत्त चोगले, मयुरेश सुबोध काठे इत्यादी व अन्य सदर मिळकतीचा विक्री व्यवहार करीत आहेत. त्यामुळे वरील जमीन मिळकत खरेदीदाराने खरेदी केल्यास ते खरेदीदार प्रामाणिक खरेदीदार राहणार नाहीत. तसेच सदर मिळकत गट नं. २६४ चे पूर्व दिशेला आमचे अशिलांचे मालकीचे क्षेत्र गट नं. २६१ हे आहे व हे क्षेत्र गट नं. २६४ मध्ये विलीन झालेले आहे. तसेच मिळकत गट नं.२६४ ही अन्य कोणीही खरेदी करु नये. सदरच्या व्यवहारास आणि दै. कृषीवल मधील दि.२९.७.२०२६ च्या जाहीर नोटीशीस माझे अशिलांची सक्त हरकत आहे याची नोंद घ्यावी. तसेच या गट नं. २६४ च्या विक्री व्यवहारामुळे आमचे अशिलांना त्यांचे गट नंबर २६१ मध्ये असलेल्या कायदेशीर हक्क, हितसंबंधापासून वंचित रहावे लागणार आहे. तसेच आमचे अशिलांचे वरील गट नं. २६१ मध्ये असलेले हक्क हितसंबंध डावलून असा जर कोणताही व्यवहार केल्यास तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी तसेच आमचे अशील हे वरील मिळकती संदर्भात पुढील काळात वाटपाचा व मनाई हुकुमाचा दावा दाखल करणार आहेत.

आमचे अशिलांचे वरील मिळकत गट क्र. २६१ मध्ये असलेले कायदेशीर अविभक्त हिस्सा व हितसंबंधांबाबत व गट नं.२६४ ची असलेली वस्तुस्थिती सदर तमाम जनतेला माहित व्हावी व खरेदीदारांची/जनतेची फसवणूक होऊ नये याकरिता सदरची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ६.८.२०२६

सही/-
ॲड. अजय उपाध्ये
श्रीनिल सोसायटी, तळमजला
श्री. गणपतीचे देवळाजवळ ब्राम्हणआळी,
अलिबाग-रायगड
मो. ९८५०५७०९७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संजय यशवंत वेलये रा. ट्रॉम्बे मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गोमाशी, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २०४ | ०-५२-०० | ०-१९ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०९/०८/२०२६

सही/-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत श्री. रविंद्र लक्ष्मण देशमुख, रा. कोंदीवडे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खरवंडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ३० | २/ क | ०-३५-९० | ०=८७ |

सदर मिळकतीचा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ९/८/२०२६

ॲड. कैलास गणपत मोरे
बी.एल.एस,एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● शुभमुहुर्त विवाहमंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.

● जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९

● पाटील अँड शेख अकॅडमी SSC, HSC, BA, B.COM, B.SC. उत्तीर्ण आणि अनुत्तीर्ण गृहींणीसाठी, मुलींसाठी, मुलांसाठी सुवर्णसंधी आमच्या टेक्निकल कोर्ससाठी प्रवेश घ्या, उत्तम पगार मिळवून यशस्वी व्हा. सिव्हिल/आर्किटेक्चरल ड्राफ्टसमनची आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमनची नविन बॅच ११ऑगस्ट २०२६ पासुन सकाळी आणि संध्याकाळी सुरु होणार आहे. प्रवेश सुरू झाले ९७५७०९९९२३

● दिशा पॅथॉलॉजी लॅब, मध्ये नोकरीची संधी! १) नर्स १ पद(चोंढी शाखा ) अनुभवी / फ्रेशर्स दोन्ही अर्ज करू शकतात. वेळ : डे शिफ्ट २) डिलिव्हरी बॉईज २-पदे -(अलिबाग शहर) स्वतःचे टू-व्हीलर व वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. संपर्क : ८५५२८ ५५२८८ दिशा पॅथॉलॉजी लॅब, अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




## राशीभविष्य

- **मेष** : प्रतिकूलता कमी होईल. मेकॅनिकल क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. नोकरीत अधिकार वाढतील.
- **वृषभ** : प्रशासन सेवेत अनुकूलता लाभेल. प्रकृतीची काळजी घ्यावी. फार धावपळ, दगदग करू नका.
- **मिथुन** : सरकारी कामं मनासारखी होतील. नव्या विचारांना चालना मिळेल. कलेतून अर्थार्जन घडेल.
- **कर्क** : खर्चाचे प्रसंग वाढतील. आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. वाद-विवादापासून दूर रहावं.
- **सिंह** : सौख्याच्या घटना घडतील. सरकारी कामांना अधिक प्राधान्य द्या. स्थावर कामं मनाजोगी होतील.
- **कन्या** : आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. दूरचे प्रवास टाळावे.
- **तूळ** : योजलेल्या कामांना गती मिळेल. आर्थिक कामं मनासारखी होतील. नोकरीत अधिकार वाढतील.
- **वृश्चिक** : कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सुख लाभेल. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या संधींचा लाभ उठवावा. शुक्र-गुरूचा त्रिकोणयोग लाभदायक ठरेल.
- **मकर** : फार चिंता करू नका. महत्त्वाच्या कामात स्वत: लक्ष घालावं. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल.
- **कुंभ** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. अनुकूलता वाढणार आहे. कला-गुणांचा विकास होत जाईल.
- **मीन** : नव्या विचारांना चालना मिळेल. सुसंधींचा लाभ उठवावा. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका.

## ९ ऑगस्ट

दिन विशेष

**१९४२** : 'चले जाव' चळवळीची सुरुवात.
**२०१३** : पी. व्ही. सिंधू जागतिक बॅडमिंटन स्पर्धेची उपांत्य फेरी गाठणारी पहिली महिला खेळाडू बनली.
**२०१७** : आझाद मैदानात मराठा महामोर्चासाठी प्रचंड जनसमुदाय एकत्र.
**२०१८** : राज्यसभेच्या उपाध्यक्षपदी संयुक्त जनता दलाचे भाजप पुरस्कृत उमेदवार हरिवंश नारायण सिंह यांची निवड.

आरोग्यमंत्र

## मेंदूच्या सक्षमतेसाठी...

मेंदूला ताण दिल्यामुळे तो अधिक काळ सक्षम राहतो असं तज्ज्ञ सांगतात. त्यामुळेच मेंदूची ही गरज भागवण्यासाठी सामाजिक विषयांवर चर्चा करणं हा उत्तम उपाय ठरतो. या हेतूने वादविवादांमध्ये सहभागी व्हावं. विविध विषयांवर भरपूर बोलावं. अन्य उपायही अवश्य अवलंबावे.

* सहा तासांपेक्षा कमी वेळ झोपल्याने मेंदूच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. अपुऱ्या झोपेमुळे मेंदूतल्या पेशी मृतवत होतात. यामुळे दृष्टिदोष, श्वसनास त्रास होणं यासारख्या समस्याही निर्माण होतात. * मेंदूला व्यायाम मिळावा यासाठी शब्दकोडी सोडवा. सुडोकू खेळा. * न्याहारी टाळू नका. रात्रभर उपाशी राहिल्यानंतर सकाळी शरीराला आणि मेंदूला पोषक घटकांची आवश्यकता असते.



न्याहारी टाळल्याने मेंदूचं कार्य मंदावतं, शरीरात रक्ताची पातळी कमी होते. यामुळे मेंदूला पुरेसे पोषक घटक मिळत नाहीत. * धूम्रपानामुळे मेंदूतल्या नसा आक्रसतात तसंच अल्झायमर आणि डिमेंशियासारखे विकार जडण्याची शक्यता वाढते. * डोक्यावर पांघरूण घेऊन झोपल्याने शरीराला ऑक्सिजन कमी प्रमाणात मिळतो. कार्य सुरू ठेवण्यासाठी मेंदूला ऑक्सिजनची गरज असते पण डोक्यावरून पांघरूण घेतल्याने शरीरात कार्बन डाय ऑक्साइड अधिक प्रमाणात शोषला जातो. * मोबाईल तसंच इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या संपर्कात राहिल्याने मेंदूवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे मोबाईल लांब ठेवावा. रात्री मोबाईल जवळ ठेऊ नये.

कोण होणार?

## बना पेट ग्रूमर

तुम्हाला प्राणी आवडतात का? तुमच्या घरी एखादा पाळीव प्राणी असेल. त्याची तुम्ही खूप काळजी घेत असाल. कुत्रा किंवा मांजरासाठी एखादा शर्ट आणत असाल. त्यांचे केस छान विंचरत असाल. तुम्हाला प्राणी आवडत असतील तर पेट ग्रुमिंगचं करीअर निवडायला हरकत नाही. पेट ग्रुमिंगमध्ये कुत्रा आणि मांजरांना तयार केलं जातं. काहीजण घोडा आणि सश्यांनाही ग्रूम करतात. माणसांप्रमाणे प्राण्यांचीही नीट काळजी घ्यावी लागते. प्राण्यांचे मालकही त्यांची विशेष काळजी घेण्यावर भर देतात. म्हणून पेट ग्रूमर्सच्या मागणीत वाढ होत आहे. पाळलेल्या प्राण्याचं आरोग्य चांगलं रहावं, तो प्राणी छान दिसावा असं अनेकांना वाटत असतं. पेट ग्रुमिंगमधलं करीअर वाटतं तितकं सोपं नाही. प्राणी कसे वागतील याचा काहीच नेम नसतो. त्यामुळे त्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. काही प्राणी अजिबात सहकार्य करत नाहीत. दुसऱ्यांना हात लावू देत नाहीत. अशा वेळी त्यांना कसं हाताळायचं हे ठरवावं लागतं. पेट ग्रुमिंगचं करीअर निवडण्यासाठी पाळीव प्राण्यांच्या गरजा जाणून घ्यायला हव्या.

ब्युटी टॉक

## लेजर उपचार घ्यावेत का?

ॲक्ने तसंच चेहऱ्यावर पडणारे चट्टे, डाग यावर लेजर उपचार करता येतात. मात्र याबाबत काही गैरसमजही आहेतॲक्ने तसंच डागांवर लेजर उपचार घेण्यासंबंधीचं हे मार्गदर्शन...

फ्रॅक्शनल सीओ २ लेजर ही एफडीएने मान्यता दिलेली निर्धोक लेजर उपचारपद्धती आहे. या पद्धतीने डाग दूर करताना उर्वरित त्वचेचं कोणतंही नुकसान होत नाही. लेजर उपचार वेदनादायी असतात असं अनेकींना वाटतं. पण या दरम्यान टॉपिकल ॲनॅस्थेशिया क्रीम लावलं जात असल्याने त्वचा लाल होत नाही. या उपचारपद्धतीचे परिणाम ॲक्ने आणि डागांचा प्रकार, कालावधी आणि तीव्रता यावर अवलंबून असतात. लेजर उपचारांनंतर त्वचा लाल होणं, सूज येणं, त्वचा कोरडी पडणं अशा समस्या जाणवतात. पण साधारण आठवड्याभरात या दुष्परिणामांची तीव्रता कमी होते. लेजर उपचार घेतल्यानंतर त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. बाहेर जाताना एसपीएफ ३० पेक्षा अधिक क्षमेतचं सनस्क्रीन लावा. उपचारांनंतर दोन ते तीन दिवस चेहऱ्यावर बर्फ फिरवा. यामुळे सूज आणि लालसरपणा कमी व्हायला मदत होते.

### पंचांग

**रविवार, ९ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ कृ. ११, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : मृगशीर्ष, योग : हर्षण, सूर्योदय ६.२०, सूर्यास्त ७.०८

### फॉरवर्ड्स

**बरगद क़े दरख़्तों क़ी तरह हैं हम...**

**जहाँ दिल लग़ जाएं वहाँ ताउम्र खड़े रहतें हैं...!**

### भटकंती

कर्नाटकात देवबाग नावाचं ठिकाण आहे. अरबी समुद्राच्या किनारी वसलेलं देवबाग रम्य आणि निसर्गसौंदर्याने नटलेलं पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. या भागाचं सौंदर्य न्याहाळण्यासाठी तुम्ही सदाशिवगड किल्ला चढू शकता. सज्जेश्वर आणि नरसिंह मंदिरालाही भेट द्या. यामुळे तुम्हाला देवबागचा इतिहास जाणून घेता येईल. देवबागमध्ये पर्वतरांगाही आहेत आणि अथांग समुद्रही आहे. हे दृश्य खूपच विहंगम दिसतं. कुरूमगड किल्ला आणि लाईटहाउस हे इथलं खास आकर्षण. इथे तुम्ही भरपूर खरेदीही करू शकता. शिंपल्यांपासून बनवलेल्या सुंदर वस्तू इथे मिळतात. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## भाषाअभ्यासक होण्यासाठी...

सध्या भारताचा परदेशी व्यापार वाढत आहे. त्यामुळे विविध देशांशी संबंध वृद्धिंगत होत आहेत. अशाप्रकारे विविध देशांशी व्यवहार करताना त्या त्या देशाची भाषा अवगत असणं आवश्यक असतं. म्हणूनच बहुसंख्यांनी परदेशी भाषा शिकल्या पाहिजेत, असा फॉरेन लँग्वेजेस स्टडीजचा हेतू असतो. परंतु भाषांचा अभ्यास संवाद साधण्यापलिकडच्या पातळीवर जाऊन केला पाहिजे, असं आता लक्षात येऊ लागलं आहे. हा अभ्यास केवळ परदेशीयांशी संवाद साधता यावा म्हणून करायचा नाही तर या भाषांमध्ये दडलेल्या सौंदर्याचा आणि इतिहासाचा वेध घेण्यासाठी करण्याजोगा आहे. खुद्द आपल्या देशामध्येही भरपूर भाषा आहेत आणि त्या त्या राज्यातली संस्कृती भाषांशी निगडित आहे. त्यातल्या काही भाषा तर निव्वळ बोलीभाषा आहेत. त्यांची वेगळी लिपीसुद्धा अस्तित्वात नाही. त्यामुळेच काही भाषा नष्ट होत आहेत. दुर्लक्ष केल्यामुळे त्या भाषा बोलणारे कोणीच अस्तित्वात राहिले नाही तर त्या संस्कृतीतील अनेक संकल्पना कायमच्या अज्ञात राहतील. म्हणून भारतातल्या काही विद्यापीठांनी केवळ भाषांचा डॉक्टरेटपर्यंतचा अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिला आहे. इच्छुकांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.




खेचाखेची

### कर्ज

एका माणसाने कार घेण्यासाठी कर्ज घेतलं.

ते कर्ज फेडू न शकल्याने बँकेचे अधिकारी ती कार घेऊन गेले.

यावर तो माणूस म्हणाला, मला माहीत नव्हतं, नाही तर मी लग्नासाठी पण कर्ज घेतलं असतं.

### वेगळं काही

अमरनाथप्रमाणेच एक शिवलिंग दूरदेशी ऑस्ट्रियातही तयार होतं. या देशातल्या सल्जबर्ग शहरातल्या वरफेनजवळ ४० किलोमीटर लांबीची नैसर्गिक हिमगुहा आहे. या गुहेत बर्फाचा शिवलिंगासारखाच आकार तयार झाला आहे. हे शिवलिंग अमरनाथच्या तुलनेत अनेक पटींनी मोठं आहे. या गुहेत एक किलोमीटर लांबीचा जिना तयार करण्यात आला आहे. या पायऱ्यांवरून इथल्या शिवलिंगापर्यंत पोहोचता येतं. हे शिवलिंग ७५ फूट उंच आहे. ही जगातली सर्वात लांब हिम गुहा आहे. १८७९ मध्ये या गुहेचा शोध लागला. इथे बर्फापासून तयार झालेले शिवलिंगासारखे आकार पहायला मिळतील. मे ते ऑक्टोबर दरम्यान ही गुहा पर्यटकांसाठी खुली असते.

टेक केअर

## ...अशी घ्या पेंटिंगची काळजी!

एखाद्या सुंदरशा पेंटिंगमुळे घराचा संपूर्ण लूक बदलून जातो. उत्कृष्ट पेंटिंगमुळे आपली अभिरुचीही व्यक्त होते. मात्र पेंटिंगची किंमत बरीच जास्त असल्यामुळे ती खराब होऊ नयेत यासाठी काही बाबींची दखल घ्यावी लागते.



* पेंटिंग केवळ वरच्या बाजूने पकडू नये. दोन्ही हातांनी सपोर्ट द्यावा. * पेंटिंग स्वच्छ करण्यासाठी ब्रशचा वापर केल्यास ओरखडे पडण्याची शक्यता असते. अशा वेळी पेंटिंग स्वच्छ करण्यासाठी वेलवेटच्या कापडाचा वापर करणं गरजेचं आहे. * पेंटिंग कुठे लावलं जातं हे देखील महत्त्वाचं आहे. शक्यतो बाहेरच्या भिंतीवर पेंटिंग लावू नये. या जागी मॉईश्चर जमा होऊन पेंटिंग खराब होण्याची दाट शक्यता असते. * पेंटिंग घराच्या सर्वात वरच्या मजल्यावर ठेवणं टाळावं. यामुळे उष्णतेचा थेट प्रभाव पडून कॅनव्हास खराब होण्याची शक्यता वाढते. * पेंटिंग काढून ठेवायचं असल्यास प्लास्टीक शीटमध्ये गुंडाळू नये. * पावसाळ्यात पेंटिंगला फंगस लागण्याचा संभव असतो. त्यापासून जपावं. * पेंटिंगला उघड्या हाताने स्पर्श करणं टाळावं. त्वचेवर थोड्या प्रमाणात तेल असतं. त्यामुळे पेंटिंग खराब होण्याची शक्यता असते.

## सुडोकू १३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | ८ | ६ |
| ७ | ६ | | | | | ३ | | ९ |
| | ९ | २ | ३ | | ८ | १ | ७ | ५ |
| | ४ | | ७ | ३ | ६ | | | ८ |
| ६ | | | | १ | | | | ४ |
| ८ | | | ९ | ४ | ५ | | १ | |
| ३ | ५ | ६ | १ | | ७ | ८ | ४ | |
| १ | | ४ | | | | ९ | ६ | ७ |
| २ | ७ | | | | | | | |


**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २ | ८ | ९ | १ | ५ | ४ | ३ | ६ |
| १ | ३ | ४ | ६ | ८ | २ | ९ | ५ | ७ |
| ५ | ९ | ६ | ७ | ३ | ४ | २ | १ | ८ |
| २ | ५ | ७ | ८ | ६ | १ | ३ | ४ | ९ |
| ८ | ४ | १ | २ | ९ | ३ | ६ | ७ | ५ |
| ९ | ६ | ३ | ५ | ४ | ७ | १ | ८ | २ |
| ३ | ७ | २ | १ | ५ | ६ | ८ | ९ | ४ |
| ४ | ८ | ५ | ३ | २ | ९ | ७ | ६ | १ |
| ६ | १ | ९ | ४ | ७ | ८ | ५ | २ | ३ |

# शब्दकोडे क्रमांक १३६



**आडवे शब्द :-**
१) वयोवृद्ध
४) अवधान
६) कानाजवळचा भाग
९) मऊ
११) गवंडी
१२) रम्य
१३) हिंमत, धैर्य
१५) घर
१७) मंदिर
१८अ) एक ज्वालाग्रही पदार्थ
१९) सुंदर शरीरची ठेवण, बांधा इ
२१) रतिचा पती
२४) बारा वर्षाचा काळ
२६) परस्पर
२९) बारीक झणझण
३०) उद्याच्या नंतरचा दिवस
३२) पोळी भाजण्याचे पात्र
३४) तृण
३६) बारीकसारीक
३९) कापसाची बी
४१) प्रामाणिक
४२) पदार्थाचा सूक्ष्म भाग
४३) तमाशातील नाट्य
४५) प्रारब्ध देवता
४६) कमळ
४८) बेचव
५०) उद्यान
५२) दात
५२) पद्धत
५३) विरोध
५५) लक्ष्मीचे एक नाव
५७) हत्तीवर बसण्याची सुशोभित बैठक
५९) प्रसार करणारा
६१) मस्त स्त्री
६३) दक्षतेचा इशारा
६५) वार्ताहर
६७) हाकेला दिलेले उत्तर
६८) पत्रातील साष्टांग नमस्कार
७०) व्यक्ती
७२) च्या बरोबर
७३) दुष्ट माणूस
७७) जोड
७८) रात्रभर
७९) घाबरणे
८०) एक रंगीत कंदमूळ

**उभे शब्द :-**
२) चांदणी
३) राजकारभाराचे शहर
४) वजन
५) वंदन
६) कायद्याप्रमाणे
७) गार
८) वधू-वर
९) रसवान
१०) अंत:करण
१४) मांडी, आकडा बांबू
१६) मृत
१८) काळदेवता
२०) सुसर
२२) किंमत
२३) इंद्रिय, घटक
२५) पडणे
२७) हिस्सा, वाटा
२८) समुद्रातील तांबड्या रंगाचा मासा
३०) घागरा
३१) एक द्विदल धान्य,
३३) दिवस
३५) कोल्ह्यासारखा एक जंगली श्वापद
३७) सोने
३८) लोणी
४०) किडा
४१) शिर्डीचे संत
४४) मगज
४६) प्रधानमंत्री
४७) विष
४९) दरबारातील मानकरी
५१) निर्धन
५४) गावाखालची जमीन
५६) सामान
५८) येशू ख्रिस्त
५९) खार--एक प्राणी
६०) लहान
६१) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
६२) वर्षानुवर्षे
६४) वस्ती
६६) पुत्र, मुलगा
६९) अब्रू
७१) काळोख
७२) सरळ वासा
७३) गाढव
७४) साठी बुद्धी **
७५) कापणे (इं )
७६) पिशाचासाठी ठेवलेले अन्न
७७) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



**विद्यार्थी वर्गाच्या ताज्या आंदोलनानंतर सरकार आणि इतर संस्थांवर दबाव कायम ठेवण्याचा संदेश आयोजकांतर्फे देण्यात आला. लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार महत्त्वाचा असला, तरी तो घटनात्मक चौकटीत आणि संस्थांचा सन्मान राखूनच वापरला गेला पाहिजे. परीक्षांमधील गैरव्यवहाराविरोधात कठोर कायद्याची गरज मान्य करत सरकारला जनशक्तीपुढे झुकावे लागले. यापुढील काळातही सरकारला सावध रहावे लागणार आहे.**

# जनशक्ती तरली, सरकारशाही सरली




प्रा. अशोक ढगे

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशातील विद्यार्थी आंदोलनाला यश मिळाल्याचे चित्र निर्माण झाले. आंदोलनकर्त्यांनी हा विजय मानला, तर विरोधकांनी सरकारच्या माघारीचे प्रतीक म्हणून त्याकडे पाहिले; मात्र एखाद्या मंत्र्याचा राजीनामा म्हणजे समस्येचा शेवट नसतो. तो केवळ एका राजकीय जबाबदारीचा स्वीकार असतो. प्रश्न आहे, तो देशातील परीक्षा व्यवस्था, न्यायव्यवस्थेची गती, संस्थात्मक जबाबदारी आणि तरुणांच्या ढासळणाऱ्या विश्वासाचा. 'कॉक्रोच जनता पार्टी' (सीजेपी) चे संस्थापक अभिजीत दीपके यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर कॉक्रोच जनता पार्टीच्या प्रवक्त्याने 'हा फक्त ट्रेलर आहे, चित्रपट अजून बाकी आहे' अशी प्रतिक्रिया दिली. या विधानातून आंदोलन केवळ शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर थांबणार नसून न्यायालय, सरकार आणि इतर संस्थांवर दबाव कायम ठेवण्याचा संदेश देण्यात आला.

लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार महत्त्वाचा असला, तरी तो घटनात्मक चौकटीत आणि संस्थांचा सन्मान राखूनच वापरला गेला पाहिजे. अलिकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी केलेल्या मौखिक निरीक्षणांचे छोटे व्हिडीओ कापून सामाजिक माध्यमांवर व्हायरल करण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेकदा या क्लिप्स संदर्भविरहित असतात आणि न्यायालयाने अंतिम निकाल दिल्याचा भास निर्माण करतात. त्यामुळे न्यायालयाने थेट प्रक्षेपणातील व्हिडीओ क्लिप्सचा वापर करण्यावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला. त्यापूर्वी न्यायमूर्तींविरुद्ध आक्षेपार्ह भाषा वापरणे आणि न्यायालयीन शिष्टाचाराचे उल्लंघन झाल्यानंतर वैयक्तिक प्रकरणांच्या थेट प्रक्षेपणावरही मर्यादा आणण्यात आल्या होत्या. हा निर्णय अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा नसून न्यायालयीन प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवण्याचा प्रयत्न आहे. आजच्या 'रिल' संस्कृतीत काही सेकंदांचा व्हिडीओ संपूर्ण सत्य ठरत नाही. न्यायालयीन प्रक्रियेला पूर्ण संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

'नीट पेपरफुटी'च्या घटनांनंतर पुन्हा एकदा राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) रचनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सर्वोच्च न्यायालयानेच राष्ट्रीय पातळीवर नीट परीक्षा घेण्यास मान्यता दिली होती; मात्र परीक्षा यंत्रणा मजबूत करण्यासाठी स्थापन झालेल्या विविध समित्यांच्या अनेक शिफारशी अद्याप कागदावरच आहेत. सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे 'एनटीए' मध्ये कायमस्वरूपी अधिकाऱ्यांची कमतरता. मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कर्मचारी आणि आउटसोर्सिंगवर अवलंबून असलेली संस्था लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणाऱ्या परीक्षा घेते. प्रश्नपत्रिका छपाई, वाहतूक आणि तांत्रिक व्यवस्थापन यांसारखी अत्यंत संवेदनशील कामे खासगी संस्थांकडे सोपवण्यात आली आहेत. अशा परिस्थितीत गोपनीयता धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ एखाद्या अधिकाऱ्याला निलंबित करून किंवा काही कर्मचाऱ्यांना काढून टाकून प्रश्न सुटणार नाही. 'एनटीए'ला वैधानिक दर्जा, स्पष्ट अधिकार, निश्चित जबाबदारी आणि संसदीय उत्तरदायित्व देण्याची वेळ आली आहे.

पेपरफुटी रोखण्यासाठी केंद्र सरकारने कठोर कायदा केला आहे. दहा वर्षांपर्यंत कारावास आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे; मात्र, कायदे जितके महत्त्वाचे असतात, त्याहून अधिक महत्त्वाची त्यांची प्रभावी अंमलबजावणी असते. देशातील फास्ट ट्रॅक न्यायालयांमध्येच लाखो प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हा न्यायालयांमधील कोट्यवधी खटले, उच्च न्यायालयांमधील रिक्त जागा आणि सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित याचिका यामुळे न्याय मिळण्यास विलंब होत आहे. 'जलद न्याय' ही संकल्पना प्रत्यक्षात अनेकदा वर्षानुवर्षे चालणाऱ्या प्रक्रियेत अडकते. विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. एका पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि मानसिक नुकसान होते. त्यानंतर वर्षानुवर्षे न्यायालयीन लढाई सुरू राहते. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे करिअर, स्पर्धा आणि मानसिक आरोग्य यावर गंभीर परिणाम होतो. सरकारने सर्वोच्च न्यायालयात काही नवीन न्यायाधीशांची नियुक्ती केली असली, तरी उच्च न्यायालये आणि जिल्हा न्यायालयांमधील मोठ्या प्रमाणावरील रिक्त जागा अजूनही भरलेल्या नाहीत. देशभरात जाणवणारी न्यायाधीशांची कमतरता हे न्यायव्यवस्थेतील विलंबाचे प्रमुख कारण आहे. तपास समित्या नेमणे, अहवाल सादर करणे आणि विशेष न्यायालयांची घोषणा करणे या उपायांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष भरती, न्यायालयीन पायाभूत सुविधा आणि डिजिटल न्यायव्यवस्थेचा विस्तार आवश्यक आहे.

लोकशाहीत आंदोलन करणे हा घटनात्मक अधिकार आहे; मात्र आंदोलनाच्या नावाखाली हिंसाचार, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, न्यायमूर्ती किंवा घटनात्मक पदांवरील व्यक्तींविषयी अश्लील भाषा वापरणे अथवा 'सोशल मीडिया'वर द्वेषपूर्ण प्रचार करणे याला अभिव्यक्तीस्वातंत्र्य म्हणता येणार नाही. त्याच वेळी, आंदोलनकर्त्यांवर दाखल केलेले गुन्हेही निष्पक्षपणे तपासले गेले पाहिजेत. एखाद्या प्रकरणात सरकारने खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला, तर त्यामागील निकष पारदर्शक असले पाहिजेत. समान घटनांमध्ये वेगवेगळे निकष लावले गेले, तर न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. गेल्या दशकात देशभरात पेपरफुटीच्या शेकडो घटना घडल्या. लाखो विद्यार्थ्यांना त्याचा फटका बसला. प्रत्येक घटनेनंतर चौकशी समिती, कठोर कायदे, नवीन आश्वासने आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांची पुनरावृत्ती झाली; मात्र मूलभूत सुधारणा मात्र संथ गतीनेच झाल्या. प्रधान यांनी राजीनामा देताना विद्यार्थ्यांचे भविष्य न्यायालयीन प्रक्रियेत अडकू नये, म्हणून आपण बाजूला होत असल्याचे म्हटले. ही भूमिका राजकीयदृष्ट्या महत्त्वाची असली, तरी विद्यार्थ्यांसाठी अधिक महत्त्वाचे आहे ते पारदर्शक परीक्षा, वेळेत निकाल, दोषींना जलद शिक्षा आणि विश्वासार्ह संस्था. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी 'केवळ एका राजीनाम्याने राष्ट्र घडत नाही' असे म्हटले. या विधानात मोठा संदेश दडला आहे. व्यक्ती बदलून व्यवस्था बदलत नाही. व्यवस्था बदलण्यासाठी संस्थात्मक सुधारणा, जबाबदारी आणि सातत्यपूर्ण राजकीय इच्छाशक्ती आवश्यक असते. प्रधान यांचा राजीनामा हा एका टप्प्याचा शेवट असू शकतो; परंतु तो समस्येचा शेवट नाही.

देशातील परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता, न्यायालयीन प्रक्रियेचा वेग, 'एनटीए'सारख्या संस्थांचे बळकटीकरण, न्यायाधीशांच्या रिक्त जागा भरणे आणि आंदोलनांच्या घटनात्मक चौकटीचे संरक्षण हे खरे राष्ट्रीय अजेंडे आहेत. आज गरज राजीनाम्यांची नाही, तर उत्तरदायी संस्थांची आहे. युवकांचा लोकशाहीवरील विश्वास टिकवायचा असेल, तर सरकार, न्यायपालिका आणि परीक्षा यंत्रणा या तिन्ही स्तंभांनी केवळ आश्वासने नव्हे, तर प्रत्यक्ष आणि दीर्घकालीन सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. तेव्हाच देशातील तरुणांना न्याय, संधी आणि भविष्य याबद्दल खऱ्या अर्थाने विश्वास वाटेल. दुसऱ्या बाजुने पाहता निवडणुकीत मिळालेले बहुमत हे जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असते; परंतु तो विश्वास टिकवण्यासाठी उत्तरदायित्वही स्वीकारावे लागते. तरुणांच्या आकांक्षा दुर्लक्षित करता येत नाहीत. रोजगार, शिक्षण, गुणवत्ता आणि न्याय या प्रश्नांवर संवेदनशीलता दाखवावीच लागेल. अन्यथा, असंतोष अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकतो. लोकशाहीचा खरा अर्थ निवडणूक जिंकण्यात नसून लोकांचा विश्वास जिंकण्यात आहे. परीक्षांमधील गैरव्यवहाराविरोधात कठोर कायद्याची गरज मान्य करायला लावली आणि उत्तरदायित्वाची जाणीव करून दिली. जनशक्तीपुढे सरकारला झुकावे लागले, हे वास्तव आहेच, पण यापुढील काळात याबाबत सरकारला विशेष दक्ष रहावे लागणार आहे.**

# आदिवासी हेच खरे वनसंपदेचे रक्षक

रणवीरसिंह राजपूत

बंधू-भगिनींनो,आदिवासी (वनवासी) हेच खरे जंगलं - अभयारण्यांचे अर्थातच वनसंपत्तीचे रक्षक आहेत. आदिवासी हा मुळात शांतताप्रिय समाज आहे. हे लोक अनुसूचित जमातीत मोडत असून, निसर्गावर प्रेम करणारे आहेत.

वनसंपदेचे रक्षण व संवर्धन करणारे अन् निसर्गाशी अतूट बांधिलकी ठेवणारे वनवासी अशी त्यांची खरी ओळख आहे.

आदिवासी हा खरं तर, जल, जंगल, जमीन यांचा रक्षणकर्ता आहे. या पार्श्वभूमीवर हा समाज मानवजातीच्या दृष्टीने परोपकारी आहे, हे सिद्ध होते. तथापि दैनंदिन जीवनात या समाजाला उदरनिर्वाहासाठी खूप काबाडकष्ट करावे लागते. मुख्यतः ग्रामीण क्षेत्रात आदिवासी पाड्यांमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या आदिवासी कुटुंबांचा शिक्षणाकडील कल कमी असल्याचे दिसते. विशेष म्हणजे त्यांच्याकडे चल-अचल अशी कोणतीही वडिलोपार्जित मालमत्ता नसते. परिणामी ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. महत्वाचे म्हणजे आदिवासी पाड्यामध्ये राहणाऱ्यांना विकासाची दिशा दाखविणारा आज कोणी बिरसा मुंडासारखा सच्चा मार्गदर्शक, हितैषी वा आधारवड नाही. तथापि, शिकून सवरून शहरात कायमस्वरूपी राहणाऱ्या आदिवासी युवकांनी विविध क्षेत्रात आघाडी घेतल्याचे दिसते.

असे असूनही विविध कारणांमुळे आजही जागतिक पातळीवर त्यांची पाहिजे तेवढी उन्नती झाली नसल्याचे निष्पन्न होते.या पार्श्वभूमीवर 'युनो' या जागतिक संघटनेने जगभरात राहणाऱ्या आदिवासींच्या ज्वलंत प्रश्नांवर प्रकाश टाकून ते सोडविण्याच्या उद्देशाने ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विश्वात ९ ऑगस्ट १९९५ रोजी पहिला जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागाने आदिवासी समाजाचे दैवत धरती आबा क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या स्मरणार्थ ९ ऑगस्ट हा दिवस आदिवासी दिन म्हणून राज्यात साजरा करण्याचा निर्णय घेतला. कारण धरती आबा बिरसा मुंडा यांनी आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी इंग्रजांशी लढा देत आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांच्या महान स्मृतींना आम्ही मानवंदना देतो.

जगात वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आदिवासी-वनवासी लोकांच्या आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार व्हावा अन् वरील प्रश्नांची सोडवणूक होऊन त्यांचे जीवन सुखी व समृद्ध व्हावे तसेच त्यांचे वन जमिनीसंदर्भातील हक्कांना मान्यता मिळावी,हेच हा दिवस साजरा करण्यामागील मुख्य उद्दिष्ट आहे.

बिरसा मुंडा यांची १९ व्या शतकात जननायक म्हणून जनमानसात ख्याती होती. बिरसा मुंडा यांनी समस्त मुंडांना संघटित करून लगान माफीसाठी तीव्र आंदोलन छेडले. त्या काळात मिशनरी आदिवासींचे बळजबरीने धर्मांतर करीत असत.त्यालाही क्रांतिवीर बिरसा मुंडा यांनी तीव्र विरोध केला. इतकेच नव्हे तर,बिरसा मुंडा यांनी आपल्या समाजात जनजागृती करून धर्मांतराचे गैरप्रकार संघटितपणे थांबविलेत. तथापि, आदिवासींवर इंग्रजांकडून होणाऱ्या अमानूष अत्याचारांचा राग अनावर होऊन बिरसा मुंडा व त्यांचे लढाऊ मुंडांनी इंग्रज शिपायांवर सशस्त्र हल्ले करून सर्वशक्तीनिशी त्यांना तसे उत्तर दिले. इंग्रज सरकारने प्रतिशोध घेण्याच्या दुष्ट हेतूने जशास राजद्रोहाखाली दरम्यान बिरसा मुंडा अन् त्यांच्या शेकडो मुंडांची कटकारस्थान करून धरपकड केली. त्यांना तुरुंगात डांबून त्यांचा अमानूष छळ केला. त्यातच बिरसा मुंडा यांचा संशयास्पद स्थितीत रांची कारागृहात मृत्यू झाला. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षीच त्यांनी देशासाठी प्राणाची आहुती दिली.त्यांच्या या महान बलिदानाला तमाम भारतीयांकडून त्रिवार मानाचा मुजरा...!

कृतज्ञतेच्या भावनेतून बिरसा मुंडाच्या स्मृतींना उजाळा देत, महायुती सरकारने आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी ठोस योजना राबविल्या आहेत. महायुती सरकारने मागील कार्यकाळात आदिवासींसाठी 'वन हक्क कायदा' अमलात आणून त्यांना वनोपजांचे अधिकार देण्यात आले. त्यामुळे रोजगारांची निर्मिती होऊन त्यांना आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांना आत्मनिर्भर बनण्यास चालना मिळत आहे.केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांमुळे आदिवासी शिक्षित मुली ह्या 'एअर होस्टेज' होऊ लागल्या आहेत. आदिवासी मुला -मुलींना परदेशात उच्च शिक्षण घेणं सुकर व्हावे, या उद्देशाने राज्य सरकारने त्यांच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ४.५ लाखावरून ६ लाख केली आहे.आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळात आदिवासी जनजातीचे सुशिक्षित मुलं आता आय ए एस/आय पी एस होऊ लागले, ही दिलासादायक गोष्ट आहे. परदेशात मान्यताप्राप्त विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर आणि पीएच.डी.करण्यास पूर्ण अर्थ देणे, खावटी योजना/धान्यकोष योजना, अतिदुर्गम भागातील आदिवासी कुटुंबांसाठी वाडी कार्यक्रम योजना, आदिवासी विद्यार्थिनींची शाळांमधील गळती थांबविण्यासाठी प्रोत्साहन भत्ता अशा तत्सम योजना खासकरून आदिवासींसाठी राज्य सरकारने राबविल्या आहेत. आदिवासी शेतकऱ्यांना राज्य व केंद्र सरकारकडून कृषी व कृषीपूरक उद्योगांसाठी अर्थसहाय्य अन् अल्प दरात कर्जही मिळत असते. आदिवासी जनजातीच्या मुलामुलींना मोफत शैक्षणिक सोयी- सुविधा, वसतिगृहे, मुलींसाठी होस्टेल्स या सोयी-सवलती मिळू लागल्याने त्यांना शिक्षण घेणं सुकर होऊन त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे.आदिवासी महिलांमधील सुप्त गुणांना वाव देण्याच्या उद्देशाने व त्यांना रोजगार - स्वयं रोजगार मिळावेत यासाठी 'वारली' हस्तेकलेला प्रोत्साहित करण्यासाठी राज्य सरकारकडून सर्वतोपरी सहाय्य मिळते. याशिवाय धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष योजना, एकलव्य कुशल कौशल्य विकास योजना, शबरी आदिवासी वित्त महामंडळाच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. अंततः आदिवासी बंधू-भगिनींचा सर्वांगीण विकास करून त्यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणणे, हेच केंद्र व राज्य सरकारचे आद्य उत्तरदायित्व असून त्यासाठी ते कटिबद्ध आहेत. आदिवासी समाजाचा सर्वांगी उत्कर्ष करून त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देणं म्हणजे हीच खरी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांना मानवंदना ठरेल.

क्रांतिवीर बिरसा मुंडा अमर रहे! जय हिंद! जय महाराष्ट्र! **



## जबाबदार नागरिक घडविण्यासाठी शिक्षणात आमूलाग्र परिवर्तन

# विकसित भारताची अपरिहार्य गरज

सुनील गवळी



'शिक्षणाचा खरा उद्देश केवळ उपजीविकेचे साधन निर्माण करणे नसून, राष्ट्राला दिशा देणारा नागरिक घडविणे हा आहे.' आज भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, डिजिटल अर्थव्यवस्था, संरक्षण, अवकाश संशोधन आणि जागतिक नेतृत्व या सर्व क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. परंतु कोणत्याही राष्ट्राची खरी उंची त्याच्या आर्थिक विकासाने नव्हे, तर तेथील नागरिकांच्या चारित्र्याने, सार्वजनिक शिस्तीने, सामाजिक उत्तरदायित्वाने आणि संविधानिक निष्ठेने मोजली जाते. म्हणूनच भारतासमोर आज उभा असलेला सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपली शिक्षण व्यवस्था केवळ कुशल मनुष्यबळ घडवत आहे की जबाबदार नागरिकही घडवत आहे?

आजच्या शिक्षण व्यवस्थेत ज्ञान, गुण, स्पर्धा आणि करिअर यांना मोठे महत्त्व आहे. हे आवश्यक असले तरी ते पुरेसे नाही. समाजात वाढणारी असहिष्णुता, भ्रष्टाचार, सार्वजनिक संपत्तीची हानी, वाहतूक नियमांचे उल्लंघन, पर्यावरणाविषयीची उदासीनता, सामाजिक माध्यमांचा बेजबाबदार वापर आणि नागरी कर्तव्यांविषयीची अनास्था या समस्या केवळ कठोर कायद्यांनी सुटणार नाहीत. त्यासाठी मूल्याधिष्ठित आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे शिक्षण आवश्यक आहे.

याच संदर्भात जपानचे उदाहरण जगासाठी प्रेरणादायी ठरते. जपानमध्ये शिक्षणाचा केंद्रबिंदू केवळ बौद्धिक प्रगती नसून चारित्र्यनिर्मिती आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची वर्गखोली स्वच्छ ठेवणे, सार्वजनिक जागांचा आदर करणे, वेळेचे काटेकोर पालन करणे, सहकार्याने काम करणे आणि समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखणे हे शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. विशेष म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारताना त्यांनी स्वतःची सांस्कृतिक ओळख जपली आहे. शुदो (कॅलिग्राफी), हायकू कविता, पारंपरिक कला आणि स्थानिक संस्कृती यांचा अभ्यास त्यांच्या शिक्षणात आजही तितक्याच अभिमानाने केला जातो. त्यामुळे जपानने केवळ प्रगत अर्थव्यवस्था नव्हे, तर सुसंस्कृत समाजही घडविला आहे.

भारताला जपानची नक्कल करण्याची गरज नाही; कारण भारताची स्वतःची संस्कृती, तत्त्वज्ञान आणि मूल्यपरंपरा अत्यंत समृद्ध आहे. वेद-उपनिषदे, भगवान बुद्ध, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद आणि असंख्य समाजसुधारकांनी शिक्षणाला माणूस घडविण्याचे साधन मानले. भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर राष्ट्राची उभारणी केली. त्यामुळे आपल्या शिक्षण व्यवस्थेने ज्ञानाबरोबरच संविधानिक मूल्ये, कर्तव्यभावना, सामाजिक संवेदनशीलता आणि नैतिकता यांचेही शिक्षण देणे आवश्यक आहे.

आज शिक्षणात काही मूलभूत धोरणात्मक बदल करण्याची वेळ आली आहे. विद्यार्थ्यांना नागरिकत्व, संविधान, पर्यावरण, डिजिटल जबाबदारी, आर्थिक साक्षरता आणि सामाजिक सेवा यांचे अनुभवाधारित शिक्षण देणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शाळेच्या परिसराची स्वच्छता, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घ्यावा. अशा कृतींमधून जबाबदारीची भावना निर्माण होते; ती केवळ पुस्तकांतील धड्यांनी निर्माण होत नाही.

त्याचबरोबर परीक्षा पद्धतीतही बदल आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन केवळ लेखी परीक्षेवर आधारित न राहता, त्यांची शिस्त, नेतृत्व, सहकार्य, सामाजिक सहभाग, पर्यावरणीय जाणीव, प्रामाणिकपणा आणि सार्वजनिक उत्तरदायित्व यांचाही विचार केला पाहिजे. अशा मूल्यमापनामुळे शिक्षणाचा उद्देश अधिक व्यापक होईल. या परिवर्तनात शिक्षकांची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची आहे. शिक्षक हा केवळ विषय शिकवणारा नसून मूल्यांचा वाहक आणि समाजाचा संस्कारकर्ता आहे. म्हणून शिक्षक प्रशिक्षणामध्ये नेतृत्व, समुपदेशन, संविधानिक मूल्ये, भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांना विशेष स्थान दिले पाहिजे. विद्यार्थी शिक्षकांचे शब्द कमी आणि आचरण अधिक शिकतात; त्यामुळे शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व हेच शिक्षणातील सर्वात प्रभावी पाठ्यपुस्तक ठरते. शाळा, पालक, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, उद्योग आणि समाज यांनीही या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. नागरिक घडविण्याची जबाबदारी केवळ शाळेची नसून संपूर्ण समाजाची आहे. शिक्षण आणि समाज यांच्यातील दरी कमी केल्याशिवाय राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा मार्ग दाखविला आहे. आता त्या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक शाळेत विद्यार्थी संसद, संविधान क्लब, सामुदायिक सेवा, पर्यावरण प्रकल्प, जीवनकौशल्य शिक्षण आणि स्थानिक संस्कृतीवर आधारित उपक्रम नियमितपणे राबविणे ही काळाची गरज आहे. शिक्षणाची गुणवत्ता केवळ परीक्षेतील निकालांनी नव्हे, तर त्या शाळेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नागरिकत्वाने मोजली गेली पाहिजे.

आज भारत एका ऐतिहासिक टप्प्यावर उभा आहे. पुढील पिढीला आपण कोणते शिक्षण देतो, यावर पुढील शतकातील भारताचे स्वरूप ठरणार आहे. जर आपण केवळ स्पर्धक घडविले तर स्पर्धा वाढेल; पण जर आपण जबाबदार नागरिक घडविले तर समाजात विश्वास, शिस्त, सहकार्य, लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता दृढ होईल.

शिक्षणाचे ध्येय केवळ यशस्वी व्यक्ती निर्माण करणे नसून, चांगला माणूस, सजग नागरिक आणि जबाबदार राष्ट्रनिर्माता घडविणे हे असले पाहिजे. अशा शिक्षणातूनच विकसित भारत, सक्षम लोकशाही आणि सुसंस्कृत समाजाची निर्मिती होईल. आज शिक्षण व्यवस्थेला एकच प्रश्न स्वतःला विचारावा लागेल की आपण विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करीत आहोत, की जीवनासाठी? कारण जीवनासाठी तयार झालेला विद्यार्थीच उद्याचा जबाबदार नागरिक आणि विकसित भारताचा खरा शिल्पकार ठरेल.

**

# आठवणीतील व्यक्तिमत्त्व : प्रभाकर राजाराम परब

धनंजय शेटये

(लाडके अण्णा) माजी पोलिस अधिकारी ''झाड स्वतः उन्हात उभे राहून इतरांना सावली देते; नदी स्वतः वाहत राहून इतरांची तहान भागवते; आणि काही माणसे अशी असतात की, त्यांचे संपूर्ण आयुष्यच इतरांच्या सुखासाठी वाहिलेले असते.''अशाच थोर, सोज्वळ, कर्तृत्ववान आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे श्री. प्रभाकर राजाराम परब आपल्या सर्वांच्या प्रेमाचे, आदराचे आणि विश्वासाचे केंद्रबिंदू असलेले 'लाडके अण्णा'.

समाजासाठी जगणारी माणसे इतिहासात नोंदली जात नाहीत, ती लोकांच्या हृदयात कोरली जातात. त्यांच्या कार्याचा गजर ढोल-ताशांच्या गजरात होत नाही, तर असंख्य कृतज्ञ मनांच्या आशीर्वादात घुमत राहतो. अण्णांचे संपूर्ण आयुष्य हे अशाच निस्वार्थ सेवाभावाचे, निष्कलंक चारित्र्याचे, सचोटीच्या तेजाचे आणि माणुसकीच्या अथांग महासागराचे जिवंत उदाहरण आहे. आज वयाची ऐंशी वर्षे पूर्ण करत असताना त्यांनी उभा केलेला आदर्श केवळ त्यांच्या कुटुंबाचा किंवा गावाचा नसून संपूर्ण समाजाचा अभिमान बनला आहे.

**संघर्षातून घडलेला हिरा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डोंगर-दऱ्यांनी वेढलेल्या चुनवरे गावातील साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या प्रभाकरजींच्या आयुष्याची सुरुवात ऐश्वर्याने नव्हे, तर संघर्षाने झाली. गरिबी, कठोर परिश्रम आणि मर्यादित साधनसामग्री यांच्यात त्यांचे बालपण फुलले. पण परिस्थितीने त्यांना कधीच खचवले नाही; उलट तिने त्यांना अधिक सक्षम, अधिक कणखर आणि अधिक संवेदनशील बनवले.

त्या काळात गावात शिक्षणाच्या सुविधा अत्यल्प होत्या. तरीही दररोज तीन-चार किलोमीटरचा डोंगराळ, खडतर आणि काटेरी रस्ता अनवाणी पायांनी तुडवत ते पोईप येथील सेंट्रल हायस्कूलमध्ये शिक्षणासाठी जात असत. अंगावर पडणारा पाऊस, उन्हाचा तडाखा किंवा आर्थिक विवंचनायापैकी कोणतीही गोष्ट त्यांच्या शिक्षणाच्या वाटेत अडथळा ठरली नाही.

त्यांच्या डोळ्यांत स्वप्न होते, मनात जिद्द होती आणि हृदयात आई-वडिलांनी दिलेले संस्कार होते. त्या संस्कारांच्या पायावर त्यांनी आयुष्याची भक्कम इमारत उभारली. १९७० च्या दशकात प्रभाकरजी आणि त्यांचे बंधू श्री. कृष्णकांत परब यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने आणि शिस्तप्रिय जीवनाने संपूर्ण परिसरात वेगळा आदर्श निर्माण केला. गावातील पालक आपल्या मुलांना सांगत, 'बघ, प्रभाकर कसा अभ्यास करतो... तूही तसाच हो!' त्या एका वाक्याने कित्येक मुलांच्या आयुष्यात यशाची ठिणगी चेतवली.

**गुरूप्रती अखंड कृतज्ञता**

मोठेपणा हा पदामुळे येत नाही; तो आपल्या मुळांशी असलेल्या नात्यामुळे येतो. आयुष्यात यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचल्यानंतरही प्रभाकरजींनी आपल्या गुरुजनांना आणि संस्कारांना कधीच विसरले नाही.

शिक्षणसंस्थेचे दीर्घकाळ सेक्रेटरी म्हणून कार्य करणारे आदरणीय श्री. तुकाराम आत्माराम परब असोत किंवा आजही नव्वदी ओलांडून समाजाला प्रेरणा देणारे पाटकर सर असोत प्रभाकरजींनी प्रत्येक गुरुजनांना सदैव वंदनीय स्थान दिले. त्यांच्यासाठी शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे, तर चारित्र्य, प्रामाणिकपणा, संस्कार आणि समाजसेवेची जाणीव निर्माण करणारी जीवनशाळा होती.

**खाकी वर्दीतील सचोटीचा सुवर्णअध्याय**

महाराष्ट्र पोलीस खात्यात प्रथमश्रेणी अधिकारी म्हणून कार्यरत असताना प्रभाकरजींनी आपल्या कामाचा असा ठसा उमटवला की त्यांच्या नावाचा उल्लेख होताच प्रामाणिकपणा, शिस्त आणि निःस्वार्थ कर्तव्यनिष्ठा या शब्दांची आठवण येते.

खाकी वर्दी ही त्यांच्या अंगावरची केवळ वेशभूषा नव्हती; ती त्यांच्या मूल्यांची, त्यांच्या निष्ठेची आणि न्यायनिष्ठ जीवनदृष्टीची ओळख होती. कठोर निर्णय



घेतानाही त्यांनी मानवी मूल्यांचा कधीच त्याग केला नाही. गुन्हेगारांवर वचक निर्माण करताना सामान्य नागरिकांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण करणे, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलक्षण वैशिष्ट्य होते.

दीर्घ सेवाकाळात अधिकाराचा गैरवापर नाही, भ्रष्टाचाराची सावली नाही, स्वार्थाची किनार नाहीअसा निष्कलंक प्रवास फार थोड्या अधिकाऱ्यांच्या वाट्याला येतो. अण्णांनी तो आदर्श प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केला.

**दातृत्वाची अखंड वाहणारी गंगा**

खरे दान हे प्रसिद्धीसाठी नसते; ते माणुसकीच्या हाकेला दिलेले उत्तर असते. प्रभाकरजींचे आयुष्य म्हणजे अशाच दातृत्वाच्या अखंड वाहणाऱ्या गंगेचा प्रवाह आहे.

एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी मदतीचा हात, गरजू कुटुंबासाठी आर्थिक आधार, आजारी व्यक्तीसाठी धीराचे दोन शब्द, समाजोपयोगी उपक्रमासाठी सढळ हस्ते योगदान अशा असंख्य कार्यांनी त्यांनी हजारो लोकांच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटवला.

स्मरणिका प्रकाशन असो, शैक्षणिक कार्यक्रम असो, सुवर्णमहोत्सव, दीपोत्सव, महिलांचे हळदीकुंकू, सामाजिक मेळावे किंवा गावाच्या विकासासाठीची कोणतीही योजना जिथे समाजहिताचा विषय असे, तिथे अण्णांचे योगदान अग्रेसर असे. त्यांनी कधी मदतीचा गवगवा केला नाही; कारण त्यांच्यासाठी मदत ही कर्तव्य होती, उपकार नव्हते.

**भक्ती, संस्कार आणि अध्यात्माचा सुंदर सेतू**

भौतिक प्रगतीसोबत आध्यात्मिक उन्नतीही तितकीच आवश्यक आहे, हा विचार अण्णांनी आयुष्यभर जपला. परममित्र श्री. लक्ष्मण परब आणि श्री. दत्तराम शिवाजी परब यांच्या सहकार्याने त्यांनी घरोघरी पोहोचवलेला 'आध्यात्मिक आरती संग्रह' हा केवळ एक पुस्तक नव्हता; तो श्रद्धा, संस्कार आणि एकात्मतेचा दीप होता.

घराघरांत आरतीचा स्वर घुमावा, मुलांच्या मनात संस्कारांची बीजे रुजावीत आणि गाव भक्तिभावाच्या एका धाग्यात गुंफले जावे या उदात्त हेतूने त्यांनी केलेले हे कार्य कायम स्मरणात राहील.

**गावाच्या ऐक्याचा आधारवड**

चुनवरे ग्राम सेवा मंडळ, मुंबई ही संस्था उभी राहण्यासाठी अनेक ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आयुष्य झिजवले. त्या सर्वांच्या पाठीशी भक्कम आधारस्तंभ म्हणून प्रभाकरजी सदैव उभे राहिले. स्वतःच्या कमाईतून संस्थेला आर्थिक मदत, योग्य वेळी योग्य मार्गदर्शन, प्रत्येक उपक्रमात उत्साहाने सहभाग आणि गावाच्या एकतेसाठी सातत्याने केलेले प्रयत्नयामुळेच मंडळ अधिक सक्षम झाले.

त्यांच्यासाठी गाव म्हणजे फक्त जन्मभूमी नव्हती; ती मातृभूमी होती. म्हणूनच गावातील प्रत्येक यश त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत असे आणि प्रत्येक संकट त्यांच्या मनाला वेदना देत असे.

**माणुसकीचा सुगंध जपणारा ऋषितुल्य प्रवास**

प्रभाकरजींच्या व्यक्तिमत्त्वात अधिकाराची कणखरता आहे, पण अहंकाराचा लवलेश नाही. त्यांच्या वागण्यात साधेपणा आहे, पण विचारात विलक्षण उंची आहे. त्यांच्या चेहऱ्यावर शांततेचे तेज आहे, तर हृदयात माणुसकीचा अथांग सागर आहे. ते भेटतात तेव्हा मोठेपणाची जाणीव होत नाही; उलट आपलेपणाचा स्पर्श जाणवतो. त्यांच्याशी बोलताना अनुभवाचे वैभव दिसते, पण त्यात कधीही दर्प जाणवत नाही. त्यांच्या सहवासात येणारा प्रत्येकजण समृद्ध होऊन परततो.

त्यांच्या जीवनामागे ग्रामदैवत श्री देव जैन रामेश्वर आणि श्री माता तिठाई देवी यांची अखंड कृपाछाया आहे, अशी त्यांची अढळ श्रद्धा आहे. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक कार्यात नम्रता, सात्त्विकता आणि सेवाभाव दिसून येतो.

**अण्णा एक प्रेरणादायी जीवनग्रंथ**

काही व्यक्ती पुस्तके लिहितात; काही व्यक्ती स्वतःचे जीवनच पुस्तक बनवतात. प्रभाकर राजाराम परब हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांचे आयुष्य म्हणजे संघर्षाचे विद्यापीठ, प्रामाणिकपणाचे मंदिर, सेवाभावाची गंगा आणि माणुसकीचा अखंड झरा आहे.

आज त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याकडे पाहताना जाणवते की, त्यांनी केवळ यश मिळवले नाही; तर त्यांनी माणसे जोडली, विश्वास कमावला, संस्कारांची परंपरा निर्माण केली आणि समाजाला जगण्याची दिशा दिली.

त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक दिवस हा समाजासाठी अर्पण झालेला आहे. प्रत्येक श्वासात सेवा, प्रत्येक कृतीत प्रामाणिकपणा, प्रत्येक निर्णयात सचोटी आणि प्रत्येक नात्यात प्रेम यांचा सुगंध दरवळतो. अण्णांसारखी माणसे जन्माला येतात म्हणून समाज समृद्ध होतो; त्यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे असतात म्हणून संस्कृती जिवंत राहते; आणि त्यांच्यासारखे दीपस्तंभ असतात म्हणून अनेकांच्या आयुष्याला दिशा मिळते.

आपल्या सर्वांच्या लाडक्या अण्णांनाकर्तृत्वाचा सूर्य, सचोटीचा दीपस्तंभ, दातृत्वाचा अथांग सागर आणि माणुसकीचा जिवंत वारसाकोटी कोटी प्रणाम! ईश्वरचरणी एकच प्रार्थना, त्यांना निरामय आरोग्य, उदंड आयुष्य आणि अखंड आनंद लाभो. त्यांनी प्रज्वलित केलेला सेवाभावाचा हा दिवा पुढील अनेक पिढ्यांच्या जीवनात प्रेरणेचा प्रकाश पसरवत राहो, हीच मनःपूर्वक सदिच्छा. ●

# आंबेत पूल : कोकणाच्या विकासाचा साक्षीदार!



अविनाश पोस्टूरे

रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा आंबेत पूल हा केवळ काँक्रिट, लोखंड आणि डांबरी रस्त्याची रचना नाही; तो कोकणाच्या विकासाचा साक्षीदार आहे. हजारो नागरिकांच्या दैनंदिन जगण्याचा, व्यापार-व्यवसायाचा, शिक्षणाचा, आरोग्यसेवेचा आणि रोजगाराचा तो महत्त्वाचा दुवा आहे. पाच दशकांपूर्वी उभारलेला हा पूल आज मात्र स्वतःच्या भवितव्याचा प्रश्न घेऊन उभा आहे. पुलाच्या सुरक्षिततेबाबत निर्माण झालेले प्रश्न आणि त्याच्या वापरावर येणाऱ्या मर्यादा पाहता आता केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर समाधान मानायचे की पुढील पिढ्यांसाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करायची, याचा निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

१९७० च्या दशकात आंबेत पूल उभारला गेला. त्यापूर्वी सावित्री खाडी ओलांडण्यासाठी नागरिकांना होड्यांवर अवलंबून राहावे लागत होते. पावसाळ्यात तर हा प्रवास अधिकच धोकादायक आणि त्रासदायक ठरत असे. अशा परिस्थितीत आंबेत पूल उभा राहणे म्हणजे कोकणाच्या दळणवळणाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा होता. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते या पुलाची पायाभरणी झाली, तर तत्कालीन मंत्री बॅ. ए. आर. अंतुले यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्या काळातील नेतृत्वाने भविष्यातील गरज ओळखून घेतलेला हा निर्णय आजही हजारो नागरिकांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पुलामुळे रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमधील संपर्क अधिक सुलभ झाला. आंबेत, म्हाप्रळ, मंडणगड, दापोली आणि परिसरातील गावांना बाजारपेठांशी जोडले गेले. शेतमालाची वाहतूक, मासेमारी व्यवसाय, छोटे-मोठे उद्योग, पर्यटन, शिक्षण आणि आरोग्यसेवा यांना या मार्गामुळे मोठी चालना मिळाली. अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचे चक्र या पुलाभोवती फिरू लागले. त्यामुळे आंबेत पूल बंद होणे म्हणजे केवळ वाहनांची वाहतूक दुसऱ्या मार्गावर वळवणे नव्हे; त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या जीवनावर होतो.

आज जवळपास पाच दशकांचा कालावधी उलटला आहे. या काळात वाहनांची संख्या प्रचंड वाढली, वाहतुकीचे स्वरूप बदलले, परिसराचा विकास झाला आणि नागरिकांच्या गरजाही वाढल्या. मात्र, त्याच तुलनेत पायाभूत सुविधा कितपत सक्षम झाल्या, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. एखाद्या पुलाची सुरक्षितता ही केवळ वाहतुकीची बाब नसते. त्यावरून दररोज प्रवास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवाशी ती जोडलेली असते. आंबेत पुलाबाबत अलीकडील घडामोडींमुळे नागरिकांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली आहे. पूल सुरक्षित आहे का? त्याची क्षमता किती आहे? नियमितपणे संरचनात्मक तपासणी होते का? भविष्यातील वाहतुकीचा भार तो पेलू शकतो का? दुरुस्तीची गरज असल्यास ती किती काळ टिकणारी असेल? असे अनेक प्रश्न नागरिक विचारत आहेत. या प्रश्नांची स्पष्ट आणि तांत्रिक उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर ठेवणे गरजेचे आहे.

पुलाच्या सुरक्षिततेबाबत शंका निर्माण झाल्यानंतर वाहतूक बंद किंवा मर्यादित करण्याची वेळ आली, तर त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्यांना बसतो. व्यापाऱ्यांसाठी वाहतूक खर्च वाढतो. शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठ गाठण्यासाठी अधिक वेळ लागतो. विद्यार्थ्यांचा प्रवास लांबतो. रुग्णांना रुग्णालयात पोहोचण्यासाठी अधिक वेळ लागतो. पर्यटन व्यवसायावर परिणाम होतो. स्थानिक दुकानदार, हॉटेल व्यावसायिक, वाहनचालक आणि छोट्या व्यवसायांवर त्याचा परिणाम होतो. कोकणातील ग्रामीण अर्थव्यवस्था आधीच अनेक अडचणींचा सामना करत आहे. रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे तरुण शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. शेती आणि पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोरही अनेक आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत वाहतुकीचा महत्त्वाचा दुवा कमकुवत होणे म्हणजे स्थानिक अर्थव्यवस्थेवर आणखी एक आघात ठरू शकतो. स्थानिक नागरिकांचे म्हणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आंबेत पूल दीर्घकाळ बंद राहिला तर या संपूर्ण परिसराच्या विकासाला मोठा फटका बसू शकतो. मागील काही वर्षांतील अनुभवातून नागरिकांनी त्याची झळ सोसली आहे. काही ठिकाणी व्यवसाय मंदावले, प्रवासाचा वेळ वाढला आणि दैनंदिन कामांसाठी नागरिकांना अतिरिक्त खर्च करावा लागला. त्यामुळे त्यांची मागणी केवळ भावनिक नसून प्रत्यक्ष अनुभवातून आलेली आहे.

नागरिकांचा सवालही तितकाच रास्त आहे की, सरकार आणि लोकप्रतिनिधी या भागात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण

करू शकत नसतील, तर कष्टाने उभे केलेले छोटे-मोठे व्यवसाय आणि स्थानिक रोजगाराची साधने तरी संकटात येऊ नयेत. कोकणातील लोकांनी आपल्या ताकदीवर पर्यटन, शेतीपूरक व्यवसाय, मासेमारी, छोटे उद्योग आणि सेवा व्यवसाय उभे केले आहेत. वाहतुकीची सुविधा खंडित झाली तर या सर्वांवर परिणाम होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच आता केवळ 'पूल दुरुस्त करणार' एवढ्यावर विषय थांबता कामा नये. आंबेत पुलाचा सखोल संरचनात्मक अभ्यास झाला पाहिजे. पुलाची सध्याची क्षमता, मजबुती, आयुर्मान आणि भविष्यातील वाहतुकीचा भार याबाबत तज्ज्ञांकडून स्पष्ट अहवाल घेतला पाहिजे. पुलाची दुरुस्ती आवश्यक असेल तर ती तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने झाली पाहिजे. दुरुस्तीच्या काळात नागरिकांसाठी सुरक्षित आणि व्यवहार्य पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. परंतु यापुढे आणखी एक मोठा निर्णय घेण्याची गरज आहे. वाढती वाहतूक आणि पुढील काही दशकांतील विकास लक्षात घेता आंबेत येथे समांतर नवीन पूल उभारण्याचा दीर्घकालीन विचार आतापासूनच सुरू झाला पाहिजे. जुना पूल कितीही मजबूत केला तरी वाढत्या वाहतुकीचा भार, बदलती तांत्रिक गरज आणि भविष्यातील विकास यांचा विचार करणे आवश्यक आहे.

आज एखाद्या पुलाची दुरुस्ती करण्यासाठी निधी मागण्यापेक्षा पुढील ५० वर्षांचा विचार करून नियोजन करणे ही खरी दूरदृष्टी ठरेल. पाच दशकांपूर्वीच्या नेतृत्वाने ज्या पद्धतीने त्या काळातील गरज ओळखून आंबेत पूल उभारला, त्याचप्रमाणे आजच्या नेतृत्वाने पुढील पिढ्यांची गरज ओळखणे आवश्यक आहे. या प्रश्नात राजकारणापेक्षा नागरिकांचा जीव आणि विकास महत्त्वाचा आहे. कोणत्या पक्षाने प्रश्न मांडला, कोणत्या नेत्याने श्रेय घेतले, यापेक्षा प्रत्यक्षात काम कधी सुरू होणार, पूल सुरक्षित कधी होणार आणि भविष्यासाठी पर्याय कधी उभा राहणार, हे जनतेसाठी महत्त्वाचे आहे.

स्थानिक आमदार आणि खासदारांकडूनही आता जनतेला केवळ आश्वासनांची अपेक्षा नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी, तांत्रिक मंजुरी आणि आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. प्रशासनानेही फक्त कागदोपत्री अहवाल तयार न करता त्याची अंमलबजावणी वेळेत होईल याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कारण आंबेत पूल हा केवळ रायगड आणि रत्नागिरीला जोडणारा मार्ग नाही. तो दोन जिल्ह्यांमधील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधांचा दुवा आहे. एका बाजूला रायगडचा भाग आणि दुसऱ्या बाजूला रत्नागिरीचा परिसर असला, तरी या पुलामुळे दोन्ही भागातील नागरिकांचे जीवन परस्परांशी जोडले गेले आहे. एखादा विद्यार्थी रोज या पुलावरून महाविद्यालयात जातो. एखादा शेतकरी आपला माल बाजारात घेऊन जातो. एखादा रुग्ण उपचारासाठी रुग्णालय गाठतो. एखादा व्यापारी मालाची ने-आण करतो. एखादा पर्यटक कोकणात येतो. एखादा कामगार आपल्या रोजगारासाठी प्रवास करतो. या प्रत्येकाच्या आयुष्यात आंबेत पुलाचे स्थान आहे. म्हणूनच या पुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय नाही; तो संपूर्ण परिसराच्या भविष्याचा प्रश्न आहे.

आज जर पुलाच्या सुरक्षिततेकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर उद्या मोठी किंमत मोजावी लागू शकते. आणि जर आज दूरदृष्टीने निर्णय घेतला, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी सुरक्षित आणि सक्षम दळणवळणाची व्यवस्था निर्माण होऊ शकते. इतिहासाने आपल्याला आंबेत पूल दिला. त्या पुलाने कोकणाच्या विकासाला दिशा दिली. आता पुढचा इतिहास लिहिण्याची जबाबदारी आजच्या नेतृत्वाची आहे. आंबेत पूल वाचवायचा आहे, सुरक्षित करायचा आहे आणि भविष्यासाठी सक्षम करायचा आहे. कारण हा पूल केवळ दोन जिल्ह्यांना जोडत नाही; तो हजारो कुटुंबांच्या आशा, स्वप्ने आणि उद्याचा मार्ग जोडतो. ●

# विलक्षण वाचनीय, प्रेरक
# १५५ सदाशिव पेठ, सातारा

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

ज्येष्ठ पत्रकार भानू काळे आणि डॉ. अनिल जोशी यांनी, १५५ सदाशिव पेठ, सातारा, लोकविलक्षण दाभोलकर कुटुंबाची कथा, या पुस्तकाचे संपादन केले आहे. सुरुवातीला त्यांनी आपले मनोगत मांडले आहे. पुस्तकाच्या शीर्षकाविषयी भानू काळे यांनी स्पष्ट केले आहे की, दाभोलकर परिवाराचे साताऱ्यातील ते भाड्याचे निवासस्थान होते. ऐन बाजारपेठेतील, अगदी साधेसुधे. अच्युतराव आणि त्यांच्या पत्नी माई यांचे बहुतेक आयुष्य याच घरात गेले. त्यांची पहिली तीन मुले माईंच्या माहेरी, कोल्हापूरला जन्मली, नंतरची सर्व सात याच घरात जन्मली. दहा सख्खी आणि दोन चुलत भावंडे याच घरात वाढली, संस्कारित झाली. दाभोलकर गाथेच्या नायिका माई आहेत. माईंनी आपल्या मुलांचे वर्णन करताना 'एक दुसऱ्यासारखे नाही आणि एकही माणसासारखे नाही' असा शब्दप्रयोग केला होता. विनोदाचा भाग सोडला, तरी या सर्व भावंडांच्या कारकिर्दीचे निरीक्षण केले तर माईंचे म्हणणे किती यथार्थ होते, हे समजू शकते. ''विसावे शतक एका कुटुंबाच्या लोलकातून!'' या पहिल्या लेखात डॉ.अनिल जोशी यांनी, सर्व दाभोलकर भावंडांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे. देवदत्त, दिनानाथ आणि लीलावती यांनी आपल्या लहान भावंडांचे लालन,पालन,पोषण केले. आजच्या काळात सर्व प्रचलित व्यवस्था प्रश्नचिन्हांकित होत आहेत.त्यांची जागा नवीन व्यवस्थांनी अजून घेतलेली नाही. अशा संधिकालात कुटुंबसंस्थेचे महत्त्व सांगणारी आणि त्याची एक सकारात्मक बाजू सांगणारी एका कुटुंबाची कहाणी, सर्वांनी अभ्यासावी अशीच आहे. कुंदा दाभोलकर यांनी, माई : माझी आई, या लेखात आपल्या आईची स्वभाववैशिष्ट्ये मांडली आहेत. मात्र माईंच्या चरित्रलेखनाचे त्यांचे काम पूर्ण झाले नाही. माईंची कन्या, अमरजा यांनी,१९६३ साली, हिमालयात भटकंती करताना, आईला पत्र लिहिले. त्यानंतर पन्नास वर्षांनी माईंच्या विविध आठवणी त्यांनी शब्दबद्ध केल्या. त्यातून माईंनी आपल्या मुलांना कसे वाढविले, कोणते संस्कार दिले, हे स्पष्ट होते. देवदत्त आणि त्यांच्याविषयीचा डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर यांचा लेख, हे दोन्ही लेख देवदत्त यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. अंबू (कुंदा) दाभोलकर अविवाहित राहिल्या. त्यांनी शिक्षणक्षेत्रात बहुमोल कार्य केले. त्यांच्याविषयी डॉ. दत्तप्रसाद यांचा सविस्तर लेख त्यांच्या जीवनाची समग्र ओळख करून देतो. श्रीपाद (मुकुंद)यांच्या जीवनकार्याविषयीविषयी डॉ. अतीश दाभोलकर, यांनी ''श्रीपाद दाभोलकर : 'प्रयोग परिवार'चे प्रणेते'' मध्ये सविस्तरपणे लिहिले आहे. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या मुलाने, डॉ.अतीश यांनी हा सविस्तर लेख लिहिला होता. आपल्या शेती क्षेत्रातील प्रयोगांतून सर्वसामान्यांसाठी जणु त्यांनी 'बिनभिंतींचे विद्यापीठ' निर्माण केले होते. चारुदत्त दाभोलकर : दुर्लक्षित पण मौलिक विचारवंत, हा दत्तप्रसाद यांचा लेख, त्यांच्या जीवनकार्याची माहिती करून देतो.शेतकरी संघटनेची वैचारिक मांडणी करण्याचे काम चारुदत्त यांनी आधीच केले होते, असे शरद जोशी म्हणत. दिनानाथ यांच्याविषयी दत्तप्रसाद आणि त्यांची बहीण लीला यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतला आहे. 'वेणू वसंत पळशीकर - आमची आरभाट बहीण' हा दत्तप्रसाद यांचा लेख, त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देतो. 'माझे बाबा: एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व' हा अनंत दाभोलकर यांचा लेख, डॉ. नरसिंह दाभोलकर यांची उत्तम प्रकारे ओळख करून देतो. डॉ.नरसिंह सायन मुंबईच्या लो. टिळक वैद्यकीय महाविद्यालयात फिजिओलॉजीचे प्राध्यापक आणि काही काळ मुंबई विद्यापीठाच्या वैद्यक विभागाचे अधिष्ठाता होते. डॉ. शाम भोसले यांनी आपली आई सुधा आणि मावशी लीलावती यांचा, आपल्या लेखांतून उत्तम परिचय करून दिला आहे. डॉ.दत्तप्रसाद यांनी आपल्या सविस्तर लेखातून, स्वतःच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. अमरजा या आपल्या बहिणीविषयी दत्तप्रसाद आणि अमरजा यांचे पुत्र प्रवीण यांनी आपल्या आठवणी सविस्तरपणे मांडल्या आहेत. त्या विलक्षण वाचनीय झाल्या आहेत. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा एक, सविस्तर पूर्वप्रकाशित लेख या पुस्तकात समाविष्ट आहे. त्यामधून त्यांच्या जीवनकार्याचा उत्तम परिचय होतो. मुक्ताने आपल्या बाबांबद्दल आपल्या भावना वक्त केल्या आहेत. नरेंद्र यांच्याविषयी त्यांची भाची, निलु आणि भानू काळे यांचे पूर्वप्रकाशित लेखही समाविष्ट आहेत. त्यामधून नरेंद्र यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे दर्शन होते. त्यांच्या निर्घृण खुनानंतरच्या, त्यांच्या नातेवाईकांच्या, देशविदेशातील असंख्य चाहत्यांच्या, तेव्हाच्या दुःखद भावनिक स्थितीची, विषण्ण करणारी जाणीव, पुन्हा एकदा सुजाण वाचकाला होते.




या पुस्तकामध्ये दाभोळकरांशिवाय विनय हर्डीकर, नितीन बळवल्ली, निशिकांत मिरजकर, भानू काळे आणि दत्तप्रसाद यांची मानसिक कन्या सुजाता यांचेही, पूर्वप्रकाशित, अप्रतिम, हृद्य लेख समाविष्ट आहेत. 'समारोप' मध्ये भानू काळे यांनी या ग्रंथ निर्मितीतील विविध अनुभव आणि या ग्रंथाचे महत्त्व उत्तम प्रकारे मांडले आहे. दाभोलकरांच्या पुढील पिढीचे प्रतिनिधी, डॉ.प्रसन्न आणि डॉ.चित्रा यांनीही विचार मांडले आहेत. दाभोलकर कुटुंबात संपूर्ण लोकशाही वातावरण होते. कपडे, दागिने महत्त्वाचे नाहीत; तर शिक्षण महत्त्वाचे आहे, हे माईंनी सर्व मुलांवर बिंबविले होते. आपल्या पसंतीने कोणाशीही लग्न करा, पण अनावश्यक खर्च टाळून, नोंदणी पद्धतीने लग्न करा, असा त्यांचा आग्रह होता. स्त्रियांची मुलांना वाढविण्याची जबाबदारी, आपल्या उत्तम उदाहरणाद्वारे त्यांनी आपल्या कुटुंबीयांसमोर ठेवली होती.

या पुस्तकाचे महत्त्व विनय हर्डीकर यांनी पुढील शब्दात मांडले आहे, 'तत्त्वज्ञान, विज्ञान, शिक्षण, अर्थशास्त्र, शेती, वैद्यक, मूलभूत संशोधन, संस्कृती, समाजप्रबोधन आणि परिवर्तनाच्या चळवळी इतक्या विविध क्षेत्रांत ठसा उमटवणाऱ्या दाभोलकर कुटुंबाचे साम्य एकोणिसाव्या शतकामधल्या रवींद्रनाथ टागोरांच्या कुटुंबाशीच आहे. भानू काळे आणि अनिल जोशी यांनी दाभोलकर परिवाराचे विविधरंगी दर्शन घडवणाऱ्या या पुस्तकाचे संपादन करून मराठी साहित्याची श्रीमंती वाढवली आहे.' दाभोलकर परिवारातील काही महत्त्वाच्या घटना आणि व्यक्ती विविध छायाचित्रांतून दिसतात. पुस्तक नितांत वाचनीय आणि संग्राह्य आहे. ●

**पुस्तकाचे नाव : १५५ सदाशिव पेठ, सातारा.**
**संपादन : भानू काळे व अनिल जोशी**
**प्रकाशक : साधना प्रकाशन, पुणे-३० ७०५८२८६७५३**
**पहिली आवृत्ती : पृष्ठे ३०४**
**मूल्य : रू. ४००/-**


# वनडे फॉरमॅट बनला पाच हजारी मनसबदार

## भारताने सर्वाधिक सामने खेळले, ऑस्ट्रेलिया विजयात आघाडीवर; सचिन धावांचा बादशाह

| स्कॉटलंड | वृत्तसंस्था |

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच कोणत्याही फॉरमॅटमध्ये ५ हजार सामने पूर्ण झाले आहेत. ही कामगिरी वनडेने केली आहे. ज्या स्कॉटलंडमध्ये नुकतेच कॉमनवेल्थ गेम्स झाले, तिथेच ५००० वा वनडे सामनाही खेळला गेला. शुक्रवारी स्कॉटलंड आणि कॅनडा यांच्यात झालेल्या या सामन्यात स्कॉटलंडने ९ धावांनी विजय मिळवला.

वनडे फॉरमॅट १९७१ मध्ये अस्तित्वात आला. टेस्ट क्रिकेट सुरू झाल्यानंतर ९४ वर्षांनी. टेस्ट अजून ३००० सामन्यांच्या आकड्यापर्यंतही पोहोचले नाहीये आणि वनडेने ५ हजार सामन्यांचा टप्पा पूर्ण केला आहे. १९७१ पासून आतापर्यंत ५५ वर्षांत २९ देशांनी वनडे सामने खेळले. याच फॉरमॅटमधून वर्ल्ड कपची संकल्पना आली आणि याच फॉरमॅटमध्ये भारताने पहिल्यांदा विजेतेपदही पटकावले.



**१८७७ मध्ये पहिला आंतरराष्ट्रीय सामना**

क्रिकेटचा पहिला फॉरमॅट टेस्ट आहे. १८७७ मध्ये पहिला कसोटी सामना खेळला गेला होता. आतापर्यंत २६२९ कसोटी सामने खेळले गेले आहेत. तर टी-२० ची सुरुवात २००४ मध्ये झाली होती.

**भारताने ५७५ सामने जिंकले**

भारताने १०८१ एकदिवसीय सामन्यांपैकी ५७५ सामने जिंकले. सामन्यांच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानावर आहे, तर विजयाच्या बाबतीत पहिल्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलियाने १०२५ सामन्यांपैकी ६१९ सामने जिंकले. पाकिस्तान तिसऱ्या स्थानावर आहे. त्याने १००२ सामने खेळले आणि ५२९ मध्ये विजय मिळवला. ऑस्ट्रेलिया आणि भारताने घरच्या मैदानावर सर्वाधिक सामने जिंकले आहेत. ऑस्ट्रेलियाने २९८, तर भारताने २३५ सामने जिंकले. मात्र, परदेशातील विजयांच्या बाबतीत भारत पाकिस्तानच्या मागे आहे. पाकिस्तानने परदेशात ३९५, तर भारताने ३४० सामने जिंकले आहेत.वनडे विश्वचषकाच्या १३ आवृत्त्या खेळल्या गेल्या आहेत. ऑस्ट्रेलियाने सर्वाधिक ६ ट्रॉफी जिंकल्या आहेत. भारत आणि वेस्ट इंडिजच्या नावावर प्रत्येकी २-२ विजेतेपदे आहेत.

सर्वाधिक एकदिवसीय सामन्यांमध्ये कर्णधारपदाचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या रिकी पॉन्टिंगच्या नावावर आहे. त्यांनी कर्णधार म्हणून २३० एकदिवसीय सामने खेळले आणि सर्वाधिक १६५ सामने जिंकले.

एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च स्कोअर रोहितच्या नावावर आहे. त्याने २०१४ मध्ये श्रीलंकेविरुद्ध एका डावात २६४ धावा केल्या होत्या. तो ३ द्विशतके करणारा एकमेव खेळाडू आहे. सर्वाधिक ३६९ षटकारांचा विक्रमही त्याच्याच नावावर आहे. सचिनने सर्वाधिक प्लेअर ऑफ द मॅच आणि प्लेअर ऑफ द सिरीज किताब जिंकले. धोनीने सर्वाधिक १२३ स्टंपिंग केल्या.

### सचिनने ४६३ सामने खेळले

सचिनने वनडेमध्ये सर्वाधिक ४६३ वनडे सामने खेळले आहेत. या यादीत श्रीलंकेचे चार, पाकिस्तानचे ३, भारताचे २ आणि ऑस्ट्रेलियाचा एक खेळाडू समाविष्ट आहे. वनडेमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या टॉप-१० खेळाडूंमध्ये चार भारतीय खेळाडूंचा समावेश आहे. सचिन पहिल्या, कोहली दुसऱ्या, रोहित शर्मा तिसऱ्या आणि सौरव गांगुली चौथ्या स्थानावर आहेत.कोहलीने वनडेमध्ये सर्वाधिक ५४ शतकं केली आहेत. सचिन ४९ शतकांसह दुसऱ्या, तर रोहित ३४ शतकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. रिकी पॉन्टिंग ३० शतकांसह चौथ्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेच्या मुथय्या मुरलीधरनने वनडेमध्ये सर्वाधिक विकेट घेतल्या आहेत. त्याने ३५० सामन्यांमध्ये ५३४ विकेट घेतल्या आहेत. सर्वाधिक ५ विकेट हॉलचा विक्रम पाकिस्तानच्या वकार युनूसच्या नावावर आहे. त्याने १३ वेळा एका डावात ५ किंवा त्याहून अधिक विकेट घेतल्या आहेत.

# आर प्रज्ञानानंदा सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ चॅम्पियन

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताचा ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने अमेरिकेतील सेंट लुईस येथे खेळल्या गेलेल्या ग्रँड चेस टूरच्या सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. २० वर्षीय प्रज्ञानानंदाने पेनल्टीमेट फेरीत उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्धचा सामना ड्रॉ करून एक फेरी बाकी असतानाच विजेतेपद आपल्या नावावर केले. त्याने ३५ पैकी २३ गुण मिळवले आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या खेळाडूंपेक्षा १.५ गुणांनी पुढे राहून आपल्या कारकिर्दीतील पहिले ग्रँड चेस टूर रॅपिड अँड ब्लिट्झ विजेतेपद जिंकले.

प्रज्ञानानंदाने या स्पर्धेत सुरुवातीपासूनच सातत्याने दमदार कामगिरी केली. रॅपिड आणि ब्लिट्झ दोन्ही फॉरमॅटमध्ये त्याने आघाडी कायम राखली. अंतिम फेरीपूर्वी त्याची आघाडी इतकी मजबूत झाली होती की, शेवटच्या सामन्याच्या निकालाचा त्याच्या विजेतेपदावर कोणताही परिणाम होऊ शकला नाही.



चेसबेस इंडियाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर प्रज्ञानानंदाच्या या यशाची माहिती शेअर केली. संस्थेनुसार, हे त्यांच्या कारकिर्दीतील पहिले ग्रँड चेस टूर रॅपिड अँड ब्लिट्झ विजेतेपद आहे. एक फेरी बाकी असतानाच त्यांनी ही स्पर्धा जिंकली.

प्रज्ञानानंदा सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. यापूर्वी जून २०२६ मध्ये त्यांनी नॉर्वे चेसचे विजेतेपदही जिंकले होते. ओस्लोमध्ये खेळल्या गेलेल्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत त्यांनी जर्मनीच्या विन्सेंट कीमरला हरवून ट्रॉफी आपल्या नावावर केली होती. त्यांनी अंतिम फेरीत सलग चार क्लासिकल सामने जिंकून हे यश मिळवले होते. नॉर्वे चेस जिंकल्यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी चेन्नई येथील मुख्य सचिवालयात प्रज्ञानानंदा यांचा सत्कार केला होता. स्पोर्ट्स डेव्हलपमेंट अथॉरिटी ऑफ तामिळनाडूच्या वतीने त्यांना ५० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यासोबत बुद्धिबळाच्या काही चालीही खेळल्या होत्या.

आर प्रज्ञानानंदा यांचा जन्म १० ऑगस्ट २००५ रोजी झाला होता. ते २०१८ मध्ये १२ वर्षे, १० महिने आणि १३ दिवसांच्या वयात ग्रँडमास्टर बनले होते.

# पुलवामाचा ओवैस बल्गेरियात बनला एमएमए चॅम्पियन



| श्रीनगर | वृत्तसंस्था |

काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील रहिवासी असलेले मिक्स्ड मार्शल आर्ट्स (एमएमए) फायटर ओवैस याकूब यांनी बल्गेरियामध्ये स्पर्धेत शानदार विजय मिळवला.

परदेशी भूमीवर विजेतेपद पटकावल्यानंतरच्या त्या भावनिक क्षणाची आठवण करून देताना ओवैस सांगतात, जेव्हा मी बल्गेरियामध्ये लढत होतो, तेव्हा कुटुंब आणि मित्र सोबत नव्हते. तिथे उपस्थित असलेले प्रेक्षक त्यांच्या आवडत्या स्थानिक खेळाडूंचा उत्साह वाढवत होते. जेव्हा मी विजेतेपद जिंकले, तेव्हा मी माझी काश्मिरी काराकुली टोपी आणि कुर्ता घातला, जेणेकरून मला काश्मीर माझ्यासोबत आणि माझ्या जवळ असल्याचा अनुभव घेता येईल. ते म्हणाले, मला आशा होती की काश्मीरमधील लोक माझ्या विजयाचा जल्लोष करतील, पण दिल्लीत मिळालेल्या प्रतिसादाने मला आश्चर्यचकित केले. तिथे विमानतळावर लोक माझ्यासोबत फोटो काढण्यासाठी येत होते. याची मी कधी कल्पनाही केली नव्हती. मूरान या छोट्या शहरातील रहिवासी असलेल्या २८ वर्षीय ओवैस यांची पार्श्वभूमी सामान्य आहे. ते पत्नी, दोन मुले, आई-वडील आणि भावंडांसोबत राहतात. कुटुंबात सर्वात मोठे असल्यामुळे ओवैसने लहान वयातच कमावणे सुरू केले होते. ओवैसने सांगितले, माझे वडील छोटे व्यावसायिक होते. जेव्हा त्यांचे आरोग्य बिघडले, तेव्हा कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची जबाबदारी माझ्या खांद्यावर आली.

# वीज कोसळून खेळाडूचा मृत्यू

| थायलंड | वृत्तसंस्था |

वीज पडून एका २४ वर्षीय खेळाडूचा मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, तो खरोखरच हृदयद्रावक आहे. ही घटना दक्षिण थायलंडमध्ये घडली, जिथे एका स्थानिक सामन्यादरम्यान फुटबॉलपटू सोफवान अवे याचा मृत्यू झाला.



या घटनेत जवळपास डझनभर इतर खेळाडूही जखमी झाले. व्हिडिओमध्ये मुसळधार पावसात सुरू असलेला फुटबॉल सामना दिसत आहे. अचानक, सोफवानवर वीज कोसळली आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. तो खेळाडू जमिनीवर कोसळला आणि त्याला हालचाल करता येत नव्हती. संघातील बाकीचे खेळाडू त्वरीत त्याच्या मदतीला धावले. ही स्थानिक स्पर्धा एफए कप असल्याचे सांगण्यात आले. या स्पर्धेत हौशी आणि थाई-मलेशियन संघही सहभागी होतात. सोफवान या स्पर्धेत सॅमकोल्ट्स संघाकडून खेळत होता.

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, मुसळधार पावसामुळे सामना थांबवायला हवा होता का, ज्यामुळे ही घटना टाळता आली असती, असा प्रश्न लोकांनी उपस्थित केला आहे. त्यांनी आयोजकांच्या जबाबदारीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## वर्ल्डकपमधून वेस्ट इंडिजचा पत्ता कट?

**नवी दिल्ली :** आयसीसी मेन्स वर्ल्डकप स्पर्धेसाठी पहिले ८ संघ क्वालिफाय झाले आहेत. वेस्ट इंडिज संघासाठी वर्ल्डकप खेळणे म्हणजे आता त्यांत अवघड दिसून येत आहे. एक काळ असा होता जेव्हा क्रिकेट जगतावर वेस्ट इंडिजचे एकछत्री साम्राज्य होते. परंतु, आता त्याच वेस्ट इंडिज संघावर सलग दुसऱ्यांदा वनडे वर्ल्ड कपला मुकण्याची वेळ आली आहे. २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपसाठी पात्र ठरण्यात अपयशी ठरल्यानंतर, आता दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या २०२७ च्या वनडे वर्ल्ड कपसाठी थेट प्रवेश मिळवणे वेस्ट इंडिज संघासाठी अत्यंत कठीण झाले आहे.

## विश्वकरंडकानंतर मेस्सीचा डबल धमाका

**मियामी:** जगज्जेतेपदाच्या लढतीनंतर अर्जेंटिना महान खेळाडू लिओनेल मेस्सी याने इंटर मियामी क्लबसाठी दोन गोल झळकावले. इंटर मियामी क्लबने लीग्स करंडकातील लढतीत सॅन लुईस संघावर ४-२ असा विजय साकारला. दरम्यान, विजांचा कडकडाट होत असल्याने दुसऱ्या सत्रामध्ये हा सामना सुमारे ३० मिनिटे थांबवावा लागला. लिओनेल मेस्सीने ११व्या आणि ४४व्या मिनिटाला गोल केले. लीग्स करंडकातील १२ सामन्यांत त्याचे १४ गोल झाले असून, स्पर्धेच्या इतिहासात तो लॉस एंजेलिस एफसीच्या डेनिस बुआंगापेक्षा एका गोलने पुढे गेला आहे.

## गॉल टेस्टसाठी भारताचा स्पिनवर अधिक भर

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

श्रीलंकेच्या फिरकी ट्रॅकवर आघाडी घेण्यासाठी भारतीय संघाने आपली तयारी वेगवान केली आहे. पहिल्या कसोटीपूर्वी, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी कोलंबोमध्ये गॉलसारखी खेळपट्टी तयार करून फलंदाजांना फिरकीविरुद्ध सराव करून घेतला. यासाठी भेगा आणि सैल माती असलेली तुटलेली खेळपट्टी तयार करण्यात आली. त्यावर स्थानिक शालेय फिरकीपटूंनी गोलंदाजी केली.

आधी नेट बॉलर्सनी गोलंदाजी केली. नंतर बाउंड्रीजवळ असलेल्या स्थानिक शालेय मुलांना आणि युवा फिरकी गोलंदाजांनाही गोलंदाजीसाठी बोलावण्यात आले. या खेळपट्टीवर चेंडू कधी वेगाने वळत होता तर कधी खाली राहत होता. अशा आव्हानात्मक परिस्थितीत भारतीय टॉप ऑर्डर फलंदाजांनी बराच वेळ सराव केला. बुधवारी सरावादरम्यान कर्णधार शुभमन गिलच्या अंगठ्याला चेंडू लागला होता. मात्र, गुरुवारी तो पूर्णपणे फिट दिसला आणि नेट्समध्ये फलंदाजी केली. केएल राहुल आणि देवदत्त पडिक्कलनेही रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादवच्या फिरकी गोलंदाजीविरुद्ध बराच सराव केला.कोलंबोच्या मैदानावर भारतीय संघाच्या सरावादरम्यान कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती.

**गंभीरने बनवली खराब खेळपट्टी**

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजन | वर्षा मॅरेथॉन, फुटबॉल स्पर्धेचा थरार

# उरणमध्ये क्रीडा महोत्सवाची पर्वणी

| उरण | प्रतिनिधी |

कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात गेली पंचवीस वर्षे सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे यंदा भारतीय स्वातंत्र्याच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त २६ वे राज्यस्तरीय वर्षा मॅरेथॉन व फुटबॉल स्पर्धा २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. १४ ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या या क्रीडा महोत्सवामुळे उरण तालुक्यात पुन्हा एकदा क्रीडामय वातावरण निर्माण होणार आहे.



असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्यभरातील शालेय तसेच खुल्या गटातील खेळाडू सहभागी होणार आहेत. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंते, उद्योजक आणि क्रीडाप्रेमी नागरिक यांच्या उपस्थितीत हा क्रीडा सोहळा पार पडणार आहे.

स्पर्धेअंतर्गत १४ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत वीर सावरकर मैदान (लाल मैदान), उरण येथे फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता बोकडविरा चारफाटा, ग्रेड मैदान येथून द्रोणागिरी महाराष्ट्र अभिमान दौड वर्षा मॅरेथॉन स्पर्धेला प्रारंभ होणार आहे.

स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा १६ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वाजता मॅरेथॉन स्थळी आयोजित करण्यात आला असून, विजेत्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनची स्थापना उरण तालुक्यातील गुणवंत खेळाडू, कलाकार व युवकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि राष्ट्रीय स्तरावर उरण तालुक्याचे नाव उज्वल करणे या उद्देशाने करण्यात आली आहे. गेल्या २५ वर्षांपासून संस्था सातत्याने विविध क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रम राबवत असून, यंदाचे २६ वे वर्षही त्याच परंपरेला साजेसे ठरणार आहे.

## निवडक

### फुटबॉल स्टार डेव्हिड ओव्हरीची हत्या

**नवी दिल्ली :** युगांडाचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू डेव्हिड ओव्हरीचे निधन झाले आहे. स्थानिक पोलिसांनुसार, राजधानी कंपाला येथे त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. २८ वर्षीय ओव्हरी देशातील सर्वात मोठ्या फुटबॉल क्लबपैकी एक असलेल्या एससी विला क्लबचा कर्णधार होता.पोलीस प्रवक्ते रेचल कवाला यांनी सांगितले की, मंगळवारी कंपालाच्या एका उपनगरात अज्ञात हल्लेखोरांनी ओव्हरीला गंभीर जखमी केले होते. वाटसरूंना तो बेशुद्ध अवस्थेत आढळला आणि त्यांनी त्याला जवळच्या रुग्णालयात पोहोचवले. नंतर त्याला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.युगांडा फुटबॉल असोसिएशनच्या फेडरेशनने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, डेव्हिड केवळ एक फुटबॉलपटू नव्हते. ते एक नेते आणि तरुणांसाठी प्रेरणा होते. एससी विलाचे कर्णधार म्हणून त्यांनी धैर्य, नम्रता आणि उत्कटतेने संघाचे नेतृत्व केले. युगांडा क्रेनची जर्सी परिधान करून त्यांनी देशाच्या आशांना पुढे नेले.



### जॉन टर्नरची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती



**नवी दिल्ली :** क्रिकेट विश्वातील एक बातमीनंतर क्रीडाप्रेमींना आश्चर्याचा धक्का बसला आहे. कारण ज्या वयात क्रिकेट कारकिर्द सुरू होते, त्या वयात निवृत्ती घेणं रूचणारं नाही. इंग्लंडचा युवा वेगवान गोलंदाज जॉन टर्नरने वयाच्या २५व्या वर्षी क्रिकेटच्या सर्व फॉर्मेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे.जॉन टर्नरने ६ ऑगस्टला क्रिकेटमधून निवृत्ती घेताना त्या मागचं कारणही सांगितलं आहे. ते कारण ऐकून, वाचून अनेकांना धक्का बसला आहे. टर्नरने सलग दुखापत होत असल्याने वैतागून हा निर्णय घेतला आहे. जून २०२५ स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे मागचा एक वर्ष क्रिकेटपासून दूर होता. ब्रिटेनच्या एक्सटेर युनिवर्सिटीच्या इकोनॉमिक्स आणि फायनान्स ग्रॅज्युएट असलेल्या टर्नरसाठी हा निर्णय घेणं वाटतं तितकं सोपं नव्हतं.पण हा निर्णय घेण्याशिवाय पर्याय नव्हता. कारण आता आयुष्याची नवी सुरूवात करण्यासाठी सज्ज झाला आहे.दक्षिण अफ्रिकेत जन्मलेल्या आणि तिथेच वाढलेल्या जॉन टर्नरची आई ब्रिटीश असल्याने त्याला फायदा मिळाला.

### इंडिया खेळणार विक्रमी कसोटी सामना

**नवी दिल्ली :** भारतीय संघ श्रीलंकेच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यातील पहिली कसोटी गॉल इथे होणार आहे. ही कसोटी भारतीय संघाची ६००वी विक्रमी कसोटी असणार आहे. एवढे कसोटी सामना खेळणारा भारत केवळ तिसरा संघ ठरणार आहे. १०९७ कसोटी सामने खेळणारा इंग्लंडचा संघ या यादीत पहिल्या स्थानी आहे. ८८२ कसोटीसह ऑस्ट्रेलिया दुसऱ्या स्थानी आहे. भारतीय संघाने ५९९ कसोटीत, १८६ विजय मिळवले आहेत. १८८ सामन्यात त्यांना पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. २२४ सामने अर्निणित झाले आहेत. एकमेव सामना टाय झाला आहे. भारतीय संघाची सामने जिंकण्याची टक्केवारी ३१ टक्के आहे.भारतीय संघाने पहिला कसोटी सामना १९३२ साली क्रिकेटची पंढरी असलेल्या लॉर्ड्स इथे खेळला. सी.के.नायडू या सामन्यात भारताचे कर्णधार होते. भारतीय संघाचा या सामन्यात मोठ्या फरकाने पराभव झाला. या कसोटीत मोहम्मद निस्सार यांनी डावात ५ विकेट्स पटकावण्याची किमया केली. पुढच्याच वर्षी भारतात पहिली वहिली कसोटी खेळवण्यात आली. मुंबईतल्या बॉम्बे जिमखान्याच्या मैदानावर हा सामना आयोजित करण्यात आला होता. या सामन्यात पदार्पण करणाऱ्या लाला अमरनाथ यांनी ११८ धावांची खेळी केली. भारतासाठी कसोटी प्रकारात शतक झळकावणारे ते पहिले फलंदाज ठरले.१९५२ मध्ये भारताने कसोटीतला पहिलावहिला विजय मिळवला. चेन्नईत झालेल्या या कसोटीत भारताने इंग्लंडवर विजय मिळवला.

### सूरजकुमारचे ऐतिहासिक सुवर्णपदक

**मुंबई :** भारताच्या सूरजकुमार चंद याने जागतिक विद्यापीठ स्क्वॉश स्पर्धेमध्ये ऐतिहासिक कामगिरी करताना पुरुष एकेरी गटामध्ये सुवर्णपदकावर मोहर उमटवली. स्पेनच्या मार्टा डोमिंगेझ फर्नांडिझ हिने महिला एकेरी गटात विजेतेपदावर हक्क सांगितला. सोमय्या विद्याविहार विद्यापीठ यांच्या यजमानपदाखाली भारतीय विद्यापीठ संघटना आणि स्क्वॉश रॅकेट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने जागतिक विद्यापीठ स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.यजमान देशाकडून खेळणाऱ्या सोमय्या विद्याविहार विद्यापीठातील विद्यार्थी सूरजकुमार चंदने पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात हंगेरीच्या बेनेडेक टाकाक्स याचा ५-११, ११-८, ११-५, ६-११, ११-४ असा पराभव केला. या विजयासह भारताने १६ वर्षांनंतर जागतिक विद्यापीठ स्क्वॉश स्पर्धेत पुरुष एकेरीचे सुवर्णपदक जिंकले. हा भारतीय विद्यापीठीय स्क्वॉशसाठी आणि यजमान संस्थेसाठी ऐतिहासिक क्षण ठरला. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात स्पेनच्या मार्टा डोमिंगेझ फर्नांडिझ हिने हाँगकाँग चीनच्या चिंग हेई फंग हिचा ११-३, ११-७, ११-७ असा सरळ गेममध्ये पराभव करून विजेतेपद कायम राखले. हा विजय तिच्या वडिलांच्या वाढदिवशी मिळाल्याने तिच्यासाठी तो अधिक संस्मरणीय ठरला. १४ देशांतील खेळाडूंचा सहभागचार दिवस चाललेल्या एकेरी स्पर्धांमध्ये १४ देशांतील विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला. उच्च दर्जाच्या सामन्यांमुळे स्पर्धेला विशेष रंगत आली. तसेच उदयोन्मुख खेळाडूंना जागतिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या आणि विद्यापीठीय क्रीडांना चालना देण्याच्या सोमय्या विद्याविहार विद्यापीठाच्या वचनबद्धतेची पुन्हा एकदा प्रचीती आली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)